

• पुणे, मंगळवार, २० ऑगस्ट २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 251 • वर्ष ३ रे, अंक २५१ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com
BEYOND THE NEWS



बाजारपेठेतील अर्थव्यवस्थेला ‘राखी’चे कवच
P3



विनेश फोगटला १६ कोटींहून अधिक बक्षीस?
P11

## At a Glance

### तटरक्षक दलाचे महासंचालक राकेश पाल यांचे निधन

**नवी दिल्ली :** भारतीय तटरक्षक दलाचे महासंचालक राकेश पाल यांचे हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. त्यांनी चेन्नईत अखेरचा श्वास घेतला. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह आणि तामिळनाडूचे मुख्यमंत्री एमके स्टालिन यांनी रुग्णालयात जात राकेश पाल यांना श्रद्धांजली अर्पण केली. राकेश पाल उत्तर प्रदेशचे राहणारे होते.

### पीएम मोदी युक्रेन दौऱ्यावर

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विदेश दौऱ्याबाबत मोठी माहिती समोर आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी २१ ऑगस्टपासून दोन देशांच्या विदेश दौऱ्यावर रवाना होणार आहेत. विशेष बाब म्हणजे या दौऱ्यात ते यूक्रेनचा दौरा देखील करणार आहेत. मोदींचा यावेळचा विदेश दौरा पोलंड आणि यूक्रेन या दोन देशांमध्ये असेल.

### इसिसच्या दोघांविरोधात एनआयएचे आरोपपत्र

**बेंगळुरू :** राष्ट्रीय तपास एजन्सी एनआयएने सोमवारी दोघा जणांविरोधात हत्या आणि भारतातील इसिच्या "जिहादी कारवायांना" प्रोत्साहन देणाऱ्या एका मोठ्या दहशतवादी कटाचा भाग असल्याबद्दल आरोपपत्र दाखल केले. आरोपी अब्दुल मतीन ताहा आणि मुसावीर हुसेन शाजीब हे कर्नाटकातील शिवमोग्गा जिल्ह्यातील तीर्थहल्ली येथील आहेत.

### झिशान सिद्दीकी यांचा काँग्रेसला घरचा आहेर

**मुंबई :** काँग्रेस नेते बाबा सिद्दीकी यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर, आता त्यांचे पुत्र आमदार झिशान सिद्दीकी हे देखील अजित पवार गटात प्रवेश करणार आहेत. गेल्या काही दिवसांपासून काँग्रेसपासून लांब असलेले आमदार झिशान सिद्दीकी राष्ट्रवादी काँग्रेसच्या » पान ७ वर

# जरांगे विरोधात मुख्यमंत्री आक्रमक

## फडणवीसांची पाठराखण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** मराठा समाजाला आरक्षण देताना मी, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार आम्ही एकत्र बैठक घेतली होती. त्यासाठी आम्ही विशेष अधिवेशन बोलवले होते. यासंदर्भातील प्रत्येक बैठकीला देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी सरकारने जो कायदा पारीत केला, त्यातही फडणवीसांची मोठी भूमिका होती. फडणवीस हे मुख्यमंत्री असतानाही, मराठा समाजाला आरक्षण देण्यात आले होते. त्यामुळे फडणवीस हे मराठा आरक्षणाच्या विरोधात आहे, असे म्हणणे, चुकीचे आहे. यात काहीही तथ्य नाही, असे म्हणत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी फडणवीस यांची पाठराखण केली. मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी केलेले आरोप त्यांनी खोडून काढले.

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, मनोज जरांगे हे सातत्याने देवेंद्र फडणवीस यांच्यावर आरोप करत आहेत. अशातच ‘मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मराठा आरक्षण देऊ इच्छित आहेत. मात्र, त्यांना देवेंद्र फडणवीस थांबवत आहेत’, असा आरोपही मनोज जरांगे यांनी केला. त्यांच्या या आरोपानंतर मुख्यमंत्री शिंदे यांनी त्यांचे आरोप खोडून काढले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे रक्षाबंधनाच्या एका कार्यक्रमात सहभागी झाले होते. या कार्यक्रमानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी मनोज जरांगे यांच्या फडणवीसांवरील आरोपांबाबत बोलताना, हे आरोप चुकीचे असून सरकारने मराठा समाजाला जे आरक्षण दिले, त्यात फडणवीसांची महत्त्वाची भूमिका होती, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले.

मराठा आरक्षणावरून देवेंद्र फडणवीस यांच्यावर पुन्हा एकदा टीका करताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की, आम्ही तुम्हाला विरोधक मानलेले नाही. हे तुम्ही का समजून घेत नाही. तुमच्यावर अशी भाषा बोलण्याची वेळ का आली? शेवटी तुम्ही या राज्यातील कर्ते आहात. आता तुम्ही इतक्या हताशपणे राजीनामा देईन, असे म्हणायला लागलात. मराठ्यांविरोधात गेल्याचा पश्चाताप तुम्हाला झाला आहे. तुम्ही राजीनामा देईन म्हणताय, तर माझी तुम्हाला सरळ सरळ विनंती आहे.



“ आजपर्यंत मराठा समाजासाठी जे काही निर्णय झाले, ते एकतर मी घेतले किंवा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतले आहेत. तसेच मी मुख्यमंत्री शिंदे यांच्या पाठीशी भक्कमपणे उभा राहिलेलो आहे. त्यामुळे अशा प्रकारे जाणीपूर्वक नरेटिव्ह तयार करण्याचा प्रयत्न अयोग्य आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जर म्हटले की, मराठा आरक्षणाबाबतचा कोणताही निर्णय घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला आणि मी तो प्रयत्न थांबवला, तर त्याच क्षणी मी माझ्या पदाचा राजीनामा देईन आणि राजकारणातूनही निवृत्त होईन."

— देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री

## संभाजी भिडेंवर पवारांचा बोलण्यास नकार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून, मनोज जरांगे आक्रमक झाले असताना, ओबीसी समाजाकडून कोट्याबाबत तीव्र विरोध केला जात आहे. या पार्श्वभूमीवर शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान संस्थेचे प्रमुख संभाजी भिडे यांनी मराठा आरक्षणावर त्यांची भूमिका मांडली. मात्र, यावर शरद पवारांना प्रश्न विचारला असता, त्यांनी संभाजी भिडेंवर प्रतिक्रिया द्यायला नकार दिला.

शरद पवार पुण्यात असताना त्यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. यावेळी अजित पवारांनी बारामतीमधून निवडणूक लढवण्यात रस नसल्याची भूमिका मांडल्याबाबत त्यांना विचारणा करण्यात आली. त्यावर, प्रत्येकाला निर्णय घेण्याचा अधिकार असतो, पण त्यांच्या मनात काय आहे माहिती नाही, अशी प्रतिक्रिया पवारांनी दिली. त्यानंतर संभाजी भिडेंच्या मराठा आरक्षणावरील भूमिकेबाबत » पान ७ वर

### तृणमूल काँग्रेसच्या खासदाराचे धक्कादायक विधान

# तर तुम्हाला आम्ही वाचवणार नाही!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोलकाता :** कोलकातामधील महिला डॉक्टर बलात्कार व हत्या प्रकरणाचे देशभर पडसाद उमटत आहेत. देशभरातील डॉक्टरांच्या संघटनेकडून आंदोलनाची हाक देण्यात आली आहे. वेगवेगळ्या भागात मोठ्या संख्येने डॉक्टर रस्त्यावर उतरले आहेत. पीडितेला लवकरात लवकर न्याय मिळावा आणि गुन्हेगारांना कठोरात कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी करण्यात येत आहे. तसेच, संतप्त नातेवाईकांकडून डॉक्टरांवर होणाऱ्या हल्ल्यांचाही निषेध केला जात आहे. या पार्श्वभूमीवर तृणमूल काँग्रेसचे खासदार अरूप चक्रवर्ती यांनी केलेले धक्कादायक विधान चर्चेत आले आहे.

कोलकात्याच्या आरजी कर वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात गेल्या आठवड्यात बलात्काराची घटना घडली. रुग्णालयात रात्रपाळीसाठी काम करणाऱ्या एका महिला डॉक्टरवर बलात्कार करून नंतर तिची निर्घृण हत्या करण्यात आली. पीडितेसोबत घडलेल्या पाशवी प्रसंगाचे धक्कादायक खुलासे पोलीस तपासात समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर देशभरातील डॉक्टरांनी सुरक्षेच्या मुद्द्यावर आक्रमक भूमिका घेतली असून संपाचे हत्यार उपसले आहे. याचा परिणाम देशभरात ठिकठिकाणी वैद्यकीय सेवेवर झाल्याचा दावा करण्यात येत आहे. त्यातच आता तृणमूल काँग्रेसच्या खासदाराच्या विधानामुळे संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत.

अरूप चक्रवर्ती हे पश्चिम बंगालमधील सत्ताधारी तृणमूल काँग्रेस पक्षाचे विद्यमान खासदार आहेत. ममता बॅनर्जी यांनी या घटनेचा निषेध करताना, तातडीने कारवाई व्हावी या मागणीसाठी मोर्चा काढला. अशाच एका मोर्चामध्ये सहभागी झालेले » पान ७ वर

## महायुतीमध्येही धुसफूस सुरू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** विधानसभेची निवडणूक तोंडावर आलेली असताना, सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी कंबर कसली आहे. अनेक नेत्यांचे राज्यात दौरे सुरू आहेत. या दौऱ्यांच्या माध्यमातून निवडणुकीचा आढावा घेतला जात आहे. यातच सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत. मात्र, आता महायुतीमध्येही धुसफूस सुरू असल्याची दिसून येते. शिवसेना शिंदे गटाचे नेते रामदास कदम यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्यावर केलेल्या टीकेनंतर महायुतीमधील मतभेद चव्हाट्यावर आले आहेत.

रामदास कदम यांनी म्हटले की, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी रविंद्र चव्हाण यांचा राजीनामा घ्यावा. तसेच » पान ७ वर

### विधानसभेसाठी आक्रमक भूमिका

# सांगलीत उबाठा-काँग्रेस पुन्हा आमनेसामने

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सांगली :** लोकसभा निवडणुकीच्या वेळी सांगलीच्या जागेवरुन महाविकास आघाडीत चांगलीच बिघाडी झाल्याचे पाहायला मिळाले. मित्रपक्षांशी चर्चा न करता ठाकरे गटाने या जागेवरुन थेट आपला उमेदवार जाहीर केल्यामुळे काँग्रेस आक्रमक झाली. यातूनच विशाल पाटील यांनी अपक्ष लढण्याचा निर्णय घेतला आणि त्यांचा विजय झाला. त्यामुळे ठाकरे गट तोंडावर आपटला. त्याशिवाय मविआवरही विपरित परिणाम झाला.

» विधानसभा

आता विधानसभा निवडणुकीतही ठाकरे गट आणि काँग्रेसमध्ये वाद रंगण्याची शक्यता आहे. लोकसभेला काँग्रेसने साथ न दिल्यामुळे आता विधानसभेला जिल्ह्यामध्ये काँग्रेसशी युती नकोच, अशी मागणी सांगलीचे उबाठाचे जिल्हाप्रमुख संजय विभुते यांनी केली आहे.

संजय विभुते यांनी काँग्रेसचे सहयोगी खासदार विशाल पाटील यांच्यावर थेट टीका केली आहे. त्यांचे खायचे दात आणि दाखवायचे दात वेगळे असल्याचे विभुते यांनी म्हटले आहे. सांगली जिल्ह्यामध्ये आगामी विधानसभा निवडणुकीत काँग्रेसकडून पुन्हा विश्वासघात होणार असल्याचे स्पष्ट संकेत आहेत, त्यामुळे सांगली जिल्ह्यात काँग्रेस सोबत आघाडी नको, अशी मागणी देखील त्यांनी केली आहे.

# कोंडी टाळण्यासाठी कार्यकर्ते मदत करणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गणेशोत्सवात होणारी कोंडी हटविण्यासाठी मंडळाचे कार्यकर्ते मदत करणार आहेत. मंडळाचे कार्यकर्ते वाहतूक स्वयंसेवकांच्या भूमिका बजाविणार आहेत. पुणे पोलिसांच्या परिमंडळ एककडून गणेशोत्सव कार्यकर्त्यांची बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीत विविध मंडळांचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. पोलीस उपायुक्त संदीपसिंग गिल यावेळी उपस्थित होते.

उत्सवाच्या कालावधीत राज्यासह, देशाच्या वेगवेगळ्या भागातून भाविक मध्यभागात गर्दी करतात. भाविकांची होणारी गर्दी, तसेच वाहतूक नियोजन करण्यासाठी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांशी पोलीस उपायुक्त गिल यांनी संवाद साधला. मंडळाचे कार्यकर्त्यांनी उत्सव कालावधीत वाहतूक नियोजन करण्यासाठी पोलिसांना सहाय करावे, असे आवाहन पोलीस उपायुक्त गिल यांनी बैठकीत केले. त्यानुसार विविध मंडळांच्या कार्यकर्ते वाहतूक नियोजनासाठी सहाय्य करणार आहेत.

उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी पोलिसांकडून समन्वय साधण्यात येणार आहे. महावितरणशी संपर्क साधण्यात आला आहे. विद्युत तारांची देखभाल ठेवण्यात यावी, तसेच लटकणाऱ्या विद्युत तारा व्यवस्थित कराव्यात, अशा सूचना देण्यात आल्या. गणेश मंडळे, ढोल पथक, पोलीस, स्वयंसेवक यांच्यात समन्वय असणे गरजेचे असल्याचे पोलीस उपायुक्त गिल यांनी नमूद केले.

## राज्यात मुसळधार पाऊस आणि उकाडाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यात उकाडा आणि मुसळधार पाऊस असे चित्र २२ ते २५ ऑगस्टपर्यंत कायम राहील, असा अंदाज हवामानतज्ज्ञांनी वर्तवला आहे.

ज्येष्ठ हवामानतज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी सांगितले की, अरबी समुद्रावरून वाहणाऱ्या हंगामी पश्चिमी वाऱ्यांची दिशा सध्या बदलली आहे. महाराष्ट्रावर सध्या हे वारे उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहतेय. म्हणजेच बाष्पयुक्त अरबी समुद्री वारे येणे थांबले. हवेच्या दाबातील फरक नामशेष झाला असून सध्या तो एकसमान आहे. त्यामुळेच वाऱ्याचा वेग मंदावला. हवेला वहन नसल्यामुळे रात्री जमिनीतून बाहेर येणाऱ्या उष्णतेलाही सध्या अटकाव होत आहे. पर्यायाने संचित झालेली ही उष्णता काहिलीला मदत करीत आहे. एकत्रित परिणामातून » पान ७ वर

## रक्षाबंधन यात्रा

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



» **पुणे:** भारत-पाक सीमेवर जवानांसोबत रक्षाबंधन उत्साहात साजरे करण्यात आले. आम्ही पुणेकर आणि श्री पांडुरंग आदर्श सेवा ट्रस्ट यांच्या पुढाकारातून, "राष्ट्रवीर सैनिक बंधुता रक्षाबंधन यात्रा" पुणे ते कुपवाडा जिल्ह्यातील केरन सेक्टर येथे काढण्यात आली. सीमेवरील जवानांना राखी बांधून रक्षाबंधन उत्साहात साजरे करण्यात आले. आम्ही पुणेकर संस्थेचे हेमंत जाधव, संतोष फुटक, श्री पांडुरंग आदर्श सेवा ट्रस्ट चे सुरज परदेशी, सागर बोदगिरे,लष्करी अधिकारी आणि सैन्यातील जवान उपस्थित होते.

## कोलकाता प्रकरणी आज सुनावणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पश्चिम बंगालमधील आरजी कार मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमध्ये महिला प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर झालेल्या बलात्कार आणि हत्येच्या प्रकरणाने देशभरात संतापाची लाट आहे. या घटनेविरोधात देशभरातील वैद्यकीय महाविद्यालयांचे विद्यार्थीही आंदोलन करत आहेत. या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाने स्वत:हून दखल घेतली असून, सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखाली न्यायमूर्ती जेबी पराडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठात मंगळवारी सुनावणी होणार आहे.

प्रशिक्षणार्थी महिला डॉक्टरवर झालेल्या पाशवी अत्याचाराच्या घटनेने देशातील राजकारण तापले आहे. तसेच, देशभरातील डॉक्टर आणि वैद्यकीय महिविद्यालयांचे » पान ७ वर

### माजी महापौर कमल व्यवहारे यांचा आरोप

# हाच का मेट्रो सिटी पुण्याचा विकास?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरातील लोहियानगर आणि गंज पेठ परिसरात सुद्धा ओसंडून पाणी वाहू लागले असून, नागरिकांची गैरसोय पाहायला मिळाली. प्रशासनाच्या भोंगळ कारभाराचा फटका पुणेकरांना बसत असून, या एकूण सर्व परिस्थितीवरून काँग्रेस नेत्या आणि माजी महापौर कमलताई व्यवहारे यांनी राज्य सरकारवर निशाणा साधला आहे. हाच का मेट्रो सिटी पुण्याचा विकास? असा सवाल कमलताई व्यवहारे यांनी केला आहे.



महाराष्ट्राचे सांस्कृतिक शहर पुणे हे यंदाच्या पावसात मात्र समुद्रासारखे पाण्याने भरलेले दिसले. मागील २-३ दिवसांपासून पुण्यात मुसळधार पाऊस पडल्याने, पुन्हा एकदा पुण्यातील अनेक सखल भागात पाणी साचल्याने पाहायला मिळाले. मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी सखल भागात पाणी साचले. गंजपेठ-लोहियानगर या भरगच्च वस्ती असलेल्या भागात सुद्धा पाणी तुंबल्याने, संपूर्ण परिसराला नदीचे स्वरूप प्राप्त झाले. साचलेल्या पाण्याचा मोठा फटका याठिकाणी राहत असलेल्या स्थानिक नागरिकांना बसत असून, त्यांचे संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले आहे. त्यामुळे पुण्याची स्मार्ट सिटी करतो, अशा वल्ग्ना करणाऱ्या विरोधकांवर कमलताई व्यवहारे यांनी हल्लाबोल केला. हाच का मेट्रो सिटी पुण्याचा विकास? एका रात्रीत पावसामुळे पुण्यातील अनेक सखल भागात पाणी साचले, असे म्हणत कमलताई व्यवहारे यांनी विरोधकांना लक्ष्य केले.

#रा

## लोकसभेची चूक विधानसभेला नको

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीची सर्व पक्षांनी तयारी सुरू केली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचीही जनसन्मान यात्रा राज्यभर सुरू आहे. आज ही यात्रा मुंबईत झाली. या यात्रेत काँग्रेस आमदार झिशान सिद्दीकी उपस्थित होते. दरम्यान, जनसन्मान यात्रेत बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विरोधकांवर निशाणा साधला. तसेच विधानसभा निवडणुकीसाठी जनतेला आवाहन केले. लोकसभा निवडणुकीत विरोधकांनी तुमची दिशाभूल बदलली. ते म्हणाले, आरक्षण बदलणार, संविधान बदलणार. हे चुकीचे होते. हे आम्ही सगळ्यांना सांगत होतो, » पान ७ वर

# राष्ट्रवादी लढवणार जम्मू काश्मीरची निवडणूक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** निवडणूक आयोगाने हरियाणा आणि जम्मू-काश्मीरमधील विधानसभा निवडणुका जाहीर केल्या. अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष जम्मू काश्मीर विधानसभेची निवडणूक लढवणार आहे, अशी माहिती आहे. यासाठी त्यांनी उमेदवारांची नावेही निश्चित केल्याची माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जम्मू काश्मीरमधील जवळपास २५ जागांवर अजित पवार यांच्याकडून, उमेदवार दिले जाणार आहेत. यातील १० ते १५ उमेदवारांची नावे जवळपास निश्चित झाल्याची माहिती आहे. सप्टेंबर महिन्यात जम्मू काश्मीरमध्ये ३ टप्प्यात निवडणूक होणार आहे, तर ४ ऑक्टोबर रोजी मतमोजणी आहे. गेल्या १० वर्षांपासून जम्मू काश्मीरमध्ये विधानसभेची निवडणूक झाली नाही. कलम ३७० हटवल्यानंतरची ही पहिलीच विधानसभा निवडणूक आहे. त्यामुळे या निवडणुकीला महत्त्व प्राप्त झाले आहे.

जम्मू-काश्मीरमध्ये विधानसभेच्या ८३ जागा होत्या. पण यंदा ७ जागा वाढल्या असून, ९० जागांसाठी निवडणूक होणार आहे. या निवडणुकीसाठी अजित पवारांनी » पान ७ वर

## धर्माधिकारी, बालन, चाकणकर, डॉ. डोळे यांच्या कार्याचा जवळून परिचय:

# परिवर्तन युवा परिषदेला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** चौथ्या परिवर्तन राज्यस्तरीय युवा परिषदेला राज्यभरातील तरुणांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एस एम जोशी सभागृहात दोन दिवस चाललेली ही परिषद तब्बल १००० हून अधिक युवक कार्यकर्त्यांच्या उपस्थितीमध्ये पार पडली. उद्घाटन समारंभामध्ये 'ज्ञान की लायब्ररी'चे प्रमुख आणि विचारवंत प्रदीप लोखंडे यांनी पुनीत बालन उद्योग समूहाचे अध्यक्ष पुनीत बालन यांची चरित्रात्मक मुलाखत घेतली. यावेळी पारदर्शकता स्वाभिमान आणि प्रयत्नातील सातत्य या त्रिसूत्रीवर तरुणाने उद्योजकतेमध्ये प्रगती करावी असे आवाहन श्री. बालन यांनी केले. त्यांचे संपूर्ण जीवन चरित्र मांडत अनेक प्रेरणादायी विचार त्यांनी यावेळी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या समारोपवेळी खासदार निलेश लंके यांनी उपस्थित तरुणांना आपल्या राजकीय कार्यकर्ते याविषयी माहिती देत चारित्र्यशील राजकारण करण्याचा सल्ला दिला.

परिवर्तन ग्रुपचे किशोर ढगे, अभिजीत घुले, पुनम घुले, सचिन जगताप, संपूर्ण ढगे आदींनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.



मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे, रेस्क्यू फाउंडेशनच्या नेहा पंचमीया आणि नचिकेत उत्पाद, मनोहर डोळे फाउंडेशनचे प्रमुख पद्मश्री डॉ. संदीप डोळे यांच्या अनिरुद्ध बडवे आणि स्वाती मते यांनी या मान्यवरांच्या मुलाखती घेतल्या.




पुनीत बालन उद्योग समूहाचे अध्यक्ष पुनीत बालन यांची प्रकट मुलाखत प्रदीप लोखंडे यांनी घेतली




दुसऱ्या सत्रामध्ये 'राजकारण आणि युवक' या विषयावर महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपालीताई चाकणकर यांची प्रकट मुलाखत दैनिक राष्ट्र संचारचे संपादक अनिरुद्ध बडवे आणि अक्षय उंद्रे यांनी घेतली. महिलांवरील अत्याचार त्यावरील उपाय योजना, महिलांचे राजकारणामधील स्थान त्यावर समोरील आव्हाने याबाबत रूपालीताई यांनी मोलाचे विचार व्यक्त केले.



युवक कार्यकर्त्यांची उपस्थिती या परिषदेत होती

तिसरा सत्रामध्ये 'सामाजिक कार्यात युवकांची भूमिका' या विषयावर मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे, रेस्क्यू फाउंडेशनच्या नेहा पंचमीया आणि नचिकेत उत्पाद तर सुप्रसिद्ध डॉक्टर आणि मनोहर डोळे फाउंडेशनचे प्रमुख पद्मश्री डॉ. संदीप डोळे यांनी आपली भूमिका व्यक्त केली. अनिरुद्ध बडवे आणि स्वाती मते यांनी या मान्यवरांच्या मुलाखती घेतल्या.

चौथ्या सत्रामध्ये युवक आणि नागरिकशास्त्र या विषयावर माजी सनदी अधिकारी आणि चाणक्य मंडळाचे प्रमुख अविनाश धर्माधिकारी यांनी अत्यंत प्रबोधनात्मक विचार व्यक्त केले.

### वन्यजीवांचे थरारक अनुभव

तिसऱ्या सत्रामध्ये रेस्क्यू फाउंडेशनचे नेहा पंचम या आणि नचिकेत उत्पाद यांनी वन्यजीवांसोबत सहजीवन मान्य करण्याबाबतचे विचार मांडले. वन्यप्राणी आपल्यामध्ये येत नसून नागरी समूहाने वन्यप्राण्यांच्या कार्यक्षेत्रात अतिक्रमण केले आहे म्हणून या समस्या वाढत असल्याचे निरीक्षण त्यांनी नोंदविले. यावेळी वन्य जीवांना पुन्हा जंगलात सोडण्यासाठी आलेले अनेक अनुभव त्यांनी कथन केले. वन्यजीवांसोबतचे थरारक अनुभव ऐकताना श्रोत्यांच्या अंगावर रोमांच उभे राहत होते.

### २४ तास कार्यरत राहणारा हा एकमेव शासकीय विभाग

गेल्या दोन वर्षात सुमारे ३०० कोटीहून अधिक निधी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षाच्या वतीने वितरित करण्यात येत असून २४ तास कार्यरत राहणारा हा एकमेव शासकीय विभाग असल्याचे मंगेश चिवटे यांनी सांगितले. यावेळी श्रोत्यांमधून उत्स्फूर्तपणे या कक्षाच्या अनुभवाबाबत अनेकांनी आपले विचार व्यक्त केले. मंगेश चिवटे यांच्या सकारात्मक नेतृत्वाचे आणि दिवसांची चर्चा कार्यक्रम स्थळी मोठ्या प्रमाणात होत होती .

---

राष्ट्रसंचार शैक्षणिक रा

# 'आरओसी २०२४' स्पर्धेचे यशस्वी आयोजन

## देशभरातून विविध अभियांत्रिकी महाविद्यालयांचा सहभाग



**वडगाव :** सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय वडगाव पुणे व आयआयटी दिल्ली आणि एस व्ही आर रोबोटिक्स पुणे यांचे संयुक्त विद्यमाने 'आरओसी २०२४' स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. देशभरातील विविध अभियांत्रिकी महाविद्यालयांनी सहभाग घेतलेल्या 'आरओसी २०२४' स्पर्धेचे आयोजन १६ आणि १७ ऑगस्ट २०२४ रोजी सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय वडगाव पुणे येथे करण्यात आले.

या स्पर्धेत 'रोबो ऍनालायझर' वापरून रोबोटिक संज्ञा सुलभ करण्याबाबत डॉ.सुभीर कुमार साहा (आयआयटी दिल्ली), डॉ.राजीव लोचना (अमृता विश्व विद्यापीठ, बेंगलोर), आणि डॉ. नयन काकोटी (तेजपूर विद्यापीठ, आसाम) यांनी मार्गदर्शन केले. तसेच या स्पर्धेचे पुरस्कर्ते एस व्ही आर रोबोटिक्स पुणे चे डायरेक्टर श्री विनोद आटपाडकर यांनी देखील या स्पर्धेसाठी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ.एस. डी. लोखंडे आणि उपप्राचार्य डॉ. वाय. पी. रेड्डी व डॉ. धनंजय खंकाळ यांची प्रमुख उपस्थिती होती. या स्पर्धेसाठी संस्थापक अध्यक्ष एम.एन. नवले, सचिव डॉ.सुनंदा एम. नवले, उपाध्यक्ष (प्रशासन) डॉ.रचना नवले आष्टेकर आणि उपाध्यक्ष (एच.आर.) डॉ.रोहित एम. नवले यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाची सांगता यंत्र अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. ए.पी. पांढरे यांच्या भाषणाने झाली. या स्पर्धेच्या यशस्वी नियोजनासाठी डॉ.ए.पी. ताडमल्ले, प्रा. वि.टी.पवार, प्रा. ए.जी. चव्हाण आणि एस.डी.बाड यांनी विशेष प्रयत्न केले.

# विमानात प्रवाशांमध्ये तुंबळ हाणामारी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे एअरपोर्टवर सीआयएसएफच्या महिला जवानाला प्रवाशाकडून मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली आहे. दोन प्रवाशांमध्ये झालेला वाद सोडवण्यासाठी महिला जवान गेली होती. त्यावेळी महिला प्रवाशाने महिला जवानाचा चावा घेतला. सीट मागे घेताना प्रवाशांमध्ये वाद झाला होता. या घटनेनंतर महिला प्रवाशाला एअरपोर्टमधून बाहेर काढण्यात आले. याप्रकरणी पुण्याच्या विमानतळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी सुरेखा सिंग (४४ वर्षे) या महिला प्रवाशाविरोधात विमानतळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही महिला वाकड येखील संतोषनगरमध्ये राहते. या घटनेमुळे विमानाच्या उड्डाणाला एक तास उशीर झाला. या घटनेमुळे विमानातील प्रवासीच नाही तर कॅप्टनदेखील घाबरले होते.

## पीआयसीटी अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजन

# परिणाम आधारित शिक्षणावर विशेष सत्र

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पीआयसीटी, पुणे येथील संगणक अभियांत्रिकी विभागात विभाग प्रमुख डॉ. गीतांजली काळे यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी एक महत्त्वपूर्ण प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात सहायक प्राध्यापक समाधन जाधव यांनी "प्रभावी कोर्स परिणाम (COs) आणि शिकण्याचे परिणाम (LOs) तयार करणे" या विषयावर एक विशेष सत्र घेतले. आऊटकम बेस्ड एजुकेशन (OBE) च्या अभ्यासक्रमाच्या तीन स्तंभांवर - परिणाम आधारित अभ्यासक्रम, अध्यापन-शिक्षण, आणि मूल्यमापन - चर्चा करण्यात आली. या सत्रात COs आणि LOs डिझाइन करण्याच्या प्रक्रियेवर विशेष भर देण्यात आला.

COs हे विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमानंतर साध्य केलेली कौशल्ये आणि क्षमतांचे वर्णन करतात. प्रत्येक सत्रासाठी सत्र परिणाम (LOs) देखील परिभाषित केले जाऊ शकतात. श्री. जाधव यांनी ज्ञानात्मक, मनःशारीरिक , आणि भावनिक क्षेत्रांवर आधारित शिक्षणाची प्रक्रिया समजावून सांगितली. त्यांनी ब्लूमचे वर्गीकरण आणि विविध स्तरांवरील शिक्षणाचे परिणाम सखोलपणे स्पष्ट केले.

# निर्णयाची अंमलबजावणी न केल्यास कठोर कारवाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्य शासनाने व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशित विद्यार्थिनींना शंभर टक्के शैक्षणिक शुल्क माफ करण्याचा निर्णय झाला. त्याची अंमलबजावणी करण्याच्या सक्त निर्देश राज्य शासनाकडून सर्व संस्था व महाविद्यालयांना दिल्या आहेत. सीईटी प्रक्रियेद्वारे प्रवेशित मुलींना मोफत शिक्षण देण्यात येत आहे. मात्र, काही संस्था अथवा महाविद्यालये विद्यार्थिनींकडून प्रवेशावेळी शुल्क आकारत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत.

ही गंभीर बाब असून, शासनाच्या निर्देशाचे उल्लंघन करणारी आहे. शासनाच्या आदेशाचे पालन न करणाऱ्या संस्थांच्या विरोधात कठोर कारवाई करण्याचा वेळ आणू नका, अशा सक्त सूचना उच्च शिक्षण विभागाने दिल्या आहेत. विद्यार्थिनीकडून प्रवेशाच्या वेळी कोणतेही शिक्षण शुल्क न आकारता त्यांना प्रवेश देणे अनिवार्य आहे. एवढेच नव्हे, तर प्रवेशाच्या वेळी संस्थांनी मुलींकडून शिक्षण शुल्काचा भरणा करुन घेतला असल्यास, त्यांना रक्कम संस्थेने विद्यार्थ्यांना परत करण्याचे आदेशही देण्यात आले.

Selected

# रिक्षाचालक बांधवातर्फे महिला प्रवाशांना रक्षाबंधनाची खास भेट

**पुणे :** रिक्षाचालक बांधवातर्फे महिला प्रवाशांना रक्षाबंधनाची खास भेट देण्यात आली. महिला प्रवाशांना सोमवारी रक्षाबंधन निमित्त मोफत रिक्षा प्रवास सेवेचा लाभ घ्यावी, असे आवाहन रिक्षा संघटनांनी करून सुखद धक्का दिला. त्यामुळे पुण्यात जाणाऱ्या बहिणींसाठी प्रवास खूपच सुखकर झाला. पुणे स्टेशन येथील रिक्षा मित्र प्रीपेड बूथवरुन प्रवास करणाऱ्या महिला प्रवाशांना मोफत प्रवास करता आला. १०० रुपयापर्यंतचा प्रवास महिलांना मोफत करता आला. तसेच १०० रुपयांपेक्षा जास्त भाडे झाले तर त्या भाड्यातून १०० रुपयांची सूट देखील देण्यात आली. ही सुविधा रक्षाबंधनानिमित्त सकाळी ८ ते रात्री ८ वाजेपर्यंत महिलांसाठी राबविण्यात आली. सोमवारी महाराष्ट्रात घराघरात रक्षाबंधन सण साजरा केला. बहिणीने आपल्या भावाला राखी बांधून प्रेमाचे नाते दृढ केले.

# 'एक धाव सुरक्षेची' स्पर्धेद्वारे जनजागृती



**पुणे :** जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या संयुक्त विद्यमाने 'एक धाव सुरक्षेची' या उपक्रमांतर्गत मॅरेथॉन स्पर्धा आयोजित करण्यात आली. पोलीस अधीक्षक कार्यालय मैदान येथे अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे आणि निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांच्या हस्ते स्पर्धेचा शुभारंभ करण्यात आला.

## मनोरुग्ण भगिनींच्या आशिर्वादाने कामाला उर्जा मिळते: मुळीक

# मनोरुग्णालयातील रुग्णांसमवेत अनोखे 'रक्षाबंधन' साजरे !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**येरवडा :** मनोरुग्णांना समाजात स्थान दिले जात नाही. मानसिक रुग्णांकडे वेगळया नजरेने पाहिले जाते. त्यांना स्विकारले जात नाही है दुदैव आहे. मनोरुग्णालयातील भगिनी सोबत रक्षाबंधन साजरे केल्यानंतर वेगळी ऊर्जा मिळते. या भगिनीच्या आर्शिवादाने काम करायला बळ मिळते असे मत माजी आमदार जगदिश मुळीक यांनी व्यक्त केले. गेल्या अनेक वर्षापासून जगदीश मुळीक फाउंडेशनच्या वतीने येरवडयातील मनोरुगणालयात रक्षाबंधन साजरे करण्यात आले. यावेळी जगदिश मुळीक बोलत होते.

यावेळी माजी स्थायी समिती अध्यक्ष योगेश मुळीक, उद्योजक फतेचंद रंका,संदीप सातव,राजेश मित्तल, अर्जुन जगताप, माजी नगरसेवक भगवान जाधव, ऐश्वर्या जाधव संतोष राजगुरू शामा जाधव, प्रताप मोहिते, राजू बाफना, राजू साखरे, मुकुंद गलांडे, रमेश घावणे, गणेश बाबर राजू केसरकर, राहुल जाधव, सुभाष हेमंत परदेशी, विजय चौघुले, शशिकांत कुलकर्णी, नितीन बर्गे, भूषण सोनवणे, सागर कांबळे, सुहास कांबळे, धनंजय बाराते, यांच्यासह पदाधिकारी व स्थानिक नागरीक उपस्थित होते.

## थोरले बाजीराव पेशवे जयंती निमित्त आयोजन

# भव्य दुचाकी रॅलीद्वारे जयघोष

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ पुणे जिल्ह्याने, थोरले बाजीराव पेशवे यांच्या ३२४ व्या जयंतीनिमित्त आयोजित केलेली यशस्वी दुचाकी रॅलीचे आयोजन केले होते. बालगंधर्व येथील झाशीच्या राणीच्या पुतळ्याला अभिवादन करुन जयघोषात निघालेल्या रॅलीने केसरीवाडा येथे लोकमान्य टिळकांच्या पुतळ्याला अभिवादन केले. शनिवार वाडा येथे थोरले बाजीराव पेशवे यांच्या पुतळ्याला नमन करुन रॅलीची समाप्ती झाली. पुणे शहर व्यतिरिक्त वाघोली, हडपसर, शिक्रापूर, बालेवाडी, नसरापूर या भागातून अनेक



पेशवे प्रेमी मोठ्या संख्येने आवर्जून उपस्थित राहिले. अर्धा जंगली महाराज मार्ग रॅलीने व्यापला. १५० पेक्षा जास्त गाड्या, शिस्तबद्ध रॅली, समाजपयोगी घोषणा, सर्व भगवेमय वातावरण, पारंपरिक पेहरावाद्वारे सर्वांचा उत्स्फूर्त सहभाग यांनी रॅली अतिशय यशस्वी पार पडली.

थोरले बाजीराव यांच्या उत्कृष्ठ पेहराव परिधान केलेल्या नील धडफळेने खास रॅलीसाठी मागवलेल्या रोल्स राईस गाडीतून सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

कार्यक्रमाला शनिवाड्यावर विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

- संपूर्ण शनिवार वाडा परिसर अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या या उपक्रमाने व्यापून टाकला होता.
- या रॅलीच्या निमित्ताने अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या, पुणे जिल्ह्याच्या वतीने दोन प्रमुख मागण्या सरकारपुढे मांडल्या.
- शनिवारवाडा प्रांगणात भव्य अशी पेशवे सृष्टी निर्माण व्हावी
- पुणे एअरपोर्ट ला थोरले बाजीराव पेशवे एअरपोर्ट असे नामकरण करण्यात यावे.
- याबाबत चा राज्यसरकार शी पत्रव्यवहार सुरू आहे अशी माहिती पुणे जिल्हाध्यक्ष मंदार रेडे यांनी दिली.

#रा

## अनोख्या रक्षाबंधनासह संस्कृत दिन साजरा

**पुणे :** शनिवारी न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग प्रशालेत रक्षाबंधन आणि संस्कृत दिन कार्यक्रम साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. विनया क्षीरसागर उपस्थित होत्या. आपल्या भाषणातून त्यांनी आपली वाणी, आपली भाषा शुद्ध होण्यासाठी संस्कृत शिकणे महत्त्वाचे आहे प्रत्येक विषयाचे मूलज्ञान आणि प्रगतज्ञान हे आपल्याला संस्कृत मधूनच मिळते. संस्कृत दिन आणि रक्षाबंधन यांचा जवळचा संबंध आहे असे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात मुख्याध्यापिका चारुता प्रभुदेसाई यांनी रक्षाबंधन आणि संस्कृत दिनाचे महत्त्व सांगितले रक्षाबंधन सण आपण का साजरा करतो हे प्रतिभा वडनेरकर यांनी चिंतनातून व्यक्त केले.

यावेळी प्रशालेतील स्वच्छता कर्मचारी आणि सुरक्षा कर्मचारी यांच्या प्रति बांधिलकी म्हणून विद्यार्थ्यांनी त्यांना भेटवस्तू देऊन राखी बांधली. तसेच विद्यार्थ्यांची वाहतूक करणारे सर्व रिक्षा आणि व्हॅन काकांना विद्यार्थ्यांनी राखी बांधली. प्रशालेतील प्रत्येक घटकाप्रती कृतज्ञता म्हणून प्रयोगशाळा




साहित्य, संगणक कक्ष शालेय परिसरातील वृक्ष,शाळेचे महाद्वार तसेच शालेय बागेतील श्रीकृष्ण मूर्तीला विद्यार्थ्यांनी राखी बांधली आणि सामाजिक रक्षाबंधन साजरे केले. वर्गावर्गात विद्यार्थ्यांनी एकमेकांना व शिक्षकांना राखी बांधून एकमेकांविषयी बंधुभाव दृढ केला. याप्रसंगी संस्कृत दिनानिमित्त प्रशालेतील शिक्षिकांनी संस्कृतगीत गायन केले. विद्यार्थ्यांनी मंगलाचरण सादर करून कार्यक्रमाची सुरुवात केली. नाट्यसंवाद , स्तोत्रवाङमय, संस्कृत कथा,गीत यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केले. प्रशालेतील ३६ वर्गांमध्ये ३६ संस्कृत सुविचारांचे लेखन करण्यात आले.

### स्थानिक उत्पादकांनाच महत्व द्यावे : 'कॅट'चे व्यापाऱ्यांना व ग्राहकांना आवाहन

# बाजारपेठेतील अर्थव्यवस्थेला 'राखी'चे कवच

**पुणे :** कन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स (CAIT) ही देशभरातील व्यापाऱ्यांची सर्वोच्च संघटना आहे. यावर्षी राखी सणादरम्यान देशभरात १२ हजार कोटींहून अधिक सणासुदीच्या व्यापाराची अपेक्षा आहे. राखीच्या खरेदीसाठी बाजारपेठेत मोठी गर्दी होत असून लोकांमध्ये सणाबद्दल प्रचंड उत्साह आहे. गेल्या अनेक वर्षांपासून देशात फक्त स्वदेशी राख्या विकल्या जात आहेत आणि या वर्षीही बाजारात चायनीज राख्यांना मागणी नव्हती किंवा त्यांची उपस्थितीही दिसत नाही.स्थानिक पुण्याच्या सीड राखीला भारत भरातुन मागणी वाढली, अशी माहिती कॉन्फरडेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स कॅट महाराष्ट्र राज्यचे अध्यक्ष तसेच पुणे जिल्हा रीटेल व्यापारी संघ चे अध्यक्ष सचिन दिनकर निवंगुणे यांनी दिली.

श्री भरतिया आणि श्री खंडेलवाल यांनी सांगितले की, १९ ऑगस्टपासून रक्षाबंधनापासून सुरू होणारा आणि सणाचा कालावधी तुलसी विवाहाच्या दिवशी १५ नोव्हेंबरपर्यंत वाढवल्यामुळे देशातील बाजारपेठांमध्ये सणासुदीच्या विक्रीतून ₹ ४ लाख कोटींहून अधिकची अपेक्षा आहे.




**राख्यांची मागणी वाढली**

- २०२४.............₹ १२,००० कोटीं
- २०२३ ............₹ १०,००० कोटी
- २०२२ ...........₹ ०७,००० कोटी
- २०२१ ...........₹ ०६,००० कोटी
- २०२० ........... ₹ ०५,००० कोटी
- २०१९.............₹ ०३,५०० कोटी
- २०१८ ........... ₹ ०३,००० कोटी

● महाराष्ट्र अध्यक्ष सचिन निवंगुणे २५ वर्ष संघटनेच्या माध्यमातून काम करत आहेत, त्यांनी सांगीतले की या वर्षीची उत्सव मालिका रक्षाबंधनापासून सुरू होईल आणि जन्माष्टमी, १० दिवसीय गणेश उत्सव, नवरात्री, दुर्गा पूजा, दसरा, करवा चौथ, धनत्रयोदशी, दिवाळी (लक्ष्मीपुजन), गोवर्धन पूजा (वसुबारस), भाऊबीज, छठ पूजा आणि इतर सणांपर्यंत सुरू राहील, ज्याचा समारोप होणार आहे. तुळशी विवाह. या सणासुदीच्या काळात,नंतर लग्न सोहळा सुरू होतो देशभरातील व्यापारी समुदाय ग्राहकांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी पूर्णपणे तयार आहे आणि व्यापाऱ्यांनी सर्व उत्पादनांचा पुरेसा साठा केला आहे. देशभरातील सर्व राज्यांतील व्यापारी फक्त भारतीय वस्तू विकतील, कारण ग्राहकही आता भारतीय उत्पादनांना मागणी करू लागले आहेत. गेल्या चार वर्षांपासून, CAIT देशात व राज्यात विशेषत: सणांच्या काळात, भारतीय उत्पादनांच्या खरेदीला आणि चिनी वस्तूंवर बहिष्कार टाकण्यासाठी व स्थानिक उत्पादकांनाच महत्व देण्याची मोहीम यशस्वीपणे राबवत आहे.



"यावर्षी राख्यांचे खास वैशिष्ट्य म्हणजे देशभरातील विविध शहरांतील प्रसिद्ध उत्पादनांमधून खास प्रकारच्या राख्या बनवण्यात आल्या आहेत. यामध्ये नागपुरातील खादी राखी, जयपूरची सांगणेरी आर्ट राखी, पुण्याची सीड राखी, मध्य प्रदेशातील सतना येथील लोकरीची राखी, आदिवासी वस्तूंपासून बनवलेली बांबूची राखी, आसामची चहाच्या पानांची राखी, कोलकाता येथील ज्यूट राखी, मुंबईची सिल्क राखी, या राखींचा समावेश आहे. केरळची खजूर राखी, कानपूरची पर्ल राखी, बिहारची मधुबनी आणि मैथिली आर्ट राखी, पाँडिचेरीची सॉफ्ट स्टोन राखी, बंगलोरची फ्लॉवर राखी आणि बरेच काही. तिरंगा राखी, वसुधैव कुटुंबकम राखी, भारत माता राखी यासारख्या राष्ट्रीय अभिमानाचे प्रदर्शन करणाऱ्या राख्यांनाही जास्त मागणी आहे. याशिवाय डिझायनर राख्या आणि चांदीच्या राख्यांचीही बाजारात चांगली विक्री होत आहे."

— **खासदार प्रवीण खंडेलवाल**
सीएआयटीचे राष्ट्रीय सरचिटणीस

## अवतीभवती
CITY UPDATE



### आश्वासक युवा कलाकारांच्या सादरीकरणाने रसिक मंत्रमुग्ध

**पुणे :** लय-तालाच्या असंख्य भावमुद्रा दर्शवत बहारदार कथक नृत्याचे सादरीकरण, युवा शास्त्रीय गायिकेचे सुरेल गायन तर आश्वासक युवा तबलावादकांच्या दमदार सादरीकरणाने रसिक मंत्रमुग्ध झाले. आवर्तन गुरुकुल आयोजित गुरुपौर्णिमा उत्सवात तिसऱ्या दिवशी (रविवारी) गुरू शमा भाटे यांच्या विद्यार्थिनींची कथक नृत्यप्रस्तुती, पंडित निषाद बाकरे यांच्या शिष्येचे गायन तर पंडित रामदास पळसुले यांच्या शिष्यांचे तबलावादन झाले. आवर्तन गुरुकुलात गायन-वादन-नृत्य या कलांचे विद्यार्थ्यांना कुठल्याही मोबदल्याविना प्रशिक्षण देऊन त्यांना त्यांच्या कलेच्या सादरीकरणासाठी मंच उपलब्ध करून जातो. सुमारे सव्वाशेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना येथे प्रशिक्षणाद्वारे कलाकार म्हणून घडविले जात आहे. उत्सवाचे यंदाचे तिसरे वर्ष आहे. शकुंतला शेट्टी ऑडिटोरियम, कर्नाटक हायस्कूल, एरंडवणे येथे या उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. गुरुपौर्णिमा उत्सवाच्या तिसऱ्या दिवसाची सुरुवात कथक नृत्याच्या सादरीकरणाने झाली. उत्तम पदन्यास, पढंत, अभिनय हे सादरीकरणाचे वैशिष्ट्य ठरले.

### पु. ल. देशपांडे उद्यान शौचालयात धक्कादायक प्रकार समोर

**पुणे :** सिंहगड रोडवरील पु. ल. देशपांडे गार्डनमध्ये फिरायला आलेल्या महिलांचे शौचालयात मोबाईलवर फोटो काढला जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी पर्वती पोलिसांनी एकावर गुन्हा दाखल केला आहे. याबाबत एका ५० वर्षाच्या महिलेने पर्वती पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी विकास चंद्रकांत पवार (रा. जनता वसाहत, सिंहगड रोड – याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी या त्यांच्या शेजारी राहणाऱ्या एका ६० वर्षाच्या महिलेसह पु. ल. देशपांडे गार्डनमध्ये फिरायला येत असतात. नेहमीप्रमाणे शनिवारी सायंकाळी त्यात गार्डनमध्ये फिरायला गेल्या होत्या. वॉशरुमसाठी त्या गार्डनमधील शौचालयात गेल्या. त्यावेळी विकास पवार याने शौचालयाचे खिडकीतून डोकावून त्यांचे मोबाईलमध्ये फोटो काढले. पवार हा फिर्यादीच्या ओळखीचा असून तो फोटो काढतो, हे लक्षात येताच त्यांनी आरडाओरडा केला. त्यानंतर तो पळून गेला. पर्वती पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पोलीस उपनिरीक्षक पाटील तपास करीत आहेत.

### अन्यथा पालिकेकडून होणार सवलत रद्द

# भाडेकरू असलेल्या मिळकतींचे आता सर्वेक्षण

**पुणे :** महापालिकेकडून या पुढे नियमितपणे ४० टक्के सवलत दिलेल्या मिळकतींचे सर्वेक्षण केले जाणार आहे.महापालिकेकडून शहरातील ज्या निवासी मिळकतीमध्ये स्वत: मिळकतधारक राहतात त्या मिळकतीस कर आकारणीत ४० टक्के सवलत देण्यात येते. मात्र, ही सवलत घेतल्यानंतर अनेक मिळकतधारक आपली घरे भाडेकराराने देत असल्याचे प्रकार समोर आले आहेत.

तसेच, ज्या ठिकाणी भाडेकरू आढळून येतील त्यांची सवलत रद्द केली जाणार आहे. तसेच, त्यांच्याकडून २०१९ नंतरच्या सवलतीची रक्कमही वसूल केली जाणार असल्याची माहिती प्रशासकीय सूत्रांनी दिली.

महापालिका हद्दीत समाविष्ट ३४ गावांसह सुमारे १४ लाख २५ हजार मिळकती आहेत. त्यात, ९ लाख मिळकती या निवासी आहेत. महापालिका १९७० पासून निवासी मिळकतींना ४० टक्के कर सवलत देते.पण, २०११ मध्ये शासनाकडे त्यावर आक्षेप घेत ही सवलत रद्द करण्याच्या सूचना केल्या. पण, प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी २०१९ पासून सुरू झाली. त्यानंतर महापालिकेने त्यापूर्वीच्या सुमारे ९७ हजार मिळकतधारकांची सवलत रद्द करत त्यांच्याकडेही फरकाच्या रकमेची मागणी केली.



**पालिकेला आली जाग**

● मागील वर्षी शासनाच्या आदेशानंतर महापालिकेने सरसकट ही सवलत दिली होती. त्याचा, फटका महापालिकेच्या उत्पन्नाला बसला आहे. त्यामुळे, पालिकेकडून हा निर्णय घेण्यात येणार असल्याचे सूत्रांनी स्पष्ट केले.

त्यानंतर शासनाने २०२३ मध्ये ही सवलत कायम ठेवण्याचा निर्णय दिला. त्यामुळे, पालिकेने २०२३-२४ या आर्थिक वर्षात सरसकट सर्व निवासी मिळकतींना ही सवलत दिली. तसेच ती कायम ठेवायची असल्यास पीटी-३ अर्ज भरण्यास सांगण्यात आले. मात्र, शहरात ही सवलत न मिळालेल्या साडेपाच लाख मिळकती असताना पालिकेकडे प्रत्यक्षात ९५ हजार अर्ज आले. त्यानंतर पालिकेने ज्यांनी पीटी-३ अर्ज भरले नाहीत त्यांना १०० टक्के दराने २०२४-२५ बिली पाठविली.

त्यानंतर जागे झालेल्या नागरिकांनी पालिकेकडे तगादा लावत पुन्हा पीटी-३ अर्ज भरण्याची मुदत मागितली त्यानुसार पालिकेने १५ ऑगस्ट पर्यंतची मुदत दिली तसेच पालिकेनेही शहरात सवलत नसलेल्या ४ लाख ५२ हजार मिळकतींचे सर्वेक्षण केले. यात तब्बल २ लाख मिळकतींमध्ये भाडेकरू आढळून आले आहेत.

### सिव्हिलकोर्ट ते स्वारगेट मेट्रो सेवेला ऑगस्टमध्ये हिरवा कंदील

**पुणे :** फेब्रुवारी २०२४ मध्ये, महा मेट्रोकडून दिवाणी न्यायालय आणि स्वारगेट दरम्यान रेकची चाचणी चालवली होती. दिवाणी न्यायालय ते स्वारगेटपर्यंत मेट्रो सुरू करण्याला प्राधान्य देण्याची योजना असतानाच महा मेट्रोच्या अधिकाऱ्यांनी कात्रज विस्ताराचे काम सुरू करण्याची तयारी दर्शवली आहे.

सिविल कोर्ट ते स्वारगेट पर्यंतची मेट्रो सेवा ऑगस्टमध्ये जनतेसाठी खुली होणे अपेक्षित होते. मात्र, तांत्रिक बाबींमुळे ते काम लांबणीवर पडले. आता बांधकाम अंतिम टप्प्यात सुरू असून येत्या काही दिवसांत ते पूर्ण होण्याची अपेक्षा आहे, असा अहवाल अधिकाऱ्यांनी दिला आहे. त्यामुळे सिविल कोर्ट ते स्वारगेट हा पूर्णपणे भूमिगत मेट्रो मार्ग सप्टेंबरच्या मध्यापर्यंत सुरू होण्याचे अपेक्षा आहे. मिळालेल्या माहितीनुसार, 'काम पूर्णत्वाच्या जवळ आल्याने, महा मेट्रोने मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्त यांच्याशी संपर्क साधला आहे. तीन स्थानकांसह संपूर्ण भागासाठी सुरक्षा तपासणीची व्यवस्था केली आहे. सप्टेंबरच्या मध्यापर्यंत हा मार्ग सुरू करण्यासाठी सर्व आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे,' असे महा मेट्रोच्या अधिकाऱ्याने सांगितले. गणेशोत्सवाच्या अखेरीस स्वारगेट मार्ग सुरू होईल, अशी आशा प्रवाशांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

### आयएमए आणि सिम्बॉयसिसतर्फे

# नवीन मॅनेजमेंट अकाऊंटिंग अभ्यासक्रम सुरू

**पुणे :** जगभरातील हिशेबनीस आणि आर्थिक व्यावसायिकांची संघटना इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अकाऊंटंट्स (आयएमए) सिम्बॉयसिस स्कूल ऑफ आर्ट्स अँड कॉमर्सच्या सहकार्याने सर्टिफाईड मॅनेजमेंट अकाऊंटंट (सीएमए) हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करत आहे. एका सहकार्य कराराच्या (एमओयू) माध्यमातून या सहयोगाला औपचारिक स्वरूप देण्यात आले आहे. याद्वारे वाणिज्य पदवीधरांना जागतिक पातळीवर आकर्षक करिअरची संधी लाभणार आहे. मॅनेजमेंट अकाऊंटिंग क्षेत्रातील विद्यार्थ्यांची व्यावसायिक क्षमता उंचावण्याच्या दृष्टीने हे एक लक्षणीय पाऊल ठरणार आहे.

या एमओयूनुसार सिम्बॉयसिस आपल्या विद्यार्थ्यांना आयएमएचे व्यावसायिक अभ्यासक्रम उपलब्ध करून देईल आणि ते



त्यांच्या अभ्यासासाठी पूरक ठरतील. यामध्ये आर्थिक नियोजन, कामगिरी, विश्लेषण आणि धोरणात्मक आर्थिक व्यवस्थापन यावर केंद्रित असलेल्या आयएमएच्या प्रतिष्ठेच्या प्रमाणपत्राचा समावेश आहे. त्यामुळे पदवीधरांना अष्टपैलूत्व येईल आणि विविध व्यावसायिक वातावरणात ते उत्कृष्ट ठरण्याची हमी मिळेल.

आयएमएचे अध्यक्ष मायकल डेप्रिसो म्हणाले, "जागतिक बाजारपेठेच्या झपाट्याने बदलणाऱ्या परिस्थितीच्या संदर्भात भावी व्यावसायिकांना सर्वसमावेशक कौशल्याने समृद्ध करणे सर्वाधिक महत्त्वाचे आहे. जागतिक पातळीवर मॅनेजमेंट अकाउंटिंगचा प्रसार करण्याच्या मिशनमध्ये सिम्बॉयसिस सोबतची भागीदारी हे एक लक्षणीय पाऊल आहे.

### ढोल ताशा पथकातील वादक भगिनींकडून


# पुनीत बालन यांच्यासाठी अनोखे रक्षाबंधन

**पुणे :** शहरातील गणपती मंडळे आणि ढोल ताशा पथकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे आणि हिंदुस्थानातील पहिला सार्वजनिक गणपती श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्टचे उत्सव प्रमुख पुनीत बालन यांच्यासोबत शहरातील विविध ढोल ताशा पथकातील वादक भगिनींनी राखी बांधत अनोख्या पद्धतीने रक्षाबंधनाचा सण साजरा केला.

युवा वाद्य पथकाच्या पुढाकाराने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या संकल्पनेला सर्वच वाद्य पथकांतील वादक भगिनींनी भरभरून प्रतिसाद दिला. शहरातील रुद्रांग, नूमवि, आदिमाया, शिवाय नमः, नाद वरदहस्त, स्वराज्य, वादक युवा मंच, शिवतेज



आदी ढोल ताशा पथकातील भगिनींनी पुनीत बालन यांना राखी बांधली. या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन युवा वाद्य पथकाचे विश्वस्त गणेश देशपांडे, अमर आढाळगे, स्वप्निल काळे, अपूर्वा राजमाने,



अनघा महाशब्दे यांनी केले होते.

शेकडो भगिनींनी राखी बांधल्यानंतर बालन भावुक झाले. गणपती मंडळे आणि वाद्य पथकांनी भारतीय संस्कृतीचे जतन केले आहे.अडचणीच्या काळात त्यांच्या पाठीशी उभे राहणे एक भाऊ म्हणून माझे कर्तव्य आहे. भावा-बहिणीच्या नात्यातील हा बंध अधिक दृढ झाला असून, वादक भगिनींच्या रूपाने असंख्य बहिणींचा आशीर्वाद मला लाभला आहे, अशी भावना पुनीत बालन यांनी व्यक्त केली.

### शिक्षण विभागासाठी ५३५ पदे मंजूर; तरी केवळ २२७ पदेच कार्यरत

# पालिकेतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा बट्ट्याबोळ

**पुणे :** शिक्षण विभागाच्या माहितीनुसार, माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभागासाठी ५३५ पदे मंजूर असून त्यातील केवळ २२७ पदे कार्यरत आहेत. परिणामी, एकाच कर्मचाऱ्यावर दुप्पट कामाचा भार पडत आहे. खासगी शाळांमधील भरमसाठ शुल्कामुळे आर्थिक दुर्बल घटकांमधील कुटुंबातील मुले माध्यमिक शिक्षण घेत नाहीत, अशा मुलांसाठी महापालिकेकडून माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभागाच्या माध्यमातून सुमारे ४३ विद्यालये चालविली जातात.त्या अंतर्गत सुमारे १५

● प्रामुख्याने ४१ विद्यालयांसाठी २९९ शिक्षकांची आवश्यकता

● प्रत्यक्षात १३३ शिक्षकांवरच या शाळांचा कारभार सुरू

● तर ग्रंथपाल, प्रयोगशाळा, आयटीआयसाठीचे निदेशक अशी अनेक पदे रिक्त आहेत.

हजार मुले शिक्षण घेत आहेत.मात्र, या शाळांत शिक्षण तसेच व्यवस्थापनासाठी आवश्यक मनुष्यबळच महापालिकेकडे नसल्याने शाळांच्या गुणवत्तेला त्याचा फटका बसत आहे.

महापालिका माध्यमिक शिक्षण विभागासाठी वर्षाला तब्बल १२५ कोटींचा खर्च करते. मात्र, त्यानंतरही अपूरी कर्मचारी संख्येचा शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होत असल्याचे वास्तव आहे.

शहरात सुमारे २८ टक्के कुटूंब वस्त्यांमध्ये राहतात. यातील अनेक मुलांचे प्राथमिक शिक्षण झाल्यानंतर खासगी शाळांची फी परवडत नसल्याने ती शाळाबाह्य होतात. तसेच बालमजूर म्हणून काम करतात. त्यातच, कोणतेही व्यावसायिक शिक्षण नसल्याने पुढे ती बेरोजगार होतात. ही बाब लक्षात घेऊन महापालिकेने माध्यमिक शिक्षण विभाग सुरू केला. या मुलांना माध्यमिक, उच्च माध्यमिक व तांत्रिक शिक्षणाची मोफत संधी उपलब्ध करून देणे हा त्यामागील महत्वाचा उद्देश आहे. मात्र, प्रत्यक्षात शिक्षक तसेच अपूऱ्या कर्मचारी संख्येने मुळ उद्देशालाच हरताळ फासला जात आहे.

### चिमुकल्यांची जवानांसोबत राखीपौर्णिमा

**पुणे :** रक्षाबंधन सण म्हणजे भावाबहिणीचे पवित्र नात्याचे प्रतिक. असा हा सण टिळक रोडवरील डेक्कन एज्युकेशन सोसायटीची मुरलीधर लोहिया मातृमंदिर शाळेत अगदी आगळ्यावेगळ्या पध्दतीने साजरा केला. शाळेतील मुलींनी कॉलेज ऑफ मिलिटरी, खडकी येथे सदिच्छा भेट दिली. जवानांना भेटण्यासाठी सर्वजण उत्सुक होते. मुलींनी जवानांना बांधण्यासाठी राखी बरोबर घेतली होती. कॉलेज ऑफ मिलिटरी येथे पोचल्यावर तेथील जवानांनी सर्वांचे मनापासून स्वागत केले. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती वंदनेने झाली. आपण आणलेली राखी हातात घेऊन मुली प्रत्येक जवानांना कौतुकाने राखी बांधून जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.



प्रत्येक जवानही आनंदाने राखी बांधून घेत होते. यावेळी लेफ्टनंट कर्नल सोनल रजपूत, कर्नल प्रशांत जस्साल आणि लेफ्टनंट कर्नल विवेक नेने आवर्जून उपस्थित होते.

# मीठ, साखरेत प्लास्टिक?

सर्वच स्वयंपाकघरांत मीठ, साखर हे पदार्थ असतातच. मीठ आणि साखरेशिवाय जेवणाला चवच येत नाही. मिठाचा वापर जेवणाची चव वाढवण्यासाठी केला जातो तर साखरेचा वापर गोड पदार्थ, चहा-कॉफी बनवण्यासाठी केला जातो. दैनंदिन जीवनात वापरल्या जाणाऱ्या पदार्थांमध्ये मीठ-साखरेचा वापर केला जातो पण आता मीठ आणि साखर खाणे आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते. कारण नुकत्याच करण्यात आलेल्या संशोधनातून या पदार्थांमध्ये मायक्रो प्लास्टिकचे कण आढळून आले आहेत म्हणे! भारतातील बाजारपेठेत विकल्या जाणाऱ्या सर्व ब्रँडच्या मीठ आणि साखरेमध्ये मायक्रो प्लास्टिकचे कण आढळून आले आहेत. 'टॉक्सिक्स लिंक' या पर्यावरण संशोधन संस्थेने केलेल्या अभ्यासात असा दावा करण्यात आला आहे. यासाठी संस्थेने पांढरे मीठ, सेंद्रीय खडे मीठ, समुद्री मीठ आणि कच्चे मीठ यासह इतर १० विविध घटकांचा अभ्यास केला. तसेच त्यांनी ऑनलाईन आणि बाजारपेठेमधून खरेदी करण्यात आलेल्या साखरेच्या नमुन्यांची तपासणी केली असता त्यात फायबर, पेलेट्स, फिल्म्स आणि इतर तुकडे आढळून आले. मीठ आणि साखरेमध्ये आढळून आलेले मायक्रोप्लास्टिक्स मानवी आरोग्यासाठी घातक आहे ही मोठी चिंतेची बाब असून मायक्रोप्लास्टिक्सचा मानवी आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो. मीठ आणि साखरेमध्ये सापडलेले प्लास्टिकचे कण अन्न, पाणी आणि हवेतूनही मानवी शरीरात प्रवेश करू शकतात. आजकाल लोकांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता वाढत आहे. गंभीर आजारांचे वाढते प्रमाण लक्षात घेता, लोक आपल्या खाण्या-पिण्याच्या सवयींमध्ये चांगले बदल करीत आहेत. अनेकांनी आपल्या जेवणातील मीठ-साखरेचे प्रमाणही कमी केले आहे. मात्र, साखर-मिठाशी संबंधित एक धक्कादायक अहवाल समोर आला आहे. त्यानुसार आयोडिनयुक्त मीठ आणि उत्तम दर्जाची साखर विकण्याचा दावा करणाऱ्या बाजारातील नामांकित कंपन्या मानवी आरोग्यासाठी हानीकारक आहेत म्हणे. मायक्रोप्लास्टिक्स हे अत्यंत लहान प्लास्टिकचे कण आहेत. ते इतके बारीक आणि सूक्ष्म असतात की ते सहज डोळ्यांना दिसू शकत नाहीत. प्लास्टिकचे हे कण किती धोकादायक आहेत आणि यामुळे कर्करोगाचा धोका निर्माण होऊ शकतो का याबाबत अजून स्पष्टता झालेली नाही. या संदर्भातील काही संशोधनात असे म्हटले आहे की, मायक्रोप्लास्टिकमुळे शरीरात सूज आणि इतर समस्या उद्भवू शकतात. जेव्हा हे कण शरीरात दीर्घकाळ राहतात तेव्हा ते पेशींना नुकसान पोहोचवू शकतात. त्यासाठी रोजच्या जीवनशैलीतून प्लास्टिकचा वापर करणे टाळावे लागेल. विशेषत: खाद्यपदार्थ प्लास्टिकमध्ये ठेवले जाणार नाहीत याची काळजी घ्यावी लागेल. नॉर्मल पाणी पिण्याऐवजी फिल्टर केलेले पाणी प्यायला हवे. प्लास्टिकच्या बाटल्यांमधील पाणी पिणेही टाळावे लागेल कारण यातूनही मायक्रोप्लास्टिकचा धोका उद्भवू शकतो. बाजारातून तयार मसाले विकत घेण्याऐवजी घरीच मसाले बनवणे चांगले. मायक्रोप्लास्टिकचा आकार ०.१ ते ५ मि.मी.पर्यंत नोंदवला गेला आहे. आयोडीनयुक्त मिठातही मायक्रोप्लास्टिकचे प्रमाण जास्त आढळून आले. त्यात सूक्ष्म तंतूच्या स्वरूपात सूक्ष्म प्लास्टिक आढळून आले. संशोधनाचा उद्देश मायक्रोप्लास्टिक्सचा डेटाबेस गोळा करणे हा होता. ज्यामुळे आंतरराष्ट्रीय प्लास्टिक करारांतर्गत सर्व संघटनांचे लक्ष या मुद्यावर केंद्रित करता येईल. मायक्रोप्लास्टिकचे धोके कमी करण्याचा त्यांचा उद्देश आहे. राज्यात दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना राज्य सरकारमार्फत महिन्याला मोफत तांदूळ आणि गहू वितरित केले जाते. मात्र, अलीकडे रेशनवर मिळणाऱ्या तांदळातही प्लास्टिकसदृश तांदूळ मिळत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे रेशनवर निकृष्ट दर्जाचा तांदूळ मिळतो असा समज अनेकांच्या मनात निर्माण झाला आहे. हा तांदूळ खावा की नाही असा प्रश्न केला जात आहे. परंतु रेशनच्या तांदळात असे तांदूळ आढळले तर ते प्लास्टिकचे नव्हे, पौष्टिक तांदूळ आहेत असा खुलासा करण्यात आला आहे. हा तांदूळ शिजवल्यानंतर त्याचे बारीक पीठ होते. त्यामुळे नक्की हा तांदूळच आहे का अशी शंका येणे साहजिक आहे. आता पॅक्ड फूडसाठी (डबाबंद) नवीन नियमानुसार कंपन्यांना ठळक आणि कॅपिटल अक्षरांमध्ये मीठ, साखर आणि चरबीचे प्रमाण घोषित करावे लागणार आहे. पॅक केलेल्या पदार्थासंबंधीची माहिती ठळक अक्षरात आणि ठळक फॉन्टमध्ये दाखवावी लागेल. पॅक केलेल्या खाद्यपदार्थांच्या लेबलवर मीठ, साखर आणि सॅच्युरेटेड फॅटची माहिती देणे अनिवार्य करण्यात येत आहे. बाजारात अशी अनेक उत्पादने विकली जातात जी आरोग्यदायी म्हणून पॅक केली जातात. परंतु त्यात अनेक असे घटक असतात ज्यामुळे ती आरोग्याला नुकसानकारक ठरतात. अलीकडे पिझ्झा, बर्गर आणि कोल्ड्रिंक्स खूप लोकप्रिय बनली आहेत. जंकफूड हे आपल्या आरोग्यासाठी अजिबात चांगले नाही. त्यामुळे वजन वाढण्यासोबतच उच्च रक्तदाब, मधुमेह यांसारख्या अनेक गंभीर आजारांचा धोका वाढत आहे. अशा पदार्थांच्या अतिसेवनामुळे व्यक्तींमध्ये तणाव आणि चिडचिडेपणाच्या समस्या दिसून येत आहेत. जंकफूडमध्ये शरीरासाठी आवश्यक पोषकतत्वे फार कमी असतात. फायबरचा अभाव आणि साखरेचे प्रमाण जास्त असल्याने रक्तातील साखर वाढते. ज्यामुळे मधुमेहाचा धोका वाढतो तसेच लठ्ठपणाला धोकादायक टप्प्यावर जाण्यास मदत होते. त्यामुळे हे धोकादायक प्रकार टाळण्यासाठी आहारात हिरव्या पालेभाज्या, मोड आलेली धान्ये, फळे यांचा समावेश करणे अत्यंत निकडीचे बनले आहे. बदलती जीवनशैली, पोषक आहाराचा आणि व्यायामाचा अभाव, वाढते ताणतणाव आदी कारणांमुळे आरोग्यविषयक समस्या वाढताना दिसत आहेत. पूर्वी रानमेवा भरपूर प्रमाणात घेतला जायचा, आज त्याचीच गरज आहे. ■

> हवामान बदलाच्या हानिकारक प्रभावांपासून कृषी उत्पादनांचे संरक्षण करण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी संसाधनांचा अधिक चांगला वापर करणे खूप महत्त्वाचे आहे. यासोबतच जलस्रोतांचे संवर्धन, वनक्षेत्राचे संरक्षण, मृदा आरोग्य पत्रिका आदी योजनांच्या माध्यमातून जमिनीची सुपीकता वाढविण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे. मध्यंतरी, पंतप्रधानांच्या हस्ते उच्च उत्पादन देणाऱ्या, हवामानास अनुकूल असणाऱ्या पीक वाणांचे लॉँचिंग करण्यात आले. या बियाण्यांसह धानाचे क्षेत्र वाढवणे हे सरकारचे प्राधान्य आहे. नि:संशयपणे, या भयंकर पर्यावरणीय आव्हानाचा मुकाबला शाश्वत स्वदेशी उपायांद्वारेच करू शकतो. यामध्ये खाजगी क्षेत्राच्या सहभागाचीही गरज आहे.

# बदलते हवामान आणि पीकपद्धती

प्राचीन काळापासून शेतकरी स्थानिक हवामानाच्या परिस्थितीला अनुसरून पिकांची निवड करत होते. मात्र, आता हवामान बदलामुळे पारंपरिक पिके टिकवून ठेवणे अवघड होत आहे. बदलत्या हवामानाच्या परिस्थितीत, काही पिके अनुकूलता दाखवू शकतात, तर काहींचा उत्पादन क्षमतेवर विपरीत परिणाम होऊ शकतो. या संकटावर मात करण्यासाठी शेतकऱ्यांनी अनुकूल पिके घेण्याची गरज आहे. अनुकूल पिके म्हणजे अशी पिके जी विशिष्ट हवामान परिस्थितीत वाढू शकतात, त्यात वाढीव उत्पादन देऊ शकतात, आणि त्यांची प्रतिकारशक्ती जास्त असते. उदा., तापमान वाढीमुळे वाढणाऱ्या तापमानात तग धरू शकणारी पिके, कमी पाण्यावर वाढू शकणारी पिके, आणि कीड प्रतिकारक पिके यांचा समावेश होतो.असे अनुकूल पिके घेणे शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरू शकते. यामुळे पाण्याची बचत होते, जमिनीचे संरक्षण होते, उत्पादन वाढते, आणि शेतीची आर्थिक स्थिरता वाढते. तसेच, अनुकूल पिके घेतल्यामुळे शेतकऱ्यांना बदलत्या हवामानामुळे होणारे नुकसान कमी करता येते.



शेतकऱ्यांनी अनुकूल पिके घेण्यासाठी संशोधन आणि प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. त्यांना नवीन पद्धती, तंत्रज्ञान, आणि पिकांच्या विविधतांबद्दल माहिती देणे गरजेचे आहे. शास्त्रज्ञ, कृषी विद्यापीठे, आणि सरकारी संस्थांनी शेतकऱ्यांना अनुकूल पिकांच्या बाबतीत मार्गदर्शन करायला हवे. त्यासाठी विविध कार्यशाळा, प्रात्यक्षिके, आणि शेतकरी मेळावे आयोजित करणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, महाराष्ट्रातील काही भागात पावसाचे प्रमाण कमी झाल्यामुळे, बाजरी, ज्वारी, मका, आणि मूग या पिकांना प्राधान्य दिले जाते. या पिकांची पाण्याची गरज कमी असते, आणि ती अवर्षणप्रवण क्षेत्रात सहज उगवता येतात. तसेच, काही भागात जलवायु अनुकूल भाताच्या विविधता घेतल्या जातात, ज्यामुळे पाण्याचा वापर कमी होतो, आणि उत्पादन वाढते.जैविक शेतीत वापरल्या जाणाऱ्या पद्धतींचा परिणाम म्हणून जमिनीतील आर्द्रता टिकवून ठेवली जाते, ज्यामुळे अनुकूल पिकांची वाढ अधिक चांगली होते.

हवामान बदलाच्या नकारात्मक परिणामांमुळे आपली अन्नसाखळी धोक्यात आली आहे, ही वस्तुस्थिती कोणापासूनही लपलेली नाही. मान्सूनच्या पद्धतीत बदल, प्राणघातक उष्णतेच्या लाटा, समुद्राची पातळी वाढणे आणि वारंवार येणारी वादळे यामुळे कृषी उत्पादनाला धोका निर्माण झाला आहे. या संदर्भात, इंटर गव्हर्नमेंटल पॅनेल ऑन क्लायमेट चेंजच्या अलीकडील अहवालात या धोक्यांबाबत इशारा देण्यात आला आहे. निश्चितच, हवामान बदलाच्या हानिकारक प्रभावांनी आपल्या शेतात आणि दार ठोठावले आहे, ज्या सामना नवीन धोरणे करून करता येऊ शकतो. हवामान बदलाच्या परिणामांमुळे शेती क्षेत्र आणि पीक उत्पादनात मोठी घट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. विशेषत: मान्सूनच्या पावसावर पूर्णपणे अवलंबून असलेल्या छोट्या शेतकऱ्यांसाठी हे संकट मोठे आहे. अशा परिस्थितीत या प्रतिकूल परिस्थितीत उत्पादन अबाधित ठेवण्यासाठी विशेष पुढाकार घेण्याची गरज आहे.

या दिशेने, भारतीय कृषी संशोधन परिषदेने एक दशकापूर्वी हवामान-अनुकूल शेतीतील नवकल्पनांवर आपला प्रकल्प सुरू केला होता. पंतप्रधानांच्या हस्ते उच्च उत्पादन देणाऱ्या, हवामानास अनुकूल असणाऱ्या पीक वाणांचे लॉँचिंग हा या मालिकेचा एक भाग आहे. या संदर्भात सरकारचे म्हणणे आहे की, गव्हाचे उच्च उत्पादन देणारे बियाणे यशस्वीरित्या तयार केल्यानंतर, हवामान प्रतिरोधक बियाण्यांसह धानाचे क्षेत्र वाढवणे हे त्यांचे प्राधान्य आहे. नि:संशयपणे, आपण या भयंकर पर्यावरणीय आव्हानाचा मुकाबला शाश्वत स्वदेशी उपायांद्वारेच करू शकतो. यामध्ये खाजगी क्षेत्राच्या सहभागाला प्रोत्साहन देण्याची गरज भासू लागली आहे. देशात हवामान बदलाशी जुळवून घेण्यासाठी राबविल्या जाणाऱ्या कार्यक्रमांची कमतरता नाही, परंतु गरज आहे ती उपलब्ध संसाधनांच्या विवेकपूर्ण व्यवस्थापनाला चालना देण्याची. हवामान बदलाच्या हानिकारक प्रभावांपासून कृषी उत्पादनांचे संरक्षण करण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी संसाधनांचा अधिक चांगला वापर करणे खूप महत्त्वाचे आहे. यासोबतच जलस्रोतांचे संवर्धन, वनक्षेत्राचे संरक्षण, मृदा आरोग्य पत्रिका आदी योजनांच्या माध्यमातून जमिनीची सुपीकता वाढविण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे. शेतीत कृत्रिम खतांच्या वापरावरही नियंत्रण ठेवला पाहिजे. या संदर्भात पीक विविधीकरण कार्यक्रमाला गती देण्याची गरज असून यासाठी शेतकऱ्यांना जागरुक करून प्रोत्साहन देण्याची गरज आहे. देशातील अनेक राज्यांमध्ये सेंद्रिय शेतीला मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन दिले जात आहे, हे आनंददायी आहे. मात्र हा कार्यक्रम देशव्यापी व्हायला हवा. या दिशेने प्रोत्साहन योजना शेतकऱ्यांसाठी सेंद्रिय शेतीचा अवलंब करण्याचा मार्ग मोकळा करू शकतात. या दिशेने केवळ नवीन तंत्रज्ञान निर्माण करून समस्या सोडवता येणार नाही, हेही वास्तव आहे. वैज्ञानिक संशोधन शेतांच्या बांधापर्यंत पर्यंत नेण्याची गरज आहे. त्यांचा वापर करून शेतकरी पिकांच्या संवर्धनाला गती देऊ शकतात. किंबहुना, प्रत्यक्षात शेतकऱ्याला त्याच्यासाठी काय उपयुक्त आहे याचे व्यावहारिक समाधान करणे देखील आवश्यक आहे. हवामान अनुकूल कृषी पद्धतींचा अवलंब करण्यासाठी देशातील शेतकऱ्यांमध्ये देशव्यापी एकमत निर्माण करण्याची गरज आहे. त्यासाठी आधुनिक संशोधनाबरोबरच अनुभवजन्य अभ्यासालाही प्राधान्य द्यायला हवे. या प्रयत्नांना खऱ्या अर्थाने गती देण्यासाठी संशोधनासाठी पुरेशी आर्थिक संसाधने उपलब्ध करून देण्याची आणि शेतीसाठी उपयुक्त निष्कर्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याची गरज आहे. या वाढत्या भीषण परिस्थितीत या आव्हानाचा राष्ट्रीय प्राधान्यक्रमांमध्ये समावेश करण्याची गरज आहे. आपण जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश आहोत हे वास्तव जाणून. मोठ्या लोकसंख्येच्या सामाजिक सुरक्षेसाठी, अनेक अन्नधान्य योजना सरकारी धान्य कोठारातून चालवल्या जात आहेत. ज्याची पूर्तता अन्नधान्य उत्पादन वाढवूनच होऊ शकते. हे तेव्हाच शक्य आहे जेव्हा आपली शेती हवामान बदलाच्या दुष्परिणामांचा सामना करण्यास सक्षम असेल. ■

**विकास परशराम मेश्राम**, शेती-पर्यावरण अभ्यासकअभ्यासक


## गुड मॉर्निंग
दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

### पंचांग
**मंगळवार, दिनांक २० ऑगस्ट २०२४**
श्रावण कृ १, श्री शके १९४६, विक्रम शोभन २०७९, क्रोधीनाम संवत्सर, दक्षिणायन, वर्षा ऋतू. शुभ दिवस मंगला गौरी पूजन नक्षत्र : शततारखा, योग : अतिगंड, करण : बालव सूर्योदय : स.०६.२३
सूर्यास्त : सायं.०७.०० वा., राहू काळ : दुपारी : ३:०० ते ४:३०

### दिनविशेष
✻१२२१ : महानुभव पंथाचे संस्थापक चक्रधरस्वामी यांचा जन्म. ✻१८२८ : राजा राममोहन रॉय यांनी ब्राह्मो समाजाची थापना केली. ✻१८९७ : रोनाल्ड रॉय यांनी हिवतापाचा प्रसार ॲनाफेलिस डासांमार्फत होतो, हे भारतात सिद्ध केले. ✻१९४० : बॅटल ऑफ ब्रिटन या नावाने ओळखल्या जाणाऱ्या हवाई युद्धाचा शेवट. ✻१९४१ : फ्रान्समध्ये भूमीगत चळवळ उखडून काढण्याच्या उद्देशाने जर्मनांनी एका दिवसात ५० हजार नागरिकांना अटक केली. यातल्या ज्यूंना छळ छावण्यात रवाना करण्यात आले. ✻१९४४ : राजीव गांधी यांचा जन्म. ✻१९७९ : चरणसिंग सरकार चोविसाव्या दिवशी इंदिरा गांधींनी पाठिंबा काढल्यामुळे कोसळले. ✻१९८४ : पुण्याचे जगप्रसिद्ध जादूगार रघुवीर (भोपळे) यांचे निधन. ✻२००३ : तेलगीप्रकरणी सीबीआयने नाशिकच्या छापखान्यावर छापा घातला.

### राशीभविष्य
✻ **मेष** : शुक्र-मंगळाची राश्यांतरे फायदेशीर.✻ **वृषभ** : धार्मिकस्थळी प्रवास घडेल.✻ **मिथुन** : व्यापारी वर्गाला फायदा. ✻ **कर्क** : जुन्या मैत्रीला उजाळा देईल.✻ **सिंह** : कुसंगतीपासून दूर रहा. ✻ **कन्या** : शेतकरी बांधवांना चांगला दिवस ✻ **तुळ** : तरुणांना नोकरीच्या नव्या संधी.✻ **वृश्चिक** : अंधश्रद्धेला बळी पडू नका. ✻**धनु** : महत्त्वाचे निर्णय घेणं टाळा.✻ **मकर** : इच्छापूर्ती करणारा दिवस.✻ **कुंभ** : विवाहोच्छुकांना अनुकूल दिवस. ✻ **मीन** : प्रतिमा सुधारले. आनंदी दिवस.

### मेसेज आया
जीवनात जे काही कराल,
ते पूर्ण समर्पण करून करा,
भक्ती असावी हनुमंतासारखी,
प्रतीक्षा असावी शबरीसारखी,
प्रेम असावं मीराबाईसारखं,
शिष्य असावा अर्जुनासारखा
आणि मित्र असावे तर, प्रत्यक्ष तुमच्यासारखे




### व्यक्तीविशेष
**लिओन ट्रॉट्स्की**

रशियामध्ये क्रांती झाल्यानंतर १९१७ मध्ये तेथे कम्युनिस्ट राजवट आली. लेनिन या क्रांतीचा नेता होता आणि तोच नंतर रशियाचाही सर्वेसर्वा बनला. त्याच्या राजवटीत अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली ती लिओन ट्रॉट्स्की याने. लेनिनबरोबर काही महत्त्वाचे मतभेद असूनही त्याने लेनिनला साथ दिली आणि रशियाच्या इतिहासात आपला ठसा उमटवला. ट्रॉट्स्कीचा जन्म युक्रेनमधील यानोव्हका येथे ७ नोव्हेंबर १८७९ रोजी झाला. युक्रेन त्यावेळी रशियाचाच एक भाग होता. त्याचे वडील श्रीमंत ज्यू शेतकरी होते. किशोरवयातच तो क्रांतिकारकांच्या गटात सामील झाला. नंतर त्याला अटक झाली आणि त्याला सैबेरियात हद्दपार करण्यात आले. तेथे तो सोशल डेमॉक्रेटीक पक्षाच्या संपर्कात आला. तुरुंगातून तो निसटला आणि पुढील पंधरा वर्षे तो परदेशातच राहिला. १९०३ मध्ये सोशल डेमॉक्रेटीक पक्षात फूट पडली. बोल्शेविक आणि मेन्शेविक असे दोन गट पडले. बोल्शेविकांचे नेतृत्व लेनिनकडे तर मेन्शेविकांचे नेतृत्व ट्रॉट्स्कीकडे होते. १९१७ मध्ये क्रांती झाल्यानंतर ट्रॉटस्की आपले मतभेद विसरून लेनिनला येऊन मिळाला. लेनिनने प्रथम त्याच्याकडे परराष्ट्र खाते आणि नंतर लष्कराची जबाबदारी दिली. दोन्ही ठिकाणी त्याने मोलाची कामगिरी बजावली. रशियन लष्कराची उभारणी करण्यात ट्रॉट्स्कीचा मोठा वाटा आहे.

### बोधकथा
**संपत्तीचा लोभ करू नका !**

गुरू नानकदेव हे महान संत होते. त्यांचा लोकांसाठी सर्वत्र संचार असे. असेच एकदा ते लाहोरला गेले होते. तेथे दुनीचंद नावाचे मोठे व्यापारी होते. ते खूप श्रीमंत होते. त्याकाळी अशी पध्दत होती की, श्रीमंत माणसांच्या घरांवर त्यांच्यावर श्रीमंतीचे प्रतीक असणारे झेंडे असत. जितकी जास्त श्रीमंती तितके अधिक झेंडे नानकदेवांनी शहरातून जातना पाहिले. एका घरावर वीस ते पंचवीस झेंडे होते. 'हे कुणाचं घर?' नानकांनी आपल्या शिष्यांना विचारलं. 'हे दुनीचंद सावकारांचं घर खूप धनाढ्य आहेत ते.' शिष्य म्हणलो. गुरू नानकदेवांची कीर्ती दुनीचंद यांच्या कानांवर गेली होतीच. एक दिवस ते नानकदेवांच्या भेटीला आले . ते समोर बसले असता नानकांनी आपल्या शिष्याला एक वस्तू आणायला सांगितली. ती होती 'छोटीशी सुई 'दुनीचंद ही सुई तुम्ही घरी घेऊन जा आणि पुढच्या जन्मी मला ती परत करा.' नानकदेवांच्या आज्ञेप्रमाणे दुनीचंद ती छोटी सुई घेऊन घरी आले. रात्री झोपले पण बराच वेळ ते तळमळत होते, कारण ते विचार करीत होते. ङ्कनानकदेवांनी ही सुई मला पुढच्या जन्मी परत करायला सांगितली होती, पण ती या जन्मातून मी बरोबर कशी नेणार? कारण जाताना माणसाला आपल्याबरोबर काही नेता येत नाही,''दुसऱ्या दिवशी दुनीचंद ती सुई घेऊन नानकदेवांच्या दर्शनाला गेले. 'नानकदेव, ही सुई मला कशी नेता येणार? ती परत तरी कशी करणार?''होय ना? एवढीशी सुई तुला या जन्मात बरोबर नेता येणार नाही, मग एवढ्या मोठ्या संपत्तीच तू काय करणार?' नानकदेवांनी विचारलं दुनीचंद काय समजायचं ते समजला. छोटीशी सुईसुध्दा बरोबर नेता येत नाही. मग संपत्तीचा हव्यास कशाला? दुनीचंदानं आपली सर्व संपत्ती गोरगरिबांच्या कल्याणासाठी वाटून दिली. तात्पर्य: संपत्तीच्या फार साठा व लोभ करू नये.

### भूगोल
**कामा नदी**

कामा नदी ही रशियातील व्होल्गा नदीची प्रमुख उपनदी आहे. या नदीची लांबी सुमारे २०२० किलोमीटर इतकी असून ती उरल पर्वताच्या नैऋत्येकडील उदमुर्त प्रांतात उगम पावून कझॅनच्या दक्षिणेला ७० किलोमीटरवर व्होल्गा नदीला मिळते. या नदीला उजवीकडून ओब्व्हा, ईझ, व्ह्याटका व डावीकडून व्हीशिर, चुसवाया आणि बेलाया या नद्या मिळतात. ईझखेरीज बाकी सर्व उपनद्या जलवाहतुकीला उपयोगी आहेत. या नदीच्या काठी पर्म हे मोठे शहर वसले आहे. कामा नदीमार्गे लाकूड, कागद, लोहयुक्त धातू, पेट्रोलियम, मीठ, सिमेंट यांची वाहूतक होते.

### नवं संशोधन
**स्तन कर्करोगासाठी जीवाणू कारणीभूत?**

जीवाणू किंवा विषाणूंमुळे अनेक आजार होत असतात; मात्र स्तनाचा कर्करोग व जीवाणू यांचाही संबंध आहे, हे आतापर्यंत कुणालाही वाटले नव्हते. आता 'नासा'च्या जेट प्रॉपल्शन लॅबोरेटरीच्या संशोधकांनी याबाबतचे संशोधन केले आहे. यामध्ये पराग वैशंपायन या भारतीय वंशाच्या संशोधकाचा समावेश आहे. ब्रेस्ट डक्टल मायक्रोबायोम व स्तनाचा कर्करोग यांचा संबंध आहे, असे 'नासा'च्या ग्रहीय संरक्षण तंत्रज्ञानाचा वापर करुन त्यांनी सांगितले. स्तनाचा कर्करोग असलेल्या महिलांमधील द्रवात असणारे जीवाणू व कर्करोग नसलेल्या महिलांतील जीवाणू यांच्यात फरक असतो. या जीवाणूंचे अस्तित्व स्तनाच्या उतींमध्ये यापूर्वीही नोंदले गेले असून त्यांचा प्रत्यक्ष संबंध प्रथमच उलगडण्यात आला आहे. ब्रेस्ट डक्टल सिस्टीममध्ये काही ग्रंथी असतात. त्यात दूध तयार होते, त्यातूनच स्तनाग्राच्या दिशेने एक द्रव जात असतो. त्यातील जीवाणूंची भूमिका तर फार अपरिचित आहे, असे संशोधकांनी सांगितले. त्यांच्या मते स्तनाचा कर्करोग प्रथम स्तनातील पोकळ वाहिन्यांमध्ये सुरु होतो व तो नष्ट करणे किंवा मुळात तो ओळखणे सोपे नसते. स्तनातील द्रवात असलेले जीवाणू वेगळे असतात, असे २३ आरोग्यवान महिला व २५ कर्करोगग्रस्त महिलांमध्ये अभ्यासात दिसून आले.

### सोडवा सुडोकू
सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.


**क्रमांक १९९**

| | | | |
|---|---|---|---|
| | 2 | 3 | 4 |
| 3 | 4 | 1 | |
| 2 | 1 | 4 | |
| | 3 | 2 | 1 |

**क्रमांक १९८ चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | 3 | 1 | 4 |
| 1 | 4 | 2 | 3 |
| 4 | 1 | 3 | 2 |
| 3 | 2 | 4 | 1 |

### हास्यविनोद
**डाकू** : म्हातारे, तुझे नाव काय?
**म्हातारी** : माझे नाव गंगूबाई...
**डाकू** : माझ्या आईचे नाव गंगूबाई होते... मी तुला सोडून देतो...
म्हाताऱ्या तुझे नाव काय आहे?
**म्हातारा** : माझे नाव ग्यानबा आहे; पण लाडाने सगळे मला गंगूबाईच म्हणतात.



### महिलायन
**सफाई गादीची**

गादी स्वच्छ नसेल तर ॲलर्जी होऊन विविध आजारही निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे गाद्या स्वच्छ करायच्या तर वेगवेगळ्या प्रकारांचा अवलंब करता येईल.

आपण झोपतो त्या गादीवर आपल्याला चांगली झोप यावी असं वाटत असेल तर त्या गादीची सफाईही तेवढीच महत्त्वाची आहे. खराब झालेल्या गादीवर धूळ, माती चिकटलेली असेल तर त्यामुळे अनेक आजारांना निमंत्रण मिळू शकतं. ज्यांना अस्थम्याच्या त्रास असतो त्यांच्यासाठी तर अशा गाद्यांवर झोपणं अधिक नुकसानकारक ठरतं. आपणही धुळ-मातीने भरलेली गादी अनेक दिवसात साफ केली नसेल तर त्याची सफाई करताना काही गोष्टी लक्षात घ्या.

गादी साफ करण्याचा चांगला पर्याय म्हणून व्हॅक्यूम क्लिनरचा वापर करता येईल. या प्रकाराने साफ केल्याने घाणही निघून जाईल आणि कोणत्याही ठिकाणी डागही पडणार नाही. व्हॅक्यूम क्लिनरने सफाई करताना गादी ओली होण्याची शक्यता नसते. (पूर्वार्ध)

### ज्ञानसागर
✻ बंगालमधील मोहन बागान फुटबॉल क्लब हा अनेक युरोपियन क्लबपेक्षा जुना आहे. ✻फिलिपीन्स हा देश जगातील सर्वाधिक जिन पिणारा देश असून एकूण उत्पादनांपैकी ४३ टक्के जिन इथे विकली जाते. ✻ जी-टम्मो नावाची ध्यानधारणा करणाऱ्या तिबेटी भिक्कूंना आपल्या शरीराचे तापमान वाढवता येते. ✻ नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओशनोग्राफी पणजी शहरात आहे. ✻ कोयल राणा ही केंद्रीय मंत्रिमंडळात स्थान मिळवणारी पहिली भारतीय महिला होय. ✻ महाभारत काळात हरियाणा बहुधान्यक या नावाने ओळखले जात असे. ✻ सिंगापूरचा चांगी एअरपोर्ट सलग दुसऱ्या वर्षी जगातील सर्वोत्तम ए एअरपोर्ट ठरला आहे. ✻ जगभरात बटाट्याच्या चार हजारांहून अधिक प्रजाती अस्तित्तवात आहेत. ✻ कॅप्टन सी.पी.कृष्णन नायर यांनी वयाच्या ६५ व्या वर्षी द लीला हॉटेल ग्रुपची स्थापना केली. ✻ काळया कॉफीच्या तुलनेत साय असणारी कॉफी जास्त हळू थंड होते. ✻ जगातील सर्वांत मोठ्या चीनच्या भिंतीची लांबी ६२६९ किलोमीटरपेक्षा अधिक, उंची ४.५७ मीटर ते ९.२ मीटर असून निर्मिती खिस्तपूर्व २२१मध्ये सुरू झाली. ही भिंत पंधरा वर्षानंतर पूर्ण झाली. ✻ सोव्हिएत युनियनच्या विघटनानंतर बाकू या शहराचे रिपब्लिक ऑफ अझरबैजान या देशात रूपांतर झाले. ✻कवरत्ती ही लक्षद्वीपची राजधानी आहे. ✻ जमनापरी ही बकरी या पाळीव जनावराची जात आहे. ✻ युनेस्कोच्या वारसा स्थळांच्या यादीत हिमालय नॅशनल पार्कचा नुकताच समावेश झाला आहे. ✻ राज्य लोकसेवा आयोगाच्या सदस्यांची नियुक्ती राज्यपाल करत असताता.

'राष्ट्र संचार' हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

# सुनीताचं ‘आगमन’ का लांबलं?



भारतीय वंशाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स यांनी दुसऱ्यांदा अंतराळात भरारी घेतली आहे. मात्र, गेल्या कित्येक दिवसांपासून त्या आणि त्यांचे सहकारी बुच विल्मोर हे अंतराळात अडकले आहेत. अर्थात ते तिथे कोणत्या संकटात आहेत असे नाही. या स्थानकावर सहा-सहा महिनेही अंतराळवीर राहत असतात. सध्या तिथे आधीपासूनच राहत असलेल्या अन्य अंतराळवीरांसमवेत हे दोघे आनंदात राहत आहेत. मात्र, पूर्वयोजनेनुसार केवळ आठ दिवसांत सुनीता व विल्मोर परतणार होते; पण यानातील बिघाडामुळे त्यांना तिथेच राहावे लागत आहे, इतकेच! अर्थात नासाकडून त्यांना पुन्हा पृथ्वीवर लवकर आणण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. त्यांच्या घरवापसीसाठी सर्व पर्यायांचा विचार करण्यात येत आहे.

यातील एका पर्यायाचा विचार केल्यास दोघा अंतराळवीरांना पृथ्वीवर परत आणण्यासाठी २०२५ पर्यंत वाट पाहावी लागणार आहे! यात एलन मस्क यांची स्पेसएक्सदेखील सहभागी होण्याची शक्यता आहे. कमर्शियल क्रू प्रोग्रामचे मॅनेजर स्टिव स्टिच यांनी दिलेल्या माहितीनुसार, नासाचा मुख्य पर्याय हा बुच आणि सुनीता यांना स्टारलायनर यानातून पृथ्वीवर परत आणण्याचा आहे. तसंच, त्याचबरोबर अन्य काही पर्याय आहेत का याचीही चाचपणी करण्यात येणार आहे. स्टिच यांनी दिलेल्या माहितीनुसार, नासा एलन मस्क यांच्या स्पेसएक्स या कंपनीसोबत चर्चा करीत आहेत. आम्ही स्पेसएक्ससोबत मिळून हे निश्चित करत आहोत की, क्रू ९ व्यवस्थितरीत्या काम करत आहे का?. कारण, आम्हाला गरज पडल्यास बुच आणि सुनीता विलियम्स यांना क्रू ९ तून पुन्हा पृथ्वीवर आणण्यात येईल, असं स्टिच यांनी म्हटलं आहे.

यापूर्वी नासाने म्हटलं होतं की, स्पेसएक्स क्रू ९ मिशन पुन्हा लांबण्याची घोषणा केली होती. २५ सप्टेंबरनंतर याचे प्रक्षेपण टाळण्यात येणार आहे. यापूर्वी ऑगस्टमध्ये प्रक्षेपण होणार होते. हे यान चार क्रू मेंबरना घेऊन आंतरराष्ट्रीय अंतरिक्ष स्टेशनपर्यंत जाणार होतं. क्रू ९च्या लॉंचिगबद्दल बोलतानाच अधिकाऱ्यांनी म्हटलं आहे की, त्यांनी स्टारलाइनर यानातील बिघाडामुळे अंतराळ स्थानकावर अडकलेल्या दोन आंतराळवीरांना पुन्हा पृथ्वीवर घेऊन येण्याची योजना बनवली आहे.

२०२५ पर्यंत सुनीता आणि विल्यम यांना पृथ्वीवर परत घेऊन येणे हे आमचं उद्दिष्ट आहे. अधिकाऱ्यांनी म्हटलं आहे की, आम्ही क्रू ९ साठी ड्रॅगनची स्थापना केली आहे. जेणेकरुन त्यात लवचिकता असेल. यावेळी फक्त दोन आंतराळवीरच अंतराळात भरारी घेतील. जेणेकरून फेब्रुवारी २०२५ मध्ये चार क्रू सदस्यांना पृथ्वीवर परत आणता येईल. हे दोन आंतराळवीर बुच विल्मोर आणि सुनीता विल्यम्स असतील. अद्याप या योजनेला मजुरी मिळालेली नाहीये.

बोइंगचे स्टार लाइयनर यान ५ जून रोजी सुनीता विल्यम्स आणि बूच विल्मोर यांना घेऊन अंतराळात गेले होते. त्यानंतर एक आठवडा तिथे थांबून त्यांना पुन्हा पृथ्वीवर परतायचे होते. जूनमध्ये त्यांनी परत येणे अपेक्षित होते. मात्र, थ्रस्टर आणि हेलियम लीक झाल्यामुळं ते तिथेच अडकून पडले आहेत. अंतराळात आणि पृथ्वीवरही इंजिनिअर ही समस्या ठीक करण्यासाठी आणि अंतराळवीरांना सुरक्षित पृथ्वीवर परत आणण्यासाठी मेहनत घेत आहेत.

# पोपटाचा विश्वविक्रम



आफ्रिकन ग्रे प्रजातीचे पोपट स्मरणशक्तीबाबत जगभर प्रसिद्ध असतात. अशाच एका पोपटाने गणितामधीलही कौशल्य दाखवले होते. आता अपोलो नावाच्या आफ्रिकन ग्रे पोपटाने अवघ्या तीन मिनिटांमध्ये बारा वस्तूंची नावे सांगून नवा विक्रम केला आहे. या पोपटाचे टिकटॉकवर २.८ दशलक्ष फॉलोअर्स आहेत.

या पोपटाचे बोलण्यातील कौशल्य जसे लोकप्रिय आहे, तसेच त्याची स्मरणशक्तीही प्रसिद्ध आहे. आता त्याने एखाद्या पोपटाने तीन मिनिटांत सर्वाधिक वस्तू ओळखण्याबाबतचा गिनिज वर्ल्ड रेकॉर्ड केला आहे. त्याने बाटली, वारियो टॉय, कॉर्क अशा वस्तूही ओळखल्या. चार वर्षांचा हा पोपट अमेरिकेतील फ्लोरिडाच्या सेंट पीटर्सबर्गमधील डाल्टन व व्हिक्टोरिया मेसन या तरुण दाम्पत्याने पाळलेला आहे. ते त्याचे अनेक व्हिडीओ बनवत असतात. त्यांनी डिसेंबर २०२० मध्ये एका स्थानिक पेट शॉपमधून त्याला खरेदी केले होते. त्यानंतर त्यांनी त्याला प्रशिक्षित करून त्याचे कौशल्य दर्शवणारे व्हिडीओ सोशल मीडियात शेअर करण्यास सुरुवात केली होती. या पोपटाचे अनेक व्हिडीओ लोक आवडीने पाहतात.

# निरोगी पँक्रियाजसाठी...



पँक्रियाज म्हणजेच स्वादुपिंड हा आपल्या शरीरातील एक महत्त्वाचा भाग आहे. पचन आणि रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित ठेवणे अशा महत्त्वाच्या कार्याशी स्वादुपिंड निगडित असते. त्यामुळे हा अवयव निरोगी ठेवणे अतिशय महत्त्वाचे ठरते. स्वादुपिंडातील समस्यांमुळे मधुमेह व पँक्रियाटायटिससारख्या गंभीर आजारांचा सामना करावा लागू शकतो.

योग्य आहारातून आपण स्वादुपिंडाच्या आरोग्याची काळजी घेऊ शकतो, असे आहारतज्ज्ञ सांगतात.

**ब्लूबेरी :** ब्लूबेरी या अँटिऑक्सिडंटस्ने संपन्न असतात. अँटिऑक्सिडंटस् हे फ्री रॅडिकल्सना नष्ट करण्यात मदत करतात आणि स्वादुपिंडाचे आरोग्य चांगले राहते. ब्लूबेरीमध्ये फायबरचे प्रमाणही चांगले असते ज्यामुळे पचनसंस्थेला लाभ होतो व स्वादुपिंडाचे कार्यही सुधारते.

**दही :** दह्याचे सेवनही स्वादुपिंडासाठी लाभदायक ठरते. दही हे प्रोबायोटिक्स म्हणजेच आरोग्यदायी जीवाणुंचा चांगला स्रोत आहे. त्याच्यामुळे पचनसंस्था चांगली राहते आणि स्वादुपिंडाचे कार्यही सुधारते. दह्यातील चांगले जीवाणू स्वादुपिंडाचे आरोग्य सुधारतात आणि त्याला हानीकारक संक्रमणापासून बचावतात.

**लसूण :** लसणातही अँटिऑक्सिडंटस्? आणि अँटि-इन्फ्लेमेटरी गुण असतात. त्यामुळे लसणाच्या सेवनानेही स्वादुपिंडाचे आरोग्य चांगले ठेवण्यास मदत होते. लसणाच्या नियमित सेवनाने स्वादुपिंडाची सूज कमी होते व त्याची कार्यप्रणाली सुधारते.

**पालक :** या भाजीत व्हिटॅमिन के, सी आणि मॅग्नेशियम मोठ्या प्रमाणात असते. त्यामुळे स्वादुपिंडाचे आरोग्य चांगले ठेवण्यास मदत होते. पालकच्या नियमित सेवनाने स्वादुपिंडाचे कार्य सुधारते व त्याला अनेक आजारांपासून दूर ठेवते.

रताळे : रताळेही स्वादुपिंडासाठी गुणकारी असतात. रताळ्यांमध्ये व्हिटॅमिन ए आणि सी चांगल्या प्रमाणात असते. रताळ्यातील फायबर पचन सुधारते तसेच स्वादुपिंडावरील ताण कमी करते.

# मारुती-सुझुकीची नवी एसयुव्ही



भारतातील मध्यमवर्गीय कुटुंब नवीन कार घेण्याचा विचार करते, तेव्हा त्यांचा पहिला पर्याय कमी बजेटमध्ये अधिक वैशिष्ट्ये असलेली कार असतो. भारतीयांच्या चारचाकी संदर्भातील मानसिकतेचा प्रदीर्घ अनुभव असणारी मारुती सुझुकी नेहमीच मध्यमवर्गीय कुटुंबासाठी चांगली वाहने बाजारात आणत असते. आता मारुती सुझुकी मध्यमवर्गीयांसाठी नवी एसयुव्ही लॉंच करणार आहे. तुमचे बजेट कमी असेल तर मारुतीची हसलर ही कार २९ किमी मायलेजसह येत आहे. ऑटोमोबाईल मार्केटमधील वाढती स्पर्धा लक्षात घेऊन मारुतीने दमदार आणि आलिशान कार आणण्याची योजना आखली आणि हसलर लॉंच करुन त्या योजनेला मूर्त रुप दिले. ही कार प्रत्यक्षात कधी लॉंच होणार याची तारीख अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. परंतु हसलर कार ही सर्वात स्वस्त एसयूव्ही असेल, असे सांगण्यात येत आहे.

या कारमध्ये दोन इंजिन आहेत. त्याचे पहिले इंजिन ६५८ सीसीचे आहे जे ।२ बीएचपी पॉवर आणि ५१ एनएम पीक टॉर्क जनरेट करण्यास सक्षम आहे. त्याचे दुसरे इंजिन ६५८ बीएचपी टर्बो चार्ज इंजिन आहे. ही दोन्ही इंजिन मजबूत मायलेज देतात. या वाहनात सुरक्षेशी निगडीत अनेक फीचर्स देण्यात आले आहेत. बजेटमध्ये किंमत, उत्कृष्ट मायलेज आणि उत्कृष्ट फीचर्समुळे ही कार लोकांच्या पसंतीस उतरेल, असा कंपनीचा दावा आहे.

मारुती सुझुकी हसलरचा लूक अतिशय आधुनिक आहे. त्याच्या पॉवरफुल इंजिनसोबतच आतमध्ये इतरही उत्तम फीचर्स देण्यात आले आहेत. याची सुरुवातीची किंमत सुमारे सहा लाख रुपये असेल. त्यामुळे ही कार सर्वसामान्यांची पसंती ठरू शकते, असा कंपनीला विश्वास वाटतो.

# फेसबुक लाईव्ह करत आईबापाचा गळा चिरला!



आसाममधील करीमगंज जिल्ह्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. येथे एका ३७ वर्षीय मुलाने आपल्या वृद्ध आई-वडिलांचा गळा चिरला. फेसबुक लाईव्हवर येऊन त्याने हा गुन्हा केला. सोशल मीडियावर लाईव्ह व्हिडिओ पाहून सर्वांनाच धक्का बसला. आरोपीचे विकृ[त] कृत्य पाहून पोलीस अधिकारीदेखील आश्चर्यचकीत झाले. दरम्यान पोलिसांनी आरोपीला अटक [केली] आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, त्याने या घटनेचे रेकॉर्डिंग करून फेसबुकवर लाईव्ह केले. प्राथमिक तपासात आरोपी मानसिकदृष्ट्या स्थिर नसल्याचे दिसून आला आहे. अब्दुल हलीम असे आरोपीचे नाव आहे. तो करीमगंजच्या ब्राह्मणशासन [गाव]चा रहिवासी आहे. त्याच घरात तो आपल्या वृद्ध आई-वडिलांसोबत राहत होता. स्थानिक लोकांच्या म्हणण्यानुसार, वादाच्या वेळी अब्दुलने आधी त्याच्या आई-वडिलांना मारहाण केली आणि नंतर त्यांच्यावर धारदार शस्त्राने वार [के]ले. दरम्यान पोलिसांना [फेस]बुकवर एक व्हिडिओ सापडला. यात आरोपी सायकलवर स्वार होऊन कुठेतरी जातांना दिसून आला. त्यानंतर पोलिसांनी

# छंद म्हणून पिस्तुल बाळगणे महागात पडले!



तुम्ही ट्रेनने प्रवास करत असाल तर सर्व नियम आणि कायदे नीट वाचा, नाहीतर या व्यक्तीसोबत जे घडले तेच तुमच्यासोबतही होऊ शकते.

मुंबईच्या बोरिवली रेल्वे स्थानकावर जीआरपी तपासणी करत असताना एक व्यक्ती तिथे पोहोचली, जो ट्रेनमध्ये चढणार होता. त्याच्या हातात बॅग होती, ती पाहून पोलिसांना संशय आला. हा व्यक्ती अतिशय विचित्र पद्धतीने बॅग ओढत असल्याचे पोलिसांच्या लक्षात आले, त्यामुळे त्यांचा संशय आणखी वाढला. पोलिसांनी त्याला थांबवले आणि बॅगची झडती घेतली तेव्हा जे दिसले ते पाहून ते थक्क झाले.

दुपारी मुंबईच्या स्टेशन ब्रिजवर गस्त घालणाऱ्या एका कॉन्स्टेबलने ट्रॉली बॅग घेऊन येणाऱ्या व्यक्तीला अडवले. जेव्हा त्याने पोलिसांच्या कॉलकडे दुर्लक्ष केले तेव्हा पोलिसांना अधिक संशय आला. पोलिसांनी त्याला बॅग उघडण्यास सांगितले असता त्याने नकार दिल्याने पोलिसांचा संशय विश्वासात बदलला. तपासादरम्यान पोलिसांनी त्याच्या बॅगेतून एक पिस्तूल आणि १४ जिवंत काडतुसे जप्त केली.

पोलिसांनी सांगितले की, या २४ वर्षीय तरुणाला अटक करण्यात आली आहे. त्याने आपले नाव अभय कुमार असल्याचे सांगितले, तो बिहारमधील बराईचक पाटम गावचा रहिवासी आहे आणि मुंबईत मॉडेलिंगचे काम करतो. त्याने काही टीव्ही मालिकांमध्येही काम केले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अभय कुमारकडे शस्त्रे ठेवण्याचा परवाना नव्हता, त्यामुळे त्याला तत्काळ अटक करण्यात आली. मॉडेल आणि कनिष्ठ अभिनेता असूनही अभय कुठे जात होता, याचा तपास सध्या सुरु आहे. त्याचे पिस्तूल स्वयंचलित होते. त्याची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही, तो मित्रांसोबत राहतो आणि तो छंद म्हणून पिस्तूल ठेवतो. मात्र, या संपूर्ण प्रकरणाचा तपास सुरु आहे. न्यायालयाने त्याला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. ६ ऑगस्ट रोजी मूकबधिर आरोपी जय चावडा याचा रक्ताने माखलेला मृतदेह ट्रॉली बॅगमध्ये सापडल्यानंतर रेल्वे पोलिस सध्या हाय अलर्टवर आहेत.

# पाऊस नाही, पण पेयजल उदंड!


माणसाच्या मूलभूत गरजांमध्ये अन्न, वस्त्र व निवारा यांचा समावेश होतो. अन्नाच्या गरजेमध्ये पाण्याची गरजही अंतर्भूत आहे. प्रत्येकाला पिण्याचे स्वच्छ पाणी मिळण्याचा मूलभूत अधिकार आहे; मात्र जगातील सुमारे २० टक्के लोकसंख्येला स्वच्छ पेयजलाच्या टंचाईचा सामना करावा लागतो. अनेक देश पाण्याच्या समस्येने दीर्घकाळापासून त्रस्त आहेत. यामुळे जगभरातील पर्यावरणतज्ज्ञ चिंतेत आहेत आणि जल संरक्षणासाठीही काम सुरू आहे; मात्र तुम्हाला माहिती आहे का, आपल्या पृथ्वीवरच अशा पाण्याचा भला मोठा साठा आहे; पण लोकांना त्याचा लाभ घेता येत नाही. हा साठा दक्षिण ध्रुव म्हणजेच अंटार्क्टिकावर असून, तो बर्फाच्या रूपात आहे. या क्षेत्रात कधीही पाऊस पडत नाही; पण तिथेच जगातील सर्वात मोठा पाणीसाठा आहे.



पृथ्वीच्या पृष्ठभागावरील एकूण गोड्या पाण्याच्या ९० टक्के आणि जगातील एकूण गोड्या पाण्याच्या सुमारे ६० टक्के पाणी अंटार्क्टिकाच्या बर्फाच्या स्तरामध्ये आहे. हा ध्रुवीय प्रदेश बर्फाच्या जाड स्तराने आच्छादलेला आहे. त्यामध्येच हा पाण्याचा अनमोल खजिना दडलेला आहे; मात्र त्याचा मानवजातीला लाभ मिळत नाही. येथील बर्फाची चादर सरासरी दोन किलोमीटर जाडीची आहे. काही ठिकाणी तर तिची जाडी ४.५ किलोमीटर इतकी मोठी आहे. हा बर्फ वितळवून त्याचा पिण्यासाठी वापर करणे हे अर्थातच जटिल आणि खर्चिक काम आहे. याठिकाणी इतका बर्फ आहे की, तो सर्व वितळला तर वैश्विक समुद्राचा स्तर ७० मीटर म्हणजेच २३० फुटांनी वाढेल! अर्थातच असे घडले, तर जगाचा बराच भाग समुद्रार्पण होईल.

अंटार्क्टिकाचे सरासरी तापमान उणे ३५ अंश सेल्सिअसच्या आसपास असते. हिवाळ्यात ते उणे ९० अंश सेल्सिअसपर्यंतही खालावते. इतके कमी तापमान असल्याने तिथे अतिशय कोरडी हवा असते. त्यामुळे याठिकाणी पाऊस पडत नाही. तसेच याठिकाणी ताशी ३०० किलोमीटर इतक्या वेगाने वारे वाहतात. हा वेग इतका आहे की, एखादी बहुमजली इमारत काही वेळातच धराशायी होऊ शकते. त्यामुळे या खंडावर राहणे कठीण होते. अशा खडतर स्थितीमुळे इथे गाव, शहर किंवा मानवी वसाहत नाही. इथे राहतात केवळ संशोधक. कधी कधी काही पर्यटक या ठिकाणाला काही काळासाठी भेट देत असतात. संशोधकांची पथके काही काळासाठीच येथील सायंटिफिक रिसर्च स्टेशन्समध्ये राहत असतात.

# चर्चा एका ओशन ड्रिलिंगची



पृथ्वीच्या वरच्या स्तरामध्ये १२६८ मीटर म्हणजे आतापर्यंतचा सर्वात खोल छेद घेऊन जीवसृष्टीच्या उत्पत्तीबाबतचे नवे पुरावे शोधण्याचे काम सुरू आहे. इतके खोल उत्खनन वैज्ञानिकांच्या एका टीमने समुद्रातील पर्वत अटलांटिस मैसिफच्या क्षेत्रात केले आहे. उत्तर अटलांटिक महासागराच्या मध्यभागी असलेल्या या क्षेत्रामध्ये पृथ्वीचे आवरण तुलनेने अधिक खुले असते, असे मानले जाते.

वैज्ञानिकांनी हा छेद घेऊन खडकाचा एक असा नमुना घेतला आहे, ज्याच्या अभ्यासातून अब्जावधी वर्षांपूर्वी पृथ्वीवर जीवसृष्टीची उत्पत्ती कशी झाली हे जाणून घेण्यास मदत होईल. अटलांटिक महासागराच्या तळाशी असलेल्या ‘अटलांटिस मैसिफ’ नावाच्या पर्वताच्याजवळ हा शोध घेण्यात आला आहे. सुरुवातीला समुद्रतळाशी केवळ २०० मीटर खोदण्याची योजना बनवण्यात आली होती; मात्र वास्तवात याठिकाणी १२६८ मीटर उत्खनन करण्यात आले. या ओशन ड्रिलिंगमुळे एक नवा रॉक कोअर समोर आला आहे, ज्याच्या अभ्यासातून पृथ्वीच्या बाह्य स्तराचा विकास कसा झाला, तसेच पृथ्वीवर जीवसृष्टी कशी निर्माण झाली हे जाणून घेण्यास मदत होईल. पृथ्वीच्या विभिन्न स्तरांमध्ये बाहेरचा एक ठोस, खडकाळ स्तर, खाली असणारे मेंटल आणि सर्वात आतील कोअर यांचा समावेश होतो. कार्डिफ युनिव्हर्सिटीतील जोहान लिसेनबर्ग यांनी सांगितले की, आतापर्यंत आपल्याला मेंटलच्या काही तुकड्यांपर्यंतच जाता आलेले आहे; मात्र अशी अनेक ठिकाणे आहेत, जिथे समुद्रतळाशी आवरण खुले आहे. ‘अटलांटिस मैसिफ’ हे ठिकाणही असेच आहे. याच्या आसपास सक्रिय ज्वालामुखी हालचाली आहेत. येथे ज्वालामुखीमुळे मेंटलचा अनेक भाग सातत्याने वर येत असतो. हे मेंटल सूक्ष्म जीवांच्या विकासासाठी हातभार लावते. ज्यावेळी सागरी पाणी मेंटलमध्ये खोलवर झिरपते, त्यावेळी उष्ण तापमानामुळे मिथेनसारखी रासायनिक संयुगे निर्माण होतात. हे घटक हायड्रोथर्मल वेंटच्या माध्यमातून वरती सरकतात आणि सूक्ष्मजीवांच्या विकासासाठी इंधनासारखे काम करतात.

## केंद्र सरकारचे सर्वोच्च न्यायालयात शपथपत्र

# तिहेरी तलाक धोकादायकच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** तिहेरी तलाक कायद्याचे समर्थन करताना केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाला सांगितले आहे की, हा कायदा विवाहित मुस्लिम महिलांच्या लैंगिक न्याय आणि लैंगिक समानतेच्या व्यापक घटनात्मक उद्दिष्टांची खात्री करण्यास मदत करतो आणि भेदभाव न करणे आणि सशक्तीकरण या मूलभूत अधिकारांची पूर्तता करण्यास मदत करतो.

मुस्लिम महिला (विवाह हक्क संरक्षण) कायदा २०१९ घटनाबाह्य आणि घटनेच्या कलम १४, १५, २१ आणि १२३ चे उल्लंघन करणारा आहे, अशी घोषणा करण्याची मागणी करणाऱ्या समस्थ केरळ जमीयतुल उलेमायांच्या याचिकेला उत्तर देताना केंद्राने ही माहिती दिली. हा कायदा कोणत्या संदर्भात लागू करण्यात आला हे स्पष्ट करताना सरकारने म्हटले आहे की, तलाक-ए-बिद्दत किंवा तात्कालिक तिहेरी तलाकच्या प्रथेमुळे पतीने पत्नीचा त्याग वैध आणि संस्थात्मक केला आहे आणि यामुळे केवळ खासगी इजा झाली नाही, तर सार्वजनिक चूक झाली. कारण ती महिलांच्या हक्कांच्या आणि विवाहाच्या सामाजिक संस्थेच्याच विरोधात आहे.

तिहेरी तलाकला गुन्हा ठरवणाऱ्या २०१९ च्या कायद्याचा बचाव करणारे प्रतिज्ञापत्र केंद्र सरकारने सोमवारी सर्वोच्च न्यायालयात दाखल केले. प्रतिज्ञापत्रानुसार, सरकारने म्हटले आहे की हा कायदा विवाहित मुस्लिम महिलांच्या लैंगिक न्याय आणि लैंगिक समानतेच्या व्यापक घटनात्मक उद्दिष्टांची खात्री करण्यास मदत करतो आणि भेदभाव न करणे आणि सक्षमीकरण या मूलभूत अधिकारांची पूर्तता करण्यास मदत करतो. २०१७ मध्ये शायरा बानो विरुद्ध भारत सरकार या खटल्यात घटनापीठाने 'तलाक-ए-बिद्दत' रद्दबातल ठरवला होता. कारण यामुळे घटनेने महिलेला दिलेल्या मूलभूत अधिकारांचे आणि समानतेच्या अधिकारांचे उल्लंघन होते आणि ही प्रथा दंडनीय करण्याची सूचना केली होती. शायरा बानो प्रकरणानंतर तिहेरी तलाकच्या प्रथेचा कोणताही कायदेशीर परिणाम होत नसल्याने तो गुन्हा ठरवता येणार नाही, असा युक्तिवाद करण्यात आला आहे.

## राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## काँग्रेसने घुसखोरांना नागरिकत्व दिले

### अमित शाह यांचा आरोप

**मागील काँग्रेस** प्रणित सरकारने शेजारील देशांतील निर्वासितांना नागरिकत्व न देता तुष्टीकरणाचे राजकारण केले, परंतु घुसखोरांना भारतात प्रवेश दिला, असा आरोप गृहमंत्री अमित शाह यांनी केला. नागरिकत्व दुरुस्ती कायद्याअंतर्गत (सीएए) पाकिस्तानातून आलेल्या १८८ हिंदू निर्वासितांना नागरिकत्व प्रदान करताना ते बोलत होते. अमित शाह म्हणाले की, सीएए हा भारतात राहणाऱ्या लाखो निर्वासितांना अधिकार देणारा आहे. हा कायदा अल्पसंख्याकांचे नागरिकत्व हिरावून घेणारा नाही. एकीकडे तुम्ही सीमेवरून घुसखोरी करू दिली, कोट्यवधी घुसखोरांना बेकायदा नागरिकत्व मिळवून दिले. दुसरीकडे कायद्याचे पालन करणारे, ज्यांनी तुम्हाला (नागरिकत्व मिळवण्यासाठी) अर्ज दिला, त्यांना तुम्ही सांगितले की, कायद्यात तसा कोणताही वाव नाही, असा घणाघात त्यांनी काँग्रेसवर केला. यापूर्वी १९४७ ते २०१४ या काळात ज्यांनी भारतात आश्रय घेतला त्यांना हा अधिकार (नागरिकत्व) देण्यात आला नाही आणि तुष्टीकरणाच्या धोरणामुळे काँग्रेस व मित्रपक्षांच्या नेतृत्वाखालील सरकारांनी न्याय दिला नाही. हिंदू, जैन, बौद्ध किंवा शीख असल्यामुळे शेजारच्या देशांमध्ये त्यांचा छळ झाला. आपल्या देशात त्यांचा छळ सुरूच होता. त्यांना तीन पिढ्या न्याय हवा होता, पण इंडिया आघाडीच्या तुष्टीकरणाच्या धोरणामुळे त्या निर्वासितांना न्याय मिळाला नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांना न्याय दिला, असा दावाही त्यांनी केला.



## » Selected

### निर्देशांकात अल्प वाढ

**मुंबई** : सोमवारी, अस्थिर सत्रात भारतीय बेंचमार्क निर्देशांक सपाट बंद झाले. निर्देशांक १२.१६ अंकांनी वधारून ८०,४२४.६८ वर, तर निफ्टी ३१.५० अंकांनी वधारून २४,५७२.७० वर बंद झाला. निफ्टीतील हिंडाल्को इंडस्ट्रीज, बीपीसीएल, श्रीराम फायनान्स, टाटा स्टील आणि एलटीआय महिंद्रा यांचे समभाग वधारले, तर महिंद्रा अँड महिंद्रा, बजाज ऑटो, ॲक्सिस बँक, इंडसइंड बँक आणि एसबीआय लाइफ इन्शुरन्स यांचे समभाग घसरले. ऑटो आणि बँक वगळता इतर सर्व निर्देशांक वधारले असून हेल्थकेअर, आयटी, मेटल, ऑईल अँड गॅस, पॉवर, टेलिकॉम, मीडिया ०.५ ते २ टक्क्यांनी वधारले. बीएसईमिडकॅप निर्देशांक ०.५ टक्क्यांनी वधारला तर स्मॉलकॅप निर्देशांक १ टक्क्यांनी वधारला.

### केएसएच इन्फ्राची गुंतवणूक

**पुणे** : थर्ड-पार्टी लॉजिस्टिक्स, ई-कॉमर्स आणि उत्पादन क्षेत्रातील शाश्वत औद्योगिक आणि लॉजिस्टिक पार्क्समध्ये तज्ज्ञ असलेल्या पुण्यातील केएसएच इन्फ्रा या अग्रगण्य विकासक कंपनीने, दक्षिण भारतातील पहिले औद्योगिक आणि लॉजिस्टिक पार्क विकसित करण्यासाठी सुमारे ४५० कोटी रुपयांची गुंतवणूक योजना जाहीर केली. कर्नाटक सीमा आणि बंगळुरू बाजारपेठेपासून जवळ असलेल्या, तमिळनाडूतील होसूर येथील हा प्रकल्प सुमारे ५० एकर क्षेत्र व्यापणार आहे. हा प्रकल्प या भागातील औद्योगिक पायाभूत सुविधांमध्ये एक नवीन मानक प्रस्थापित करणार असल्याचा दावा कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक रोहित हेगडे यांनी केला. या प्रकल्पामुळे १,८०० हून अधिक लोकांना रोजगार मिळण्याची अपेक्षा आहे.



## जम्मू-काश्मिरमधील निवडणुकीमुळे धावपळ

# सुरक्षित पक्षासाठी तयारी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**श्रीनगर :** विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केल्यामुळे आपले राजकीय भवितव्य सुरक्षित ठेवण्यासाठी खोऱ्यातील नेतेमंडळी सुरक्षित राजकीय पक्षाच्या शोधात आहेत.

डेमोक्रॅटिक प्रोग्रेसिव्ह आझाद पार्टीचे (डीपीएपी) ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री ताज मोहिउद्दीन यांनी काँग्रेसमध्ये घरवापसी करण्याची घोषणा केली आहे. मी काँग्रेसमध्ये परतणार आहे. डीपीएपीमध्ये जाण्यापूर्वी मी ४० वर्षांहून अधिक काळ काँग्रेसशी संबंधित आहे. मी माझे समर्थक आणि कार्यकर्त्यांशी चर्चा केली आणि त्यांनी मला सांगितले की मी पक्षात परत यावे, असे ताज म्हणाले.

गुलामनबी आझाद यांचे निकटवर्तीय डीपीएपीचे आणखी काही नेतेही 'घरवापसी'चा विचार करत असल्याचे सूत्रांनी सांगितले. हे नेते काँग्रेस नेतृत्वाशी चर्चा करत असून, येत्या काही दिवसांत ते उडी मारू शकतात. काँग्रेस सोडल्यानंतर आझाद यांनी ऑगस्ट २०२२ मध्ये डीपीएपीची स्थापना केली होती. तथापि, हा पक्ष मजबूत राजकीय शक्ती म्हणून उदयास आलेला नाही. काँग्रेसमधून आलेले अनेक नेते पुन्हा स्वगृही परतल्याने स्थापनेनंतर, लगेचच पक्षाला धक्का बसला. लोकसभा निवडणुकीतही डीपीएपीला चांगली कामगिरी करता आली नाही. ज्या तीन जागांवरून पक्षाने निवडणूक लढवली तेथे त्यांना केवळ ८०,२६४ मते मिळवता आली. आझाद काँग्रेस नेतृत्वाशी चर्चा करत असल्याची चर्चा आहे. ते पुन्हा काँग्रेस पक्षात प्रवेश करू शकतात किंवा डीपीएपीचे पक्षात विलीनीकरण करू शकतात.

कलम ३७० नंतर प्रभावशाली उद्योगपती अल्ताफ बुखारी यांचा जम्मू-काश्मीर अपनी पार्टी हा आणखी एक पक्ष स्थापन होत आहे. जम्मू विभागातील ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री सी. जुल्फिकार अली यांनीही रविवारी भाजपमध्ये प्रवेश केला. अन्य एक नेते आणि माजी विधान परिषद सदस्य जावेद मिर्चल यांनीही त्याच दिवशी राजीनामा देऊन नॅशनल कॉन्फरन्समध्ये प्रवेश केला.

## राजस्थानमधील वाघ हरयाणात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चंदीगड :** राजस्थानमधील सरिस्का राष्ट्रीय उद्यानातील चार वर्षांचा वाघ सुमारे १०० किलोमीटरचा प्रवास करून हरियाणातील रेवाडी जिल्ह्यातील झाबुआ राखीव जंगलात घुसला आहे. सीमेजवळील सर्व गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून, गेल्या वर्षभरात अशा प्रकारची ही दुसरी घटना आहे.

राजस्थानमधील कैरथल गावात वाघाने पाच जणांवर हल्ला केल्याची माहिती सूत्रांनी दिली. शनिवारी सायंकाळी उशिरा या भागात पगमार्क आढळल्यानंतर, वन अधिकाऱ्यांनी नर वाघाच्या अस्तित्वाला दुजोरा दिला. राजस्थानची विशेष पथके सध्या वाघाचा शोध घेत आहेत. शेजारच्या राज्यातील सुमारे पाच पथके झाबुआ, रेवाडी येथे कार्यरत आहेत.

# सिद्धरामय्या यांची न्यायालयात धाव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**बेंगळुरू :** कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी कथित जमीन घोटाळा प्रकरणी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. राज्यपाल थावरचंद गेहलोत यांच्या आदेशाला त्यांनी आव्हान दिले आहे. मुख्यमंत्र्यांवर गुन्हा दाखल करण्यास राज्यपालांनी मंजुरी दिली आहे.

म्हैसूर शहरातील केसरूर येथे तीन एकर १६ गुंठे शेतजमीन बेकायदा संपादित केल्याप्रकरणी सिद्धरामय्या यांच्या पत्नीला अलिशान भागात भूखंड मिळाल्याचा हा खटला एमयूडीए घोटाळ्याशी संबंधित आहे.

सिद्धरामय्या यांनी हे आरोप निराधार असल्याचे म्हटले आहे. कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गेहलोत यांनीही मुख्यमंत्र्यांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांच्यावर खटला चालवण्यास परवानगी का देऊ नये, अशी विचारणा केली आहे. त्यावर उत्तर देताना राज्यपालांनी मुख्यमंत्र्यांना बजावलेली नोटीस मागे घ्यावी, अशी शिफारस कर्नाटक मंत्रिमंडळाने केली आहे.

मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी दावा केला आहे की, ते कुमारस्वामी आणि येडियुरप्पा यांचा विविध घोटाळ्यांमधील सहभाग उघड करतील. कर्नाटकातील विरोधी पक्ष भाजप आणि जेडीएसने सिद्धरामय्या यांच्याविरोधात जनजागृतीसाठी पदयात्रांचे आयोजन केले होते. काँग्रेसने यावर टीका केली आहे. जनतेने निवडून दिलेले सरकार हटवण्याचा हा विरोधकांचा प्रयत्न असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे.

सिद्धरामय्या यांच्या राजीनाम्याची मागणी भाजपकडून केली जात असून, राज्यपालांनी खटल्याला मंजुरी दिल्यानंतर भाजप अधिक आक्रमक झालेला दिसून येतो आहे.

## गाझा युद्धविरामासाठी वाटाघाटी आवश्यक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**तेल अवीव :** गाझा युद्धविरामासाठी इस्रायलमध्ये गेलेले अमेरिकी परराष्ट्रमंत्री अँटनी ब्लिंकन यांनी सांगितले की, सध्या सुरू असलेल्या वाटाघाटी, ही युद्ध संपवण्यासाठी करार करण्याची शेवटची संधी आहे.

इस्रायलचे राष्ट्राध्यक्ष आयझॅक हर्झोग यांची भेट घेताना ब्लिंकन म्हणाले की, बंधकांना मायदेशी आणण्याची, शस्त्रसंधी स्थापित करण्याची तसेच शांतता आणि सुरक्षिततेच्या चांगल्या मार्गावर सर्वांना ठेवण्याची ही एक निर्णायक संधी आहे. अमेरिकी राष्ट्राध्यक्ष बायडेन यांनी हा करार मार्गी लावण्यासाठी आपल्याला पाठवले होते, असे ब्लिंकन यांनी सांगितले. या प्रक्रियेत अडथळा निर्माण होईल, असे कोणतेही पाऊल कोणीही उचलू नये, याची काळजी घेण्याची वेळ आली आहे, असे ब्लिंकन यांनी सांगितले.

इस्रायल-हमास यांच्यातील तणाव वाढू नये यासाठी अमेरिका प्रयत्नशील असल्याचे ते म्हणाले. हमासने इस्रायलवर ७ ऑक्टोबर रोजी केलेल्या हल्ल्यानंतर, ब्लिंकन नवव्यांदा आखाती देशांच्या दौऱ्यावर आहेत.

हमास तसेच हिजबुल्लाहच्या म्होरक्यांना इस्रायलने ठार मारल्यानंतर मध्य पूर्वेत तणाव वाढला असून, इराणने याचा बदला घेण्यात येईल, असे जाहीर केले आहे. म्हणूनच, अमेरिका युद्धविराम होण्यासाठी प्रयत्नात आहे.

## शेख हसीनांच्या विरोधात गुन्हा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**ढाका :** बांगलादेशात आरक्षण सुधारणा आंदोलनादरम्यान एका व्यापाऱ्याचा मृत्यू झाल्याप्रकरणी बांगलादेशच्या पदच्युत पंतप्रधान शेख हसीना आणि त्यांच्या मंत्रिमंडळातील माजी मंत्र्यांसह ६२ जणांविरोधात हत्येचा नवा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण पद्धतीविरोधात विद्यार्थ्यांनी केलेल्या आंदोलनानंतर राजीनामा देऊन ५ ऑगस्ट रोजी भारतात पळून गेल्यानंतर, शेख हसीना यांच्याविरोधात दाखल करण्यात गुन्ह्यांपैकी हा नवा गुन्हा आहे.

स्थानिक मासळी बाजारातून घरी परतत असताना २१ जुलै रोजी गोळ्या झाडून हत्या करण्यात आलेल्या मोहम्मद मिलन यांच्या पत्नी शहनाज बेगम यांनी ही याचिका दाखल केली होती. यात शेख हसीना, ओबेदुल कादर आणि अन्य मंत्र्यांसह एकूण ६२ जणांवर अंतरिम सरकारने गुन्हा दाखल केला आहे.

## पॅलेस्टिनी निदर्शने

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा




**अंकारा :** पॅलेस्टिनचे अध्यक्ष अब्बास यांनी अंकारा येथे तुर्कीच्या संसदेला संबोधित केले. गाझा पट्टीतील पॅलेस्टिनी इस्रायलच्या कारवाईत मोठ्या संख्येने ठार होत आहेत.

## तामिळनाडूत अल्पवयीन मुलीवर अत्याचार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चेन्नई :** कोलकात्यात महिला डॉक्टरवर झालेल्या अत्याचारानंतर, देशभरातील महिलांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दरम्यान, तामिळनाडूतील एका खासगी शाळेत आठवीत शिकणाऱ्या विद्यार्थिनीवर अत्याचार झाल्याची घटना उघडकीस आली आहे. येथे एनसीसी अधिकाऱ्यावर अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याचा आरोप आहे. ही घटना उघड होऊ नये, म्हणून प्रयत्न केलेल्या शाळेच्या मुख्याध्यापकांना अटक करण्यात आली आहे. एनसीसी शिबिरात अल्पवयीन मुलगी आणि इतर कॅडेट्स शाळेतच थांबून सभागृहात झोपले. यावेळी तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप आहे. मुख्याध्यापक सतीश कुमार यांच्याकडे तक्रार केली असता, त्यांनी तिला प्रकरण दडपण्यास सांगितले.

## महिलांसाठी विशेष देखरेख यंत्रणा

# सुरक्षेसाठी पॅनिक बटण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रायपूर :** छत्तीसगडमध्ये व्यावसायिक बससह सर्व शाळा-महाविद्यालयांच्या बसमध्ये पॅनिक बटन आणि व्हेइकल लोकेशन ट्रॅकिंग डिव्हाइस (व्हीएलटीडी सॉफ्टवेअर) बसवून मुली आणि महिलांच्या सुरक्षिततेसाठी देखरेख यंत्रणा सुरू करण्यात आली आहे. संभाव्य धोका किंवा अनुचित घटनांना सामोरे जाणाऱ्या महिलांपर्यंत पोहोचण्यासाठी राज्य परिवहन विभागाने वाहनाचा शोध घेण्यासाठी ठराविक सर्व्हरवर व्हेईकल ट्रॅकिंग सॉफ्टवेअर बसवण्याचे काम सुरू केले आहे.

शाळा- महाविद्यालयांच्या बसमध्ये पॅनिक बटन आणि व्हीएलटीडी बसविण्याचे काम सुरू झाले आहे. हे सॉफ्टवेअर थेट परिवहन विभागाच्या नियंत्रण कक्षाशी जोडले जाणार आहे. दुसऱ्या टप्प्यात सर्व व्यावसायिक बसेसमध्ये हे यंत्र बसविण्यात येणार आहे. एक ॲपही तयार करण्यात येत आहे, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त (परिवहन विभाग) डी. रविशंकर यांनी दिली.

कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत मुली, महिला आणि मुलांचे संरक्षण करणे किंवा संभाव्य धोका किंवा अनुचित घटनांना सामोरे जाणे, हा या निर्णयाचा हेतू आहे.

छत्तीसगडमध्ये खासगी मालकांच्या मालकीच्या सुमारे १२ हजार प्रवासी बसेस राज्याच्या विविध मार्गांवर धावत असून ७ हजारांहून अधिक खासगी शाळा-महाविद्यालयीन बसेस धावत आहेत. जीपीएस आधारित सॉफ्टवेअर प्रणालीमुळे बसचे स्थान आणि मार्गाची अचूक माहिती मिळते आणि त्यामुळे सुरक्षितता वाढते. प्रवाशांना कोणतीही आपत्कालीन किंवा अपघात झाल्यास पॅनिक बटण दाबून तात्काळ पोलिस नियंत्रण कक्ष आणि परिवहन विभाग नियंत्रण कक्षाला कळवावे. यामुळे राज्यातील इमर्जन्सी रिस्पॉन्स सपोर्ट सिस्टीम म्हणजेच डायल ११२ सेवा तत्काळ कार्यान्वित होतील. नजीकच्या पोलिस ठाण्याचे कर्मचारी तत्परतेने प्रतिसाद देतील.

पॅनिक बटण तीन सेकंद दाबल्याने नियंत्रण केंद्राला बसचे नेमके ठिकाण आणि तपशीलासह अलर्ट सिग्नल पाठविला जातो ज्यामुळे अधिकारी त्वरीत बसचा मागोवा घेतात आणि कारवाई सुरू करतात. २० मिनिटांत मदत पोहोचेल, असे परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

## २३ वर्षांपासून गूढ मृत्यूंची मालिका कायम

# 'त्या' कॉलेजचा इतिहासच काळा...

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोलकाता :** कोलकात्याचे आरजी कर मेडिकल कॉलेज सध्या चर्चेत आहे. मेडिकल कॉलेजमध्ये प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर बलात्कार करून तिची हत्या केल्याच्या घडलेल्या घटनेने संपूर्ण देश संतप्त झाला आहे. आरजी कर मेडिकल कॉलेजमध्ये खून होण्याची ही पहिलीच वेळ नाही. या वैद्यकीय महाविद्यालयाला अशा घटनांचा सुमारे २३ वर्षांचा प्रदीर्घ इतिहास आहे. या कॉलेजमध्ये पोर्नोग्राफी होत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. मात्र, पोलिसांनी या प्रकरणाचा पूर्ण ताकदीनिशी तपास केला नाही. प्रशिक्षणार्थी डॉक्टरचे उदाहरण जोडले, तर अशा एकूण सहा घटना येथे घडल्या आहेत. या घटनांचे गूढ खून आणि आत्महत्या यांच्यात फिरत आहे.




२००१ मधील सौमित्र बिस्वास प्रकरण या कॉलेजमध्ये घडले होते. त्यावर्षी २५ ऑगस्ट रोजी एका वैद्यकीय विद्यार्थ्याचा मृतदेह वसतिगृहाच्या खोलीत गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला होता. सौमित्र बिस्वास असे त्याचे नाव आहे. त्यावेळी सहकारी विद्यार्थ्यांनी सौमित्र यांचा मृत्यू आत्महत्या नसल्याचा आरोप केला होता. माध्यमातील वृत्तानुसार, या विद्यार्थ्यांनी वसतिगृहात पोर्नोग्राफीचा वापर केल्याचा खळबळजनक खुलासा केला होता. सेक्स वर्कर्सना येथे आणून शूटिंग करण्यात आल्याचे त्याने सांगितले होते. विद्यार्थ्यांच्या म्हणण्यानुसार, सौमित्रने याविरोधात आवाज उठवण्याचा प्रयत्न केला आणि त्यानंतर त्याची विल्हेवाट लावण्यात आली. या प्रकरणात पोलिसांवर अनेक आरोपही झाले होते. सौमित्र याच्या शेजारच्या खोलीत ट्रायपॉड आणि रिफ्लेक्टर सापडूनही पोलिसांनी नीट तपास केला नसल्याचा आरोप केला गेला होता. पोलिसांनी आत्महत्या असा शेरा मारत, हे प्रकरण बंद केले होते. त्यानंतर कुटुंबीयांच्या दबावाखाली हे प्रकरण पुन्हा उघडण्यात आले.

त्याचप्रमाणे २००३ मध्ये कर्मचाऱ्याने आत्महत्या केली होती. अरिजीत दत्ता असे या २४ वर्षीय तरुणाचे नाव होते. तो बीरभूम जिल्ह्यातील बामनपुरा, सूरी येथील रहिवासी होता. अरिजीतने हॉस्टेलवरून उडी मारून आत्महत्या केली. हाताची शिरा कापून नंतर त्याने छतावरून खाली उडी मारली. त्यावेळीही काही विद्यार्थ्यांनी अरिजीतच्या आत्महत्येचा संबंध २००१ मधील सौमित्रच्या हत्येशी जोडला होता. तथापि, त्या अनुषंगाने तपास झाला नाही. त्याला तातडीने इमर्जन्सीमध्ये नेण्यात आले, जिथे मध्यरात्रीच्या सुमारास त्याचा मृत्यू झाला.

#रा

## पर्यावरणाचा ऱ्हास होणार कमी

# शहरात राबवणार 'शून्य कचरा' मोहीम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** कच-याची कमी निर्मिती, कचऱ्याचे संकलन, विलगीकरण आणि कचऱ्याचा पुनर्वापर आदींबाबत जनजागृती करण्यासाठी महापालिकेच्या सर्व कार्यालयांमध्ये शून्य कचरा कार्यक्रम राबवण्यात आला असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली.

केंद्र शासनाच्या सूचनांनुसार स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत पर्यावरणपूरक शाश्वत पद्धतीचा अवलंब करून पर्यावरणाचा होणारा ऱ्हास कमी करण्यासाठी शून्य कचरा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमासाठी विविध सूचना निश्चित करण्यात आल्या असून त्यानुसार शासनाने दिलेल्या कार्यप्रणालीचा अवलंब करण्यात येणार आहे. या सूचनांमध्ये कचरा कमी करणे, कचऱ्याचे योग्य पृथःकरण करणे, पर्यावरण



अनुकूल उत्पादनांचा वापर वाढवण्यासाठी प्रोत्साहन देणे, कचऱ्याच्या व्यवस्थापनाबाबत जनजागृती करणे आदी बाबींचा समावेश आहे.

कचऱ्याची निर्मिती कमी करण्यासाठी महापालिकेच्या वतीने कार्यक्रमाची योजना तयार करणे, सजावट, भांडी आणि इतर कार्यक्रमासंबंधी वस्तूंसाठी पुनर्वापर करण्यायोग्य किंवा कागद, पताका, कार्डबोर्ड, लाकूड अशा कम्पोस्टेबल



सामग्रीच्या वापरास प्राधान्य देणे, सजावटीसाठी फुगे किंवा थर्माकॉलचा वापर टाळणे, कचऱ्याचे रिसायकल, कम्पोस्टेबल आणि नॉन रिसायकल करण्यायोग्य वस्तूंचे योग्यरित्या विलगीकरण करणे, पर्यावरणास अनुकूल उत्पादने वापरण्यावर भर देणे, शून्य कचरा कार्यक्रमाच्या उद्दिष्टांबद्दल नागरिकांना शिक्षित करून सक्रियपणे सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करणे, माहितीपूर्ण चिन्हे प्रदर्शित करून कार्यक्रमादरम्यान कचरा कसा कमी करावा याबद्दल मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

कार्यक्रमांचे बॅनर, कार्डबोर्ड, कापड किंवा लाकूड आदी वस्तूंपासून तयार करणे, कार्यक्रमानंतर कार्यक्षम कचरा संकलन आणि विल्हेवाट लावण्यासाठी योजना विकसित करून गोळा केलेल्या सर्व कचऱ्यावर योग्यप्रकारे प्रक्रिया करणे, यासाठी स्थानिक कचरा व्यवस्थापन करणाऱ्या संस्थांना सहभागी करून घेणे अशा प्रमुख सूचनांचा शून्य कचरा कार्यक्रमात समावेश आहे. त्यानुसार महापालिकेने सर्व विभागांना अवगत केले असून या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याचे निर्देश आरोग्य विभागामार्फत देण्यात आले आहेत.

» Selected



## खिंवसरा पाटील शिक्षण संकुलात साकारला धान्यापासून भारताचा नकाशा

**वाकड :** स्वातंत्र्यदिनानिमित्त खिंवसरा पाटील शिक्षण संकुलात देशातील प्रत्येक राज्याचे वैशिष्ट्ये सांगणाऱ्या, प्रमुख पिकांची माहिती देणाऱ्या कडधान्यांचा, डाळींचा, मसाल्याच्या वापर करून भारताच्या नकाशाची प्रतिकृती साकारण्यात आली होती. आकर्षण ठरलेली ही प्रतिकृती पाहण्यासाठी पालक व विद्यार्थ्यांनी गर्दी केली होती. सहशिक्षिका स्मिता जोशी यांच्या संकल्पनेतून ही प्रतिकृती साकार झाली. प्रत्येक राज्यातील महत्त्वाचे पीक त्या-त्या राज्यांमध्ये भरण्यात आले. जसे पंजाब राज्यासाठी गहू, महाराष्ट्रासाठी ज्वारी, पश्चिम बंगालसाठी तांदूळ, केरळसाठी लवंग, आसामसाठी चहा पावडर, राजस्थानसाठी बाजरी अशा धान्यांचा वापर करून योग्य रंगसंगती साधत भारतातील पीक उत्पादनातील विविधता दाखवण्यात आली. राज्यात तसेच भारताच्या राष्ट्रीय प्रतिकांची मांडणी सहशिक्षक श्याम मस्तूद, कृतिका काळे इतर सहकारी शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी सादर केली. मुख्याध्यापक नटराज जगताप यांनी प्रोत्साहन दिले.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## शहरातील डॉक्टरांचा मूक मोर्चा

**पिंपरी :** कोलकाता येथील मेडिकल कॉलेजच्या विद्यार्थिनीवर झालेल्या अत्याचार करून हत्या करण्यात आली. या घटनेच्या निषेधार्थ इंडियन मेडिकल असोसिएशन पिंपरी-चिंचवड भोसरी शाखेच्या वतीने शनिवारी मूक मोर्चा काढून वैद्यकीय सेवा बंदचे आवाहन केले. शहरातील सर्व पॅथीच्या पाचशेहून अधिक डॉक्टर एकत्र येऊन आकुर्डी निगडी प्राधिकरण परिसरातून काढलेल्या मूक मोर्चात सहभागी झाले होते.

आकुर्डी -निगडी-भेळ चौक मार्गे काढलेल्या या मूक मोर्च्याची सांगता भक्ती शक्ती शिल्प समूह गार्डनमध्ये झाली. यावेळी डॉ. दिलीप कामत म्हणाले की, कोविड काळात डॉक्टर सुरक्षा कायदा केला मात्र नंतर तो कायदा प्रत्यक्ष अमलात आलाच नाही. डॉक्टरांवरील होणारे हल्ले थांबवण्यासाठी सरकारने ठोस पावले उचलली पाहिजेत. यासाठी सर्व डॉक्टरांनी एकत्र येऊन रस्त्यावर उतरले पाहिजे, तरच कडक कायदे होतील आणि आपल्याला न्याय मिळेल.

डॉ. माया भालेराव म्हणाल्या की, महिलांवर होणाऱ्या अत्याचाराविरोधात मोठी चळवळ बनली पाहिजे. एक महिला डॉक्टर आपल्या जीवानिशी जाते ही दुर्दैवी बाब आहे. या अन्यायाविरोधात एकजुटीने लढा देण्याची गरज बनली आहे. इंडियन मेडिकल असोसिएशनने देशभरात आंदोलन आणि निषेध मोर्चे काढण्यात येत आहे. यावेळी पार पडलेल्या सभेत मेडिकल असोसिएशनचे डॉ. दिलीप कामत, अध्यक्ष डॉ. माया भालेराव, नियोजित अध्यक्ष डॉ. सुधीर भालेराव, सचिव सारिका लोणकर, माजी अध्यक्ष डॉ. सुशील मुथियान, कार्याध्यक्ष डॉ. अनिरुद्ध टोणगावकर, खजिनदार डॉ. मनीषा डोईफोडे, सहसचिव सुहास लुंकड, विश्वस्त डॉ. संजीव दात्ये,डॉ. रोहिदास आल्हाट, डॉ. निहार इंगळे आदी उपस्थित होते.



## काव्यजागर पुरस्कार...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पिंपरी :** सेवानिवृत्त प्राचार्य, ज्येष्ठ पत्रकार, व्यंगचित्रकार आणि कवी कै. रा. ना. तथा दिनेश रोडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त काव्यजागर पुरस्कार स्वीकारता नितीन चंदनशिवे

### "ज्ञान हा माणसाचा पहिला डोळा व्हावा!" - नितीन चंदनशिवे

# वाकडमध्ये काव्यजागर पुरस्कार सोहळा संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाकड :** "ज्ञान हा माणसाचा पहिला डोळा व्हावा आणि तो सदैव उघडा राहावा!" असे विचार सांगली येथील सुप्रसिद्ध कवी 'दंगलकार' नितीन चंदनशिवे यांनी क्लब हाऊस, प्रिस्टीन प्रोलाईफ सोसायटी, वाकड येथे रविवार, दिनांक १८ ऑगस्ट २०२४ रोजी व्यक्त केले. सेवानिवृत्त प्राचार्य, ज्येष्ठ पत्रकार, व्यंगचित्रकार आणि कवी कै. रा. ना. तथा दिनेश रोडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त काव्यजागर पुरस्कार स्वीकारता नितीन चंदनशिवे बोलत होते. ज्येष्ठ साहित्यिक सुरेश कंक कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते; तसेच ह. भ. प. अशोकमहाराज गोरे, डॉ. अतुल रोडे, छायादेवी रोडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची सभागृहात उपस्थिती होती.



नितीन चंदनशिवे पुढे म्हणाले की, "आईच्या कवितेत बापाची जागा शोधायची असते. कोणत्याही क्षणी बाप आपल्याला फोन करतो, यासारखी जगात दुसरी आनंददायी गोष्ट नाही. कविता कवीला पैसे देतेच असे नाही; पण अपार समाधान देते. एका समर्पित कवीचे आशीर्वाद म्हणजे हा पुरस्कार आहे!" याप्रसंगी आय. के. शेख, शामराव सरकाळे, जयंती रोडे-बनकर, डॉ. अशोक लांडगे यांनी कविता सादर केल्या; तर शुभांगी शिंदे, गणेश ढगे, नितीन बनकर, कल्पना रोडे-कोल्हे यांनी मनोगते व्यक्त केलीत. अंबादास रोडे यांनी प्रास्ताविकातून दिनेश रोडे यांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूंवर भाष्य करीत हृद्य आठवणींना उजाळा दिला. सुरेश कंक यांनी अध्यक्षीय मनोगतातून, "वास्तव अनुभव मांडणाऱ्या कविता काळजाला हेलावून टाकतात!" असे मत मांडले.

## पान १ वरून

### झिशान सिद्दीकी यांचा ....

मुंबईतल्या जनसन्मान यात्रेत सहभागी झाले होते. यावेळी बोलताना मोहब्बत की दुकान खोलनेसे कुछ नहीं होता, असे म्हणत झिशान यांनी काँग्रेसला घरचा आहेर दिला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जनसन्मान यात्रेत झिशान सिद्दीकी यांना विशेष स्थान देण्यात आले होते. माझी लाडकी बहीण योजनेच्या कार्यक्रमात बोलताना झिशान यांनी काँग्रेस नेत्यांना चांगलेच सुनावले होते. तसेच सिद्दीकी यांनी अजित पवार यांचेही कौतुक केले होते. अजित पवार यांच्या राष्ट्रवादीची जनसन्मान यात्रा मुंबईत दाखल झाली तेव्हा, झिशान यांच्या वांद्रे पूर्व या मतदारसंघात या यात्रेच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात बॅनरबाजी करण्यात आली होती. जनसन्मान यात्रेच्या बॅनरवर झिशान यांचे छायाचित्र झळकल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत होते.

### राष्ट्रवादी लढवणार जम्मू काश्मीरची निवडणूक

जोरदार तयारी सुरू केली आहे. नुकतेच अजित पवार गटाचे राष्ट्रीय सरचिटणीस आणि मुख्य राष्ट्रीय प्रवक्ते ब्रिजमोहन श्रीवास्तव यांनी त्या ठिकाणी दौरा केला. ८ दिवसांच्या या दौऱ्यात त्यांनी जनतेच्या समस्या जाणून घेतल्या. यासोबतच त्यांनी जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीसाठी काही उमेदवारांची नावे सुचवली. यातील १० ते १५ जणांची नावे निश्चित करण्यात आली आहेत. अजूनही काही उमेदवारांच्या नावांची चाचपणी केली जात असून लवकरच अधिकृत घोषणा होऊ शकते.

### कोलकाता प्रकरणी आज सुनावणी

विद्यार्थी याविरोधात आंदोलन करत आहेत. दरम्यान, १७ ऑगस्ट रोजी याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. सरन्यायाधीशांना पाठवलेल्या या याचिकेत सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेण्याची विनंती करण्यात आली होती.

सरन्यायाधीश चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने या घटनेची दखल घेत, मंगळवारी सकाळी १०.३० वाजता सुनावणीसाठी हे यादीत शीर्षस्थानी ठेवले आहे.

### लोकसभेची चूक विधानसभेला नको

पण विरोधक खोटे सांगायला यशस्वी झाले. आम्हाला याचा फटका बसला. मागासवर्गीय, आदीवासी समाजाचा आम्हाला फटका बसला. सीएए कायद्याबाबत वेगळे वातावरण तयार केले, त्याचाही फटका बसला. पण आम्ही शांत बसलो नाही. सर्व समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न केला. आम्ही कोणालाही वाऱ्यावर सोडणार नाही, कोणी चुकीचे वागत असेल, तर आम्ही त्याला आम्ही पोलिसी हिसका दाखवू. आपण आमच्यावर विश्वास ठेवा. लोकसभेला झाले तसे होऊ देऊ नका, असे आवाहनही अजित पवार यांनी केले.

## पान १ वरून

### तर तुम्हाला आम्ही वाचवणार नाही!

अरूप चक्रवर्ती यांनी माध्यमांशी साधलेल्या संवादात डॉक्टरांवरच आगपाखड करून त्यांना इशारा दिला आहे. आंदोलनाच्या नावाखाली तुम्ही कदाचित तुमच्या घरी जाल किंवा तुमच्या प्रियकरासोबत जाल. पण तुमच्या आंदोलनामुळे इथे एखादा रुग्ण दगावला आणि लोकांनी त्यांचा राग तुमच्यावर काढला तर आम्ही तुम्हाला वाचवणार नाही, असा थेट इशारा अरूप चक्रवर्ती यांनी दिला. डॉक्टर संपावर आहेत. पण संपाच्या नावावर जर ते बाहेर असतील आणि रुग्णालयात रुग्णांना उपचार मिळाले नाहीत, तर त्यांचा राग डॉक्टरांवर निघणे, हे साहजिक आहे. आम्ही त्यांना अशा वेळी वाचवू शकणार नाही, असे धक्कादायक विधान अरूप चक्रवर्ती यांनी केले. तर त्यांची बोटे तोडू...

या प्रकरणी ममता बॅनर्जी सरकारने आरोपींना पाठीशी घातल्याचा आरोप होत असतानाच, ममता बॅनर्जींकडे जे कुणी या प्रकरणात बोट दाखवत आहेत, त्यांची बोटे आम्ही तोडून टाकू, असे खळबळजनक विधान तृणमूल काँग्रेसचे नेते उदयन गुहा यांनी केले आहे. तृणमूल खासदार कल्याण बॅनर्जी म्हणाले, काही लोकांना वाटते की, बांगलादेशप्रमाणे पश्चिम बंगालमध्ये काही लोक गाणी गातील आणि ममता बॅनर्जी सरकार कोसळेल. पण हे शक्य नाही. तृणमूल काँग्रेस अशा कलाकारांवर बंदी आणेल, मग हे कलाकार काय करतील? अशी विचारणा कल्याण बॅनर्जी यांनी केली आहे.

### संभाजी भिडेंवर ...

विचारणा केली असता, त्यावर प्रतिक्रिया देण्यास पवारांनी नकार दिला.

संभाजी भिडे यांनी रविवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत मराठा आरक्षणाबाबतच्या मुद्द्यावर भूमिका मांडताना मराठ्यांनी आरक्षणाचा आग्रह धरू नये, असे म्हटले होते. मराठा आरक्षण हा कळीचा मुद्दा आहे. आमच्या सांगवी गावात कमांडो ट्रेनिंग कॅम्प आहे. त्यात वाघ-सिंहांनी प्रवेश मागावा का? एखाद्या ग्लायडिंग सेंटरमध्ये गरुडाने प्रवेश घ्यावा का? स्वीमिंग क्लबमध्ये माशाने प्रवेश मागावा का? मराठ्यांनी आरक्षण मागावे का? मराठ्यांनी उभा देश चालवायचा आहे. आरक्षण कुठले काढले आहे? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला होता.

### राज्यात मुसळधार पाऊस आणि उकाडाही

उष्णता वाढल्याने महाराष्ट्रात उकाडा जाणवत आहे, असे ते म्हणाले.

राज्यात तयार झालेल्या प्रचंड उकाड्यामुळे संथ झालेला मान्सून पुन्हा सक्रिय झाला आहे. २२ ऑगस्टपर्यंत बहुतांश भागांना 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे. त्यामुळे कोकण,

मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात थांबलेला मान्सून पुन्हा सक्रिय झाला आहे. गेले पाच दिवस राज्यात मान्सून थांबला होता. कमाल तापमानात तब्बल ८ ते १० अंशांनी वाढ झाल्याने ऑगस्टमध्येच 'ऑक्टोबर हीट' जाणवू लागली होती. त्यामुळे या उकाड्यातून तयार झालेल्या

उष्णता संवाही या प्रक्रियेमुळे हवेचे दाब कमी झाले आणि पुन्हा संथ झालेला मान्सून सक्रिय झाला. त्यामुळे राज्यातील बहुतांश भागांत १७ ऑगस्टपासून पावसाला सुरुवात झाली. रविवारी राज्यातील बहुतांश भागांत जोरदार पावसाने हजेरी लावली. पुण्यात सायंकाळी ५ नंतर जोरदार पाऊस झाला.

### महायुतीमध्येही धुसफूस सुरू

ते अत्यंत कुचकामी मंत्री आहेत, अशी टीका रामदास कदम यांनी केली आहे. त्यांच्या या विधानावर देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. रामदास कदम वारंवार टोकाचे बोलतात, आमचेही मन दुखावले जाते. मग आम्हालाही ५० गोष्टी बोलता येतील, असे म्हणत फडणवीस यांनी रामदास कदम यांना

खडेबोल सुनावले आहेत.

जे मोठे नेते आहेत, त्यांनी काहीतरी पथ्य पाळले पाहिजे. भाजपला वारंवार अशा प्रकारचे बोलणे आम्हाला मान्य नाही. याबाबत मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी बोलेन, असेही त्यांनी म्हटले आहे.

भाजपाला जर राक्षसी महत्त्वाकांक्षा असेल तर युती तोडावी तुम्ही तुमचे लढा,

आम्ही आमचे लढू, असे वक्तव्य करणाऱ्या रामदास कदम यांच्या टीकेवर, आम्हीही माणसे आहोत, आमचीही मने दुखावतात. याबाबत मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी बोलणार असल्याचे फडणवीस यांनी म्हटले.

## आयटियन्सचा मार्ग होणार सुलभ

# हिंजवडी रस्त्यावरील खड्ड्यांची दुरुस्ती सुरू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**हिंजवडी :** पिंपरी-चिंचवड शहरापाठोपाठ हिंजवडी रस्त्याची देखील मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली होती. हिंजवडी टप्पा दोन व तीन या मार्गावर ठिकठिकाणी खड्ड्यांमुळे आयटियन्सचा मार्ग बिकट झाला होता. मात्र, पीएमआरडीएकडून आठ दिवसांची मुदत देण्यात आल्यावर मेट्रोकडून खड्डे बुजवण्याच्या कामाला वेग आला आहे. प्रामुख्याने माण



मेट्रो स्थानकापर्यंत हे काम सुरू झाले आहे.

पिंपरी-चिंचवड शहरापाठोपाठ हिंजवडी रस्त्याची देखील मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली होती. हिंजवडी टप्पा दोन व तीन या मार्गावर ठिकठिकाणी खड्ड्यांमुळे आयटियन्सचा मार्ग बिकट झाला होता. मात्र, पीएमआरडीएकडून आठ दिवसांची मुदत देण्यात आल्यावर मेट्रोकडून खड्डे बुजवण्याच्या कामाला वेग आला आहे. प्रामुख्याने माण मेट्रो स्थानकापर्यंत हे काम सुरू झाले आहे. साडेचारशेच्या आसपास खड्डे पडले होते. त्यापैकी २०० खड्डे बुजवण्यात आले असून, उरलेले खड्डे देखील लवकर बुजवण्याची सूचना दिली आहे.

हिंजवडीतील राजीव गांधी इन्फोटेक पार्कमध्ये जगातील आणि देशांतील मोठ्या आयटी कंपन्यांची कार्यालये आहेत. या पार्कमध्ये एकूण २०० आयटी कंपन्या कार्यरत असून, तीन लाखांहून अधिक कर्मचारी काम करतात. गेल्या काही दिवसांपासून या पार्कमधील अपुऱ्या पायाभूत सुविधा आणि वाहतूक कोंडीचा मुद्दा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. आता या पार्कमधील खड्डेमय रस्त्यांमुळे येथील पायाभूत सुविधांचा झालेला बोजवारा समोर आला आहे. खराब रस्त्यांमुळे वाहतूक कोंडी होऊन वाहनचालक रोज एक ते दीड तास कोंडीत अडकून पडत आहेत.

#रा



**खडकवासला :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरद पवार गटाच्या खडकवासला मतदारसंघाच्या कार्याध्यक्षपदी नर्हे गावच्या माजी ग्रामपंचायत सदस्या सुप्रिया भुमकर यांची निवड करण्यात आली. राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्षा सुप्रिया सुळे, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, शहराध्यक्ष प्रशांत जगताप, खडकवासला अध्यक्ष काका चव्हाण यांनी निवड केल्याने सुप्रिया भुमकर यांनी सर्वांचे आभार मानले.

## प्रशासनाचे दुर्लक्ष : दुर्गंधीमुळे आरोग्य धोक्यात

# कचरा डेपो हटवा ; ग्रामस्थांची मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**यवत :** दौंड तालुक्यातील यवत येथील यशवंतनगर जवळ असलेल्या कचरा डेपोच्या दुर्गंधीमुळे परिसरातील यशवंतनगर, मार्केटकमिटी झोपडपट्टी परिसरात मोठ्या प्रमाणात डास, मच्छर वाढल्यामुळे डेंग्यु, मलेरिया, चिकनगुणिया सारख्या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. त्यामुळे कचरा डेपोमुळे ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले असून यशवंतनगर जवळ असलेला कचरा डेपो बंद करून दुसरीकडे हलवण्याची मागणी ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीकडे नुकतीच निवेदनाद्वारे मागणी केली.

यवत हे गाव जवळपास २० हजार लोकसंख्या असलेले मोठे गाव असून दररोज गावात गोळा होणारा सुका व ओला कचरा ग्रामपंचायतीच्या वतीने घंटा गाडीच्या साहाय्याने संकलित केला जातो.

संकलित केलेला कचरा यशवंतनगर जवळ असलेल्या सरकारपड खाणीमध्ये काही वर्षांपासून टाकला जातो. खाणीत दररोज टाकण्यात येत असलेल्या कचऱ्यामुळे खाण पूर्णपणे भरली आहे. सध्या पावसाचे दिवस असल्यामुळे साठलेल्या कचऱ्यामुळे परिसरातील लोकवस्तीत मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरली असून त्यामुळे रुग्णांच्या संख्येत वाढ झाली आहे. खाणीजवळ असलेल्या पालखीतळ, मंडळअधिकारी कार्यालय, तलाठी कार्यालय, पशुवैद्यकीय रुग्णालय, स्मशानभुमी, कब्रस्तान असून येथे येणाऱ्या नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. तसेच साठलेला कचरा जाळण्यात येत असल्याने धूर देखील मोठ्या प्रमाणात होत असून येथील कचरा डेपो बंद करून दुसरीकडे हलवण्याची मागणी नागरिकांनी ग्रामपंचायत प्रशासनाकडे निवेदन देऊन केली आहे. मागणीची दखल न घेतल्यास त्रस्त नागरीकांच्या वतीने तिव्र आंदोलन छेडण्यात येईल असा नागरिकांनी इशारा दिला आहे.



कचरा प्रकल्प उभारण्यासाठी ५० लाख रुपयांचा निधी लागणार असून ग्रामपंचायतीकडे सध्या २१ लाख रुपये निधी उपलब्ध आहे. लोकवस्ती पासून दूर प्रकल्पासाठी जागा उपलब्ध करून कचरा प्रकल्प उभारण्यात येईल

**- समीर दोरगे,** सरपंच ग्रामपंचायत यवत, ता. दौंड



लोकवस्ती जवळ असलेल्या कचरा डेपोमुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून त्यामुळे मच्छर, डासांच्या प्रादुर्भावामुळे रुग्ण संख्येत मोठी वाढ झाली आहे. ग्रामपंचायत प्रशासनाने कचरा डेपो दुसरीकडे हलवावा.

**- डॉ. संतोष बडेकर,** रहिवासी यशवंतनगर यवत

## Selected

### पोलिसांना ११२ वर जाणीवपूर्वक त्रास देणाऱ्यावर गुन्हा

**शिक्रापूर :** नागरिकांना कोठेही अडचणीत मदत हवी असल्यास शासनाच्या वतीने नव्याने ११२ हा क्रमांक सुरु करण्यात आलेला असून या क्रमांकावर वारंवार फोन करुन पोलिसांना त्रास देण्याच्या हेतूने खोटी माहिती देऊन जाणीवपूर्वक त्रास देणाऱ्यावर शिक्रापूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून बाळासाहेब काशिनाथ साकोरे असे पोलिसांनी गुन्हा दाखल केलेल्या इसमाचे नाव आहे. शिक्रापूर ता. शिरुर पोलीस स्टेशनचे पोलीस शिपाई प्रतिक जगताप हे त्यांचे कर्तव्य बजावत असताना पोलीस हेल्पलाईन नंबर ११२ वर केंदूर येथून एका मोबाईल नंबरहून खून झाल्याबाबत फोन आला त्यामुळे पोलीस सदर ठिकाणी गेले मात्र तसा कोणताही प्रकार झालेला नव्हता, त्यांनतर पुन्हा शिक्रापूर परिसरात मला दोघा इसमांनी मारहाण केल्याबाबतचा फोन आळा आणि पोलीस सदर ठिकाणी गेले असता दोनही ठिकाणी खोटी माहिती देऊन डायल ११२ चा गैरवापर करणारा व्यक्ती एकच असल्याचे समोर आले, दरम्यान पोलिसांनी सदर इसमाला समज दिली, मात्र त्यांनतर देखील वेळाने पुन्हा ११२ वर फोन आला असता तेथे देखील तोच इसम असल्याचे पोलीस शिपाई प्रतिक जगताप यांच्या निदर्शनास आले, दरम्यान बाळासाहेब साकोरे हा मुद्दाम पोलिसांना त्रास देण्याचे हेतूने पोलीस स्टेशन तसेच पोलीस कंट्रोल रूम येथे फोन करून खोटी माहिती देऊन पोलिसांना त्रास देण्याचे तसेच ११२ चा गैरवापर करत असल्याचे समोर आल्याने पोलीस शिपाई प्रतिक भाऊसाहेब जगताप रा. शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी बाळासाहेब काशिनाथ साकोरे रा. महादेववाडी केंदूर ता. शिरुर जि. पुणे याचे विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास शिक्रापूर पोलीस करत आहे.

### नगरपरिषद संवर्ग अधिकारी संघटनेची सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न



**राजगुरुनगर :** महाराष्ट्र राज्य नगर परिषद संवर्ग अधिकारी संघटनेची द्वितीय वार्षिक सर्वसाधारण सभा शेगाव (जि. बुलढाणा) येथील देशमुख मंगल कार्यालयात १७ ऑगस्ट रोजी उत्साहात पार पडली, अशी माहिती चाकण नगरपरिषदेचे उपमुख्याधिकारी सुनील गोर्डे यांनी दिली. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार संजय कुटे, आमदार आकाश फुंडकर, मुख्याधिकारी जयश्री काटकर, आशिष बोबडे, सतीश पुदाके, विजयकुमार आश्रमा उपस्थित होते. यावेळी राज्यातील विविध नगरपरिषद व नगरपंचायतींमध्ये कार्यरत संवर्ग अधिकारी चांगल्या पद्धतीने कामकाज करतासून त्यांचे सर्व प्रश्न व मागण्या ह्या कायदेशीर व न्याय्य असून मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या माध्यमातून सोडविण्यात येतील असे आश्वासन आमदार कुटे व आमदार फुंडकर यांनी दिले. यावेळी संपूर्ण महाराष्ट्रभरातून मोठ्या प्रमाणात संवर्ग अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## निसर्गाशी जोडू नाते हा संदेश देत जेजुरीतील वंन्दे मातरम संघटना

# वाचवलेल्या झाडाला राखी बांधून साजरे केले वृक्षरक्षा बंधन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** निसर्गाशी जोडू नाते हा संदेश देत जेजुरीतील वंन्दे मातरम संघटनेच्या कार्यकर्त्यांनी जेजुरी बस स्थानक आवारातील पन्नास वर्ष जुन्या पिंपळ वृक्षाला तोडण्यास प्रतिबंध केला.

आता या वृक्षाला पालवी फुटून पुनर्जीवन मिळाले आहे. राखी पौर्णिमेचे औचित्य साधून या झाडाच्या खोडाला तिरंगा राखी बांधून अनोखे असे वृक्षरक्षा बंधन वंदे मातरम् संघटनेने साजरे केले.

जेजुरी बस स्थानकाच्या आवारात गेली पन्नास वर्ष प्रवाशी,नागरिक तसेच पक्षांना निवारा,सावली देणारे पिंपळ वृक्षाचे भले मोठे झाड बस स्थानकाच्या बांधकामासाठी पाडण्यात आले. राहिलेल्या खोडावर अखेरचा घाव घालत असताना जेजुरी येथील वंन्दे मातरम कार्यकर्त्यांनी विरोध करून हे झाड वाचविले.

या खोडाला आता पालवी फुटू लागली आहे. या झाडाचे रक्षण करणाऱ्या वंदे मातरम् संघटनेने चला नाते जोडू निसर्गाशी! असा संदेश देत पुणे जिल्हा वंदे मातरम् संघटनेचे अध्यक्ष अध्यक्ष जहीर मुलाणी, पदाधिकारी अड स्वाती बारभाई अनिकेत हरपळे, श्रीकांत चव्हाण, रसिक जोशी, प्रदीप खेडेकर, भगवान लाखे, संतोष आगलावे, आदेश देवकर, सोनाली खेडेकर, वैष्णवी माने, स्वरांजली सकट आदी कार्यकर्त्यांनी राखी पौर्णिमेचे औचित्य साधून या वृक्षाच्या खोडाला राखी बांधून अनोखे रक्षा बंधन साजरे केले.

## वृक्षाबंधन...

जयकुमार हरीचंद्रे, जेजुरी



**जेजुरी :** राखी पौर्णिमेचे औचित्य साधून या झाडाच्या खोडाला तिरंगा राखी बांधून अनोखे असे वृक्षरक्षा बंधन वंदे मातरम् संघटनेने साजरे केले.

# विकास संजय फंड यांची निवड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणगांव :** रांजणगाव गणपती तालुका शिरूर येथील विकास संजय फंड यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाच्या शिरूर आंबेगाव तालुका युवक उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. पक्षाचे कार्याध्यक्ष देवदत्त निकम यांनी विकास फंड यांची निवड केली. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या हस्ते हे पत्र विकास फंड यांना देण्यात आले.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासाठी आजवर दिलेले योगदान लक्षात घेऊन आपली शिरूर-आंबेगाव राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या युवक उपाध्यक्ष या पदावर नियुक्ती करण्यात आली असल्याचे देवदत्त निकम यांनी सांगितले. तसेच पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार. शरद पवार यांचे विचार सर्वदूर पोहोचविण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू असे विकास फंड यांनी सांगितले. या प्रसंगी खासदार अमोल कोल्हे, महिला प्रदेश अध्यक्ष रोहिणी खडसे,मेहबूब शेख,माजी गृहमंत्री अनिल देशमुख,जगन्नाथ शेवाळे, दामू अण्णा घोडे, कुमार महाराज नानेकर, रांजणगाव सोसायटीचे माजी चेअरमन उत्तमराव कुटे, पांडुरंग खेडकर, तुषार शेळके, गणेश पाचुंदकर,सचिन कुटे,सोमनाथ बांदल आदी उपस्थित होते.

### दीड तोळ्यांचे दागिने लांबवले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** रांजणगाव गणपती ता. शिरुर येथील पुणे नगर महामार्गावरून अर्चना मोरे या पुणे ते अहमदनगर असा एस टी ने प्रवास करत असताना त्यांनी त्यांचे सोन्याचे दीड तोळे वजनाचे दागिने पर्स मध्ये ठेवून पर्स गळ्यात ठेवलेली होती, रांजणगाव जवळ एस टी आल्यानंतर पर्सची चैन उघडी दिसल्याने पर्स पाहिली असता त्यामधील दागिने गायब असल्याने अर्चना रडू लागण्याने एस टी वाहकाने चौकशी करत एस टी पोलीस स्टेशन येथे नेली असता पोलिसांनी अन्य प्रवाशांची चौकशी करत झडती घेतली मात्र दागिने मिळून आले नसल्याने दागिने चोरीला गेल्याचे लक्षात आले.

## संभाजी ब्रिगेडचे राज्यस्तरीय अधिवेशन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** महाराष्ट्राच्या इतिहास, सांस्कृतिक, सामाजिक व अर्थकारणाच्या क्षेत्रात गेली २७ वर्षे सातत्याने काम करून मराठा-बहुजन समाजात वैचारिक बदल घडवून आणणाऱ्या संभाजी ब्रिगेड संघटनेचे एकदिवसीय राज्यस्तरीय अधिवेशनाचे आयोजन गुरुवार, दि. २२ ऑगस्ट २०२४ रोजी वाशी (नवी मुंबई) येथील विष्णूदास भावे नाट्यगृह येथे आयोजित करण्यात आले. देशाचे ज्येष्ठ नेते शरद पवार, खासदार छत्रपती शाहू महाराज, माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील आदि या अधिवेशनासाठी उपस्थित राहणार असून संभाजी ब्रिगेडच्या बदलाचा मागोवा व भविष्याचा वेध घेण्यासाठी मोठ्या संख्येने अधिवेशनासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष व अधिनेशनाचे निमंत्रक प्रविण गायकवाड यांनी केले आहे. या अधिवेशनाचे उद्घाटन आमदार रोहित पवार, खासदर अमोल कोल्हे, आमदार शशिकांत शिंदे , सिनेअभिनेते सयाजी शिंदे, निखिल चव्हाण व गौरव मोरे आदि मान्यवरांच्या हस्ते पार पडणार आहे. पहिल्या सत्रामध्ये पत्रकार अभिजीत करंडे हे "गोष्ट पैशापाण्याची" पुस्तकाचे लेखक प्रफुल्ल वानखेडे यांची प्रकट मुलाखत घेणार आहेत. तर दुसऱ्या सत्रामध्ये ज्येष्ठ संपादक श्रीराम पवार हे "महाराष्ट्र धर्म काय शिकवतो?" या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.

### पोपटराव बर्गे यांच्या पुस्तकाची शासनाच्या 'ग्रंथ भेट' योजनेत निवड



**बारामती :** फलटण येथील इतिहास अभ्यासक राहुल उर्फ पोपटराव बर्गे यांनी लिहिलेल्या 'छत्रपती शिवाजीराजे भोसले घराण्याच्या सोयरीकीचा इतिहास' या पुस्त काची महाराष्ट्र शासनाच्या ग्रंथा लय संचालनालया मार्फत राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान च्या 'ग्रंथ भेट' योजनेमध्ये निवड करण्यात आली आहे.

राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानच्या वतीने देशातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळ समृद्ध करण्याचे व त्याद्वारे ज्ञान प्रसार करण्याचे कार्य केले जाते. त्यानुसार राबवण्यात येणाऱ्या 'ग्रंथ भेट' योजनेमध्ये सन २०२१ - २२ मध्ये प्रकाशित झालेल्या पुस्तकांमधून पोपटराव बर्गे यांच्या 'छत्रपती शिवाजीराजे भोसले घराण्याच्या सोयरीकीचा इतिहास' या पुस्तकाची निवड झाली आहे. त्यामुळे बर्गे यांचे सदरचे पुस्तके देशातील सर्व शासकीय सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये वाचकांसाठी उपलब्ध होणार आहेत.

NEWS

सणसवाडी

वाहतूक कोंडी




## पुणे-नगररोड ट्रॅफिक मुक्त करणार; सणसवाडी येथील जन सन्मान यात्रेत पवारांची घोषणा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** लाडक्या बहिणी, लाडके भाऊ, शेतकरी, मुस्लिम, आदिवासी ते सर्व समाज घटकाला आर्थिक सक्षम करण्यासाठी जी पाऊले आम्ही उचलली ती पुढील पाच वर्षात ही कायम ठेवणार असून पुढील काही दिवसात पुणे नगर रोड वरील संपूर्ण वाहतूक कोंडी संपवण्यासाठी जंबो फ्लाय ओव्हर करण्याची खात्री देत पुणे नगर रोड फ्लाय ओव्हरने ट्रॅफिक जॅम मुक्त करणार असल्याची घोषणा सणसवाडी येथील जनसन्मान यात्रेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली आहे. सणसवाडी ता. शिरूर येथील जनसन्मान यात्रेत उपस्थितांना संबोधित करताना उपमुख्यमंत्री अजित पवार बोलत होते, यावेळी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, महिला प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकणकर, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, राष्ट्रवादीच्या जिल्हा महिलाध्यक्ष मोनिका हरगुडे, आरती भुजबळ, जिल्हा परिषद सदस्या कुसुम मांढरे, घोडगंगा कारखान्याचे संचालक दादापाटील फराटे, बाबासाहेब फराटे, राजेंद्र जगदाळे, शशिकांत दसगुडे, सुधीर फराटे, राजेंद्र कोरेकर, स्वप्नील ढमढेरे, विठ्ठलराव ढेरंगे, चंदन सोंडेकर, शांताराम कटके, राजाराम गव्हाणे, शरद कालेवार, शिवाजी दरेकर यांसह आदी मान्यवर व पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान अजित पवार यांनी सर्व स्तरातील वैयक्तीक लाभाच्या योजनांचा आढावा घेत मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही पुढील महायुतीच्या सरकारच्या काळात चालू राहणार असून विरोधक जी टीका करतात ती निराधार असल्याचे सांगत आत्तापर्यंत मी दहा वेळा राज्याचा अर्थसंकल्प मांडला असून चालू अर्थसंकल्प हा ६५ लाख कोटींचा असून ४२ लाख कोटींपेक्षा जास्त महाराष्ट्राचे स्थूल उत्पन्न हे राज्याची आर्थिक सुस्थिती दर्शवित असल्याने विरोधकांनी राज्याची आणि आम्ही जाहीर करत असलेल्या लोक कल्याणकारी योजनांची काळजी करू नये असे सांगितले, तसेच शिरूर हवेलीकरांची सर्वात मोठी डोकेदुखी असलेली पुणे नगर रोडची वाहतूक कोंडी आपण जंबो फ्लाय ओव्हरने शिरूर ते वाघोली पर्यंत जोडणार असल्याने शिरुर व हवेली करतांना वाहतूककोंडी मुक्त करणार असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.

## स्व.झांबरशेठ तांबे व त्यांच्या पत्नी स्व. माजी आमदार लताताई तांबे यांच्या पुतळ्याचा लोकार्पण सोहळा

# साहेबांच्या दौऱ्याकडे लागले सर्वांचे लक्ष... !



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सुरेश वाणी :** राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार हे २५ ऑगस्ट २०२४ रोजी जुन्नर तालुक्याच्या दौऱ्यावर येत आहेत. जुन्नर चे माजी आमदार स्वर्गीय झांबरशेठ तांबे व त्यांच्या पत्नी स्व. माजी आमदार लताताई तांबे यांच्या पुतळ्याचा लोकार्पण सोहळा शरद पवार यांच्या हस्ते ओतूर येथे संपन्न होणार आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पूर्वसंध्येला शरद पवार जुन्नर तालुक्याच्या दौऱ्यावर येत असल्याने जुन्नर विधानसभेच्या उमेदवारांची घोषणा होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. जुन्नर विधानसभेवर शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसचाच हक्क आहे, हे काही महिन्यापूर्वी खुद्द शरद पवार यांनीच सत्यशील शेरकर यांच्या निवासस्थानी जाहीर केले आहे. त्यामुळे जुन्नरची जागा महाविकास आघाडीकडून इतर घटक पक्षाला सुटण्याची शक्यता फार कमी आहे.

शरदचंद्र पवार या पक्षाकडून उमेदवारी मिळावी म्हणून विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष व जुन्नर तालुक्यातील काँग्रेस आहे पक्षाचे युवा नेते सत्यशील शेरकर, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य शरद लेंडे, मोहीत ढमाले,अंकुश आमले व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या पक्षाचे जुन्नर तालुका अध्यक्ष तुषार थोरात, जिल्हा उपाध्यक्ष अनंतराव चौगुले असे अर्ध्या डझन विधानसभेचे उमेदवारी मिळावी म्हणून आग्रही आहेत.तसेच जुन्नर चे विद्यमान आमदार अतुल बेनके व माजी आमदार शरद सोनवणे हे दोघे देखील शरद पवार यांच्या पक्षांमध्ये येण्यास इच्छुक आहेत. या दोघांनीही राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख शरद पवार व प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची भेट घेतली आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये शिरूर लोकसभा मतदारसंघातील डॉक्टर अमोल कोल्हे यांना चांगले मताधिक्य मिळाल्यामुळे इच्छुकांची संख्या वाढली आहे. त्यामुळे जुन्नर विधानसभेची उमेदवारी शरदचंद्र पवार यांच्या पक्षाकडून विधानसभेची उमेदवारी कोणाला मिळते? याबाबतची उत्सुकता वाढली आहे.

दरम्यान विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष व काँग्रेस पक्षाचे युवा नेते सत्यशील शेरकर हे सुद्धा लोकसभा निवडणुकीच्या आधीपासून शरदचंद्र पवार यांच्या पक्षांमध्ये येण्यास इच्छुक आहेत. सध्या ते काँग्रेस पक्षामध्ये जरी असले तरी काँग्रेस पक्षापेक्षा शरदचंद्र पवार याच पक्षाच्या स्थानिक नेत्यांच्या संपर्कात आहेत. त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या पक्षामध्ये प्रवेशाची फक्त औपचारिक बाकी आहे, असे बोलले जाते. दरम्यान जुन्नरचे आ. अतुल बेनके हे सुद्धा शरद पवार यांच्या संपर्कात असल्याने त्यांना पक्षात घेऊन उमेदवारी दिली जावी अशी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या पक्षाच्या कार्यकर्त्यांची मागणी असून काही कार्यकर्त्यांनी खुद्द शरद पवार यांची बारामतीत भेट घेऊन अतुल बेनके यांना आपल्या पक्षात घ्या अशी विनंती केली आहे.तसेच माजी आमदार शरद सोनवणे यांनी देखील शरद पवार व प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची भेट घेऊन आपणही पक्षात येण्यात इच्छुक असल्याचे सांगितले आहे.

## बारामतीच्या ठेकेदाराने झारगडवाडीत केली बनवाबनवी

# ग्रामपंचायतीची झाली फसवणूक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**बारामती :** बारामती तालुक्यातील झारगडवाडी ग्रामपंचायतीचा ठेका मिळवण्या साठी एका ठेकेदारांने वेगळीच शक्कल लढवली.ठेका मिळवण्या साठी खोटे नाव आणि बनावट डिमांड ड्राफ्ट भरून ठेका मिळवल्याचा गैरप्रकार समोर आला आहे, या प्रकरणी सदरच्या ठेकेदाराचे विरोधात बारामती तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बारामती तालुक्यातील झारगडवाडी ग्रामपंचायतीच्या नागरी सुविधांचे अंतर्गत वार्ड क्रमांक २ मधे भूमिगत सांडपाणी व्यवस्था करण्याच्या कामासाठी ३० लाख रुपयांची करण्याच्या कामासाठी ३० लाख रुपयांची निविदा मिळवण्यासाठी एका ठेकेदाराने चक्क निविदा काढ ण्यात आली होती.त्या कामाची दुसऱ्याच्या नावाचा आधार घेत आणि बनावट डिमांड ड्राफ्ट ग्रामपंचायतीला देत ३० टक्के कमी दराने निविदा भरली. निविदा मंजूर झाल्यानंतर निविदेची वर्क ऑर्डर घेण्यासाठी जेव्हा फोन केला,तेंव्हां प्रत्यक्ष ज्या नावाने निविदा भरली होती, त्या व्यक्तीचा आणि निविदा भरणाराचा काही संबंध नसल्याचा प्रकार समोर आला. संबंधित ठेकेदाराने ठेका मिळवण्यासाठी पुणे जिल्हा बँकेचा डोर्लेवाडी शाखेचा ५७ हजार रकमेचा डिमांड ड्राफ्ट काढून त्याची रंगीत झेरॉक्स काढून त्या झेरॉक्सवर १० लाख ८० हजार अशी रक्कम भरून त्रयस्ताच्या नावाने खोटे व बनावट डिमांड ड्राफ्ट भरून निविदा मिळवण्याचा प्रयत्न केला. तसेच बँकेची व ग्रामपंचायतीची फसवणूक केली. या अनुषंगाने तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली आहे.

## आमदार फंडातून तयार केलेला पुल पहिल्या पावसात गेला वाहून



**सासवड :** सासवड येथील चांबळी नदीवर लहान पुल बांधला होता हा पुल आ संजय जगताप यांच्या फंडातून तयार करण्यात आला होता या पुलाची उंची वाढवावी अशी मागणी येथील शेतकरी नागरिक करीत होते परंतु पुलाची उंची लहान असल्याने पहील्या पावसातच पुलाला ठिकठिकाणी भगदाड पडले. तर अनेक ठिकाणचे डांबरीकरण विहुन गेले या पुलावरुन शेतकरी आपला शेतमाल जनावरे व परिवार ये जा करत असतात. सात लाखा पेक्षा जास्त रक्कम या पुला सह सिध्देश्वर मंदिराकडे जाणा-या रस्त्यावर खर्च केला पांढर ओढ्यावर पुल बांधला नाही त्यामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात चिख्खल पाणी राडा रोडा पसरला आहे.सध्या श्रावण महिना चालू असुन अनेक भाविक सिध्देश्वर मंदिराकडे देव दर्शन घेण्यासाठी जात असताना तसेच याच भागात अनेक सोसायट्या आहेत या नागरिकांना अतोनात हाल झाले आहे. सदर पुलावर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडले ते स्थानिक शेतकरी ग्रामस्थ व रहिवासी यांनी स्वता दगडगोटे टाकुन बुजवले आहे

अशा प्रकारचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदार कोण आहे त्याला तातडीने या ठिकाणी बोलाऊन काम कसे केले आहे ते दाखवले पाहिजे व कामाचा दर्जा कसा असावा हे देखील सांगितले पाहिजे पांढर ओढ्यावर पुल का बांधला नाही याचे कारण देखील संबधीत अधीका-यांनी चौकशी करून त्या ठिकाणी पुल बांधण्याची जबाबदारी संबंधित ठेकेदाराकडे द्यावी. या दोन्ही रस्त्यांवर सातत्याने मोठ्या प्रमाणात रहदारी चालू असते हे लक्षात घेऊन संबंधित अधिकारी लक्ष घालावे अशी मागणी स्थानिक नागरिकांनी शेतकरी व नागरीकांनी केली आहे

» Selected

## जुन्नर तालुक्यामधून सहानुभूतीच्या लाटेवर अनेकांना पडू लागली आमदारकीची स्वप्न

**नारायणगांव :** आमदार का व्हायचंय माहीत नाही परंतु नेत्यांच्या जीवावर "आमदार" होण्याची अनेकांना पडू लागली स्वप्न.

नारायणगाव : पुढारी वृत्तसेवा सहानुभूतीच्या लाटेवर आपण जुन्नर चे आमदार सहज होऊ या आशेने अनेकांना स्वप्न पडू लागले असून त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून प्रचाराला देखील सुरुवात केली आहे. शरद पवार व उद्धव ठाकरे आणि राहुल गांधी यांच्याबद्दल सहानुभूती वाढल्याने तसेच शेतकरी हिताच्या विचार केंद्र सरकारचा नसल्याचा शेतकऱ्यांचा ठपका असल्याने जनतेची सहानुभूतीमिळत असल्याने यावेळी सहानुभूतीच्या लाटेवर आपण "आमदार" होऊ अशी आवाजवी अपेक्षा वाढल्याने जुन्नर तालुक्यातून विधासभेसाठी अनेक जण इच्छुक होतं आहेत. तालुक्यातून इच्छुकांची यादी मारुतीच्या शेपटी प्रमाणे वाढत आहे. आमदार का व्हायचे? कोणते प्रश्न व प्रकल्प मार्गी लावायचे? जनतेच्या काय समस्या आहेत? जुन्नर तालुक्यात कोणते प्रकल्प येऊ शकतात? शेतकऱ्यांसाठी आपण काही करू शकतो का? यावर ही इच्छुक मंडळी बोलायला तयार नाहीत. फक्त आमदार वाव्हायचंय एवढाच जयघोष कानावर पडत आहे. दरम्यान ज्यांनी आमदारकी भूषविली त्यांचे व्हिजन तयार आहे. परंतु काही नवखी इच्छुक मंडळी फक्त आमदार व्हायचंय एवढंच सांगत आहेत. व त्यांचे कार्यकर्ते आमुक- आमुक आमदार होणारच अशी चर्चा सोशल मीडियावर घडवून आणीत आहे. काही इच्छुक मंडळींनी आपल्या नेत्यांचे फोटो वापरून चारचाकी वाहन सजविले आहे.कार्यकर्ते अशा थाटात वाहन चालवतात की जणू काही आपल्या नेत्याची उमेदवारी फायनलच झाली. सध्या सकाळ - संध्याकाळ नेत्यांचे कार्यकर्ते आपल्या नेत्याला उमेदवारी मिळणारच अशी टिमकी वाजवताना दिसत आहेत.

## बारामतीत दीक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रेचे स्वागत...









■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** सरकारची धोरणे हे प्रत्येक व्यक्ती सक्षम व्हाकरिता योजना राबवताना दिसतात. परंतु पत्रकार व् संपादक सक्षमीकरणाकरिता एखादी योजना का नाही सरकार राबवताना दिसत . महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांचे रोखठोक दीक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रेदरम्यान बारामतीत सरकारच्या दरबारी रोखठोक सवाल...केला तरज्या..देशातील पत्रकार आणि वृत्तपत्र बळकट तेथील लोकशाही बळकट असे त्यांनी म्हटले .

दीक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रा लोकशाहीच्या बळकटीसाठी पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी दिनांक २८ जुलै २०२४ प्रारंभ होऊन राज्यभर, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने ही संवाद यात्रा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे सरचिटणीस विश्वासराव आरोटे आणि यात्रा समितीच्या माध्यमातून महाराष्ट्रभर ही पत्रकार संवाद यात्रा सुरू आहे . या संवाद यात्रेचे शनिवार दि. १७ रोजी बारामतीत जोरदार स्वागत सोलापूरचे मा. पालकमंत्री तथा इंदापूरचे आमदार दत्तात्रय भरणे उद्योजक प्रवीण माने,बारामती शहराचे पोलीस निरीक्षक संतोष घोळवे, पुणे जिल्हाध्यक्ष नीलकंठ मोहिते बारामती तालुकाध्यक्ष संतोष जाधव बारामतीतील संपादक व पत्रकार यांच्या वतीने जोरदार असे स्वागत करण्यात आले.

## दि बारामती मर्चंटस् असोसिएशन तर्फे स्वातंत्र्यदिनी वृक्षारोपण



**बारामती :** दि बारामती मर्चंट्स असोसिएशन संस्थेने देशाच्या ७८ व्या स्वातंत्र्यदिना निमित्त बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य तसेच जळोची येथील उपबाजार आवारात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपणाचा कार्यक्रम राबविण्यात आला.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष संभाजी किर्वे,उपाध्यक्ष निलेश भिंगे, सचिन सातव,माजी अध्यक्ष बाळासाहेब फराटे,महावीर वडुज कर,पदाधिकारी,कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनील पवार,सचिव अरविंद जगताप, संचालक संतोष आटोळे,भाजी मंडईचे अध्यक्ष सईद बागवान, बाजार समितीचे कर्मचारी,व्यापारी बांधव मोठ्या प्रमाणात उप स्थित होते.मर्चंटस् असोसिएशन तर्फे दरवर्षी दि.१५ ऑगस्ट रोजी वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घेणार आहोत,असे अध्यक्ष संभाजी किर्वे यांनी सांगितले.

## ढमाळ यांचे कॅप्टनपदाचे स्वप्न पूर्ण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**बारामती :** तालुक्यातील कान्हाटी येथील शेतकरी कुटुंबा तील अशोक ढमाळ यांची नुक तीच मर्चंट नेव्हीमध्ये कॅप्टनपदी निवड झाली. त्यांचे वडील माजी सैनिक असून ते सध्या शेती करतात. त्यांच्या या निवडीबद्दल ग्रामस्थांच्या वतीने स्वातंत्र्यदिनी त्यांचा सत्कार करण्यात आला.

कॅप्टन ढमाळ यांनी प्रतिकूल परिस्थितीतून जिद्द, चिकाटी व मोठ्या कष्टाने या पदापर्यंतचा प्रवास केला. सागरी क्षेत्रातील नोकरीच्या प्रवासाची सुरुवात डेक रेटिंग या पदापासून केली. पुढील पदाच्या परीक्षा देत त्यांनी थर्ड ऑफिसर, सेकंड ऑफिसर, चीफ ऑफिसर आणि आता सर्वोच्च कॅप्टनपद मिळविले. त्यांनी इंग्लंडमधील साऊथॅम्प्टन सोलंट युनिव्हर्सिटीमधून कॅप्टनपदाची परीक्षा ऑनलाइन पद्धतीने दिली होती. त्याचा निकाल नुकताच लागला. या पदावर प्रत्यक्ष कामासाठी त्यांची लवकरच नियुक्ती होणार आहे. सध्या ते मरिटेक टँकर मॅनेजमेंट शाखा कार्यालय मुंबई या कंपनीमध्ये चीफ ऑफिसर पदावर कार्यरत आहेत.गेल्या १६ वर्षांपासून ढमाळ मर्चंट नेव्हीमध्ये नोकरी करतात. या कालावधीत त्यांनी जगातील सुमारे १५०पेक्षा अधिक देशांत प्रवास केल्याची माहिती दिली.

## जेजुरी रेल्वे स्टेशनवर सुपरफास्ट रेल्वे गाड्यांना थांबा मिळावा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या खंडोबा देवाच्या दर्शनासाठी दरवर्षी 70 लाखाहून अधिक भाविक येत असतात. तसेच देशातील अनेक राज्यातील कामगार येथील औद्योगिक क्षेत्रात ये जा करीत असतात. लाखो भाविक व कामगारांच्या हितासाठी जेजुरी रेल्वे स्टेशन मध्ये सुपरफास्ट रेल्वे गाड्यांना थांबा मिळावा अशी मागणी जेजुरी रेल्वे प्रवाशी संघटनेच्या वतीने खासदार सुनेत्रा पवार यांच्याकडे केली आहे. जेजुरी रेल्वे स्टेशन मधून लाखो भाविक,कामगार,प्रवाशी, चाकरमानी, शेतकरी वर्ग रेल्वेच्या द्वारे प्रवास करत असतात. जेजुरी रेल्वे स्टेशन मध्ये केवळ आठच रेल्वे गाड्या थांबतात. मुंबई ये कोल्हापूर ही सह्याद्री गाडी पूर्वी जेजुरी येथे थांबत होती सध्या या गाडीचा जेजुरी येथील थांबा रद्द केला आहे.तसेच लांब पल्याच्या रेल्वे गाड्या थांबत नाहीत. त्यामुळे प्रवाशी वर्गाचे मोठे नुकसान होत आहे. अनेक वेळा प्रवाश्यांना सातारा किंवा पुण्यात उतरून इतर वाहनांनी जेजुरीत यावे लागते.

जेजुरी हे महाराष्ट्राचे कुलदैवत असून दरवर्षी लाखो भाविक येथे देवदर्शनासाठी येतात,उत्तर प्रदेश,बिहार,मध्यप्रदेश,झारखंड, गुजरात,राजस्थान , कर्नाटक, आदी राज्यातून मोठ्या संख्येने येथील औद्योगिक क्षेत्रात नोकरीसाठी हजारो तरुण येजा करीत असतात.तसेच हजारो प्रवाशी,विद्यार्थी येजा करीत असतात. मात्र लांब पल्ल्याच्या गाड्यांना थांबा नसल्याने प्रवाशांचे हाल होत आहेत असे जेजुरी प्रवाशी संघटनेचे अध्यक्ष विजय खोमणे यांनी सांगितले.

जेजुरी रेल्वे स्टेशन वरून कोल्हापूर निझमुद्दिन एक्स्प्रेस, कोल्हापूर अहमदाबाद, एक्स्प्रेस, गोवा एक्स्प्रेस, अजमेर बंगलोर एक्स्प्रेस, लोकमान्य हुबळी एक्स्प्रेस, महालक्ष्मी, पांदेचरी एक्स्प्रेस, चंदीगड यशवांतपुर एक्स्प्रेस, दादर म्हैसूर, आणि जोधपूर मंगलोर या दहा एक्स्प्रेस रेल्वे गाड्या जातात.

POSITIVE NEWS! जुन्नर तालुका राखी पौर्णिमा



## आ. अतुल बेनके बनले राखीमॅन १५ हजाराहून अधिक महिला भगिनींनी बांधली राखी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नारायणगांव :** शिवजन्मभूमी जुन्नर तालुक्याचे आमदार अतुल बेनके हे राखीमॅन बनले आहेत. रक्षाबंधन सणाच्या निमित्ताने आयोजित रक्षाबंधन सोहळ्यात जुन्नर तालुक्याचे आमदार अतुल बेनके यांना जुन्नर तालुक्यातील १५ हजाराहून अधिक महिला भगिनींनी राखी बांधली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून बेनके कुटुंबाची रक्षाबंधन कार्यक्रम साजरा करण्याची परंपरा आहे. दरवर्षी प्रमाणे यंदाही रक्षाबंधन सोहळ्याला उस्फुर्त प्रतिसाद पाहायला मिळाला. राखी बांधण्यासाठी आलेल्या महिलांच्या गर्दीने १४ नंबर येथील ब्लुमिंगडेल इंटरनॅशनल स्कूल या ठिकाणी आयोजित या कार्यक्रम प्रसंगी उत्साहाचे आणि उत्सवाचे वातावरण पाहायला मिळाले. यंदाच्या वर्षी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना राखी बांधून त्यांच्या प्रमुख उपस्थितीत या सोहळ्याची सुरुवात करण्यात आली. यावेळी दादांनी उपस्थित महिलांशी संवाद देखील साधला. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करत असताना आमदार बेनके यांनी रक्षाबंधनाची सांस्कृतिक परंपरा जपत एक चांगला सामाजिक आदर्श निर्माण केला आहे. तालुक्यातील महिला भगिनींचे प्रश्न, समस्या सोडवण्यासाठी त्यांच्याशी आपुलकीने संवाद साधण्याचे हे उत्तम व्यासपीठ आमदार अतुल बेनके यांनी उपलब्ध करून दिले आहे. राखी बांधण्यासाठी आलेल्या महिला भगिनींसोबत सेल्फी घेत फोटो काढत आनंदात आणि उत्साहात त्यांनी हा उत्सव साजरा केला. रक्षाबंधन... भाऊ बहिणीच्या पवित्र आणि हक्काच्या नात्यातील प्रेम, विश्वास, ऋणानुबंध वाढवणारा सण ... दरवर्षीप्रमाणे याही वर्षी जुन्नर तालुक्यातील विविध भागातून आलेल्या अनेक भगिनींनी मला आपुलकीने राखी बांधल्या. अतिशय उत्साहात आणि आनंदाने आम्ही रक्षाबंधन सण साजरा केला. खरं तर या दिवसाची मी दरवर्षी आतुरतेने वाट पाहत असतो बेनके कुटुंब आणि माझ्यावर प्रेम करणाऱ्या माझ्या बहिणींना भेटून आनंद साजरा करण्याचा हा दिवस. दिवसभरात तालुक्यातील विविध ठिकाणांहून आलेल्या या सर्व भगिनींनी यावर्षीचा रक्षाबंधन सोहळा आणखी अविस्मरणीय केला.

## झाडांना राख्या बांधून मुलींनी केले रक्षाबंधन



**धामणी :** येथील शिवाजी विद्यालय व ज्यूनिअर कॉलेज मधील मुलींनी झाडांना राख्या बांधून अनोखे रक्षाबंधन साजरे केले आहे.' वृक्षवल्ली आम्हा सोयरे ' या उक्ती प्रमाणे वृक्ष लागवड व संवर्धन या संदर्भात शिक्षकांनी माहिती देताना दैनदिन जीवनात वृक्षांचे महत्त्व, वाढते प्रदूषण, पावसाचे कमी प्रमाण, बेसुमार वृक्षतोडीमुळे उष्णता वाढणे,ऑक्सीजन कमी मिळणे इत्यादी समस्या निर्माण झाल्यानंतर आपल्या संरक्षणाची जबाबदारी आपल्या परिसरातील झाडे घेत असून पर्यावरणाचा समतोल राखत आहे.वृक्ष आपल्या कुटूंबातील एक घटक आहे.त्यामुळे झाडांना राख्या बांधून रक्षा बंधन साजरा करण्यात यावा असे रयत शिक्षण संस्थेचे पश्चिम विभागाचे सहाय्यक विभागीय अधिकारी व विद्यालयाचे प्राचार्य डी.आर.गायकवाड यांनी सुचवले. त्यानंतर विद्यालयातील मूलींनी मुलांना राख्या बांधून हा सण मोठ्या उत्साहात व आनंदी वातावरणात साजरा केला. यावेळी पर्यवेक्षक दिपक शेंडकर, शिक्षक एस.एल कोकाटे तसेच सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थितीत होते.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना कळविण्यात येते की, कै. मेहजबीन इकबाल पठाण यांचे दि. ०१/०४/२०२१ रोजी निधन झाले आहे. त्यांचे नावे आर.टी.ओ.पुणे येथे नोंद असलेल्या दोन चाकी TVS WEGO वाहन क्र. MH 12 JD 6137 चासी नं. MD626AG44C1A13219 व इंजिन नं. 0G4AC1297417 असे आहे.

त्यांच्या नंतर वारसदार म्हणून त्यांचा मी इकबाल गुलाब पठाण राहणार स.नं. ६२९/२, फ्लॅट नं. १८, बिल्डींग बी२, सिल्वर इस्टेट, कोणार्क गार्डन जवळ, बिबवेवाडी, पुणे - ४११०३७. तरी वरील गाडी माझ्या नावावर करण्यासाठी आर.टी.ओ.पुणे, येथे अर्ज करीत आहे. सबब याबाबत कोणाची काही हरकत, तक्रार असल्यास ही जाहीर नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत लेखी पुराव्यासह करावी किंवा ९८९०६२०९२० नंबरवर संपर्क करावा. अन्यथा नंतर कोणाचीही कसलीही तक्रार, सबब किंवा हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**जाहीर नोटीस**

कि अर्ज ने १११३/२४

१) श्रीमती माधवी मुकुंद तांबे
वय : ७२ वर्ष, धंदा : गृहिणी
२) निखिल मुकुंद तांबे
वय : ४६, धंदा : नौकरी पधेरा फ्लॅट नं. ३०३ स. न.४५१४
गिरजा सचिन देशपांडे देवदत कृपा, परवर्तन बाग, कर्वेनगर
वय : ४९, धंदा : गृहिणी, रा. B१७०२ निदाघ स्तुरंग सं. नं. ४९११ सातारारोड समोर पुणे ४११००९.
..........अर्जदार

वि

कोणीही नाही ......जाब देणार

स्व. मुकुंद राजाराम तांबे
निधन दि. १७/०५/२४

या आर्थी अर्जदार हे स्व. मुकुंद राजाराम तांबे यांचे कायदेशीर असून मिळ वा करीता या में. कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी अर्जदाना व्यतिरिक्त मयताचे अन्य वारस असल्यास त्यांनी स्वःता अथवा प्रतिनिधी मार्फत या मे. न्यायालयात दिनांक २३/०८/२४ रोजी ११.०० वाजता हजर राहावे व आपले म्हणणे सादर करावे. सदर तारखेस कोणाचीही काहीही हरकत न आल्यास चौकशीचे कामकाम पूर्ण होवून अर्जाचा निकाल देण्यात येईल.

येणे प्रमाणे जाहीर बोगस आज दि. रोजी आमच्या सही व निशानी व कोर्टाच्या शिकुयानिशी केलेली आहे.

पुणे
दि. ०९/०८/२४

**अँड. अनिल हरी देव**
**पुणे येथील दिवाणी न्यायाधिश वरिस्वर स्तर यांचे कोर्टात**

**जाहीर आवाहन**

सर्व लोकांना कळविण्यात येत की सुनील अशोक खंबड मुक्काम पोस्ट सर्वे नंबर २१३ दिघी रोड पुणे ४११०३३९ यांचे नुकतेच निधन झाले असून त्यांच्या नावावर असलेले चार चाकी खाजगी वाहन नंबरMH14-KB-6195 त्याचा चासी नंबर 85078व इंजिन नंबर29360 असा असून सदर वाहन त्यांची एकमेव कायदेशीर वारसदार पत्नी श्रीमती संगीता सुनील खंबड यांच्या नावावर पिंपरी चिंचवड आरटीओ कार्यालयात करण्यात येणार असून याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास पंधरा दिवसाच्या आत कार्यालयात कळवावे अन्यथा कोणाची काही तक्रार नाही हे समजुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दि. २०/०८/२०२४

- श्रीमती संगीता सुनील खंबड
सर्वे नंबर २१३ दिघी रोड,
पुणे ४११०३९

**जाहीर आवाहन**

जाहीर आवाहन सर्व लोकांना कळविण्यात येते की हातिम फकरूदिन सियामवाला मुक्काम पोस्ट ४५८ एलीफिस्टन रोड बोहरी मशीद जवळ पुणे ४११००३ यांचे नुकतेच निधन झाले असून त्यांच्या नावावर असलेली मोटरसायकल नंबरMH12-HJ-7752 असा असून सदर वाहन यांची कायदेशीर एकमेव वारसदार पत्नी रबाब हातिम सियाम वाला यांच्या नावावर करण्यात येणार असून याबाबत कोणाची काही तक्रार असेल तर पुणे आरटीओ ला कळविण्यात यावे अन्यथा पंधरा दिवसानंतर सदर वाहन नावावर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दि.२०/०८/२०२४

**श्रीमती रबाब हातिम सियामवाला**
४५८, एलीफिस्टन रोड बोहरी मशिद जवळ खडकी पुणे४११००३

**आरोग्य विभाग जाहीर निवेदन**

दौंड शहरातील नागरिकांना कळविण्यात येते की, Prohibition of Employment as manual scavenging and there Rehabilitation Act 2013 नुसार हाताने मैला उपसणे बेकायदेशीर असून, दौंड शहरामध्ये कोणीही हाताने मैला उपसत असलेची तक्रार दौंड नगरपरिषदेमध्ये आलेली नाही व भविष्यातही येणार नाही, याची दखल दौंड नगरपरिषदेच्या वतीने घेण्यात आली आहे. तसेच दौंड शहरामध्ये सर्व सार्वजनिक, सामुदायिक व वैयक्तिक शौचालयांचा मैला दौड नगरपरिषदेच्या वतीने व खाजगी मक्तेदार यांचेकडील मैला उपसणाऱ्या वाहनाने त्यावरील प्रशिक्षित कर्मचाऱ्यांच्या मार्फत उपसा करत आहे.

तरी सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने दौंड शहरामध्ये कोठेही हाताने मैला उपसत असल्याचे निदर्शनास आल्यास अथवा तक्रार प्राप्त झाल्यास Prohibition of Employment as manual Scavenging and there Rehabilitation Act 2013 नुसार संबंधितावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल, याची सर्व नागरिकांनी दखल घेऊन हाताने मैला न उपसता नगरपरिषदेकडे किंवा खाजगी व्यक्तीकडे उपलब्ध असलेल्या मैलागाडीमार्फत आपले सेप्टीक टँक साफ करून घ्यावेत, याची सर्व नागरिकांनी नोंद घ्यावी.

(शिक्का)

**(सुषमा शिंदे)**
**मुख्याधिकारी**
**दौंड नगरपरिषद**

## महिला वर्गाकडून उत्फूर्तपणे स्वागत

# ‘लाडकी बहिण’ला शरद पवारांचाही विरोध

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** महायुती सरकारची लाडकी बहिण योजनेला राज्यातील महिला वर्गाकडून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत असून, या योजनेचे त्यांनी स्वागत केले आहे. ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला चालना देणारी ही योजना, लोकप्रिय ठरत असल्याचे लक्षात असल्यानेच, विरोधकांकडून तिला लक्ष्य केले जात आहे. आता ज्येष्ठ नेते शरद पवार यांनीही या योजनेविरोधात भाष्य केले आहे.

‘रयत व अन्य काही शिक्षणसंस्थांमध्ये सरकारकडून विद्यार्थ्यांना आर्थिक लाभ देण्यासंबधीच्या ज्या योजना आहेत, त्याच्या बऱ्याच मोठ्या रकमा थकलेल्या आहेत, असे संस्थाचालकांनी सांगितले. असे असताना नव्याने आर्थिक बोजा वाढवला जात आहे,’ अशी टीका शरद पवार यांनी ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण’ या बहुचर्चित योजनेचे नाव न घेता केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून भाषण करताना ‘वन नेशन वन इलेक्शन’ असे सांगितले. दुसऱ्याच दिवशी निवडणूक आयोगाने त्याच्या बरोबर विसंगत कृती केली. चार राज्यांमधील निवडणूकाही ते एकाच वेळी घेऊ शकत नाहीत. लाडकी बहीण योजना फक्त महाराष्ट्रात आहे, असे पवार यांनी सांगितले. प्रत्यक्षात ही योजना मध्य प्रदेश सरकारने प्रथम आणली. तिला मिळालेली लोकप्रियता लक्षात घेता, राज्यातील महायुती सरकारने ती राबवायचा निर्णय घेतला, याचा विसर पवारांना पडलेला दिसतो.

मोदी बाग या आपल्या निवासस्थानी सोमवारी पत्रकारांबरोबर बोलताना पवार यांनी विविध विषयांवर मत व्यक्त केले. अलीकडे, अजित पवार भाषणांमध्ये सातत्याने शरद पवार यांच्यावर टीका करायला नको होती, असे म्हणत आहेत, याकडे लक्ष वेधल्यानंतर पवार म्हणाले, ते असे काही म्हणाल्याचे मी ऐकलेले नाही. बारातमीमधून विधानसभा लढण्यात रस नाही, हे त्यांचे वक्तव्यही मी ऐकलेले नाही. मात्र, सार्वजनिक जीवनात अनेक निवडणूक लढवलेल्या व्यक्तीला त्याचे मत व्यक्त करण्याचा किंवा निर्णय घेण्याचा अधिकार आहे, असे ते म्हणाले.

## राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## नाशिक, विदर्भ, मराठवाड्यात मुसळधार

**नाशिक :** जेमतेम अर्ध्या तासाच्या पावसाने सोमवारी दुपारी शहराला झोडपून काढले. शहरातील रस्त्यांना नाले, नद्यांचे रूप आले. शहरातील उड्डाणपूल आणि पुलाखाली जाणाऱ्या रस्त्यावरदेखील पाणी साचले होते. त्यामुळे नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली. केवळ अर्ध्या तास कोसळलेल्या मुसळधारेने जनजीवन विस्कळीत झाले. विदर्भ, मराठवाडा भागातही जोरदार पावसाने हजेरी



लावली आहे. जोरदार गर्जना आणि विजेच्या कडकडाटात पाऊस मनमुराद बरसला. या पावसामुळे धरणक्षेत्र परिसरातील पाण्याच्या पातळीत मोठी वाढ होणार आहे. अकोला जिल्ह्यातही गेल्या आठ दिवसांपासून दडी मारलेल्या पावसाने सोमवारी दुपारी हजेरी लावली. ढगांचा गडगडाट आणि विजांचा चमचमाट सुरू असतानाच पावसाने झोडपून काढले. सिधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ, सावंतवाडी, दोडामार्ग, वैभववाडी भागात सलग दुसऱ्या दिवशीही पावसाचा जोर कायम आहे. आठ ते दहा दिवस विश्रांती घेतलेल्या पावसाने कमबॅक केल्याने शेतकरी समाधानी झाले आहेत. पावसाने उघडीप घेतल्यामुळे भात शेतीवर करपा रोगाचा आणि किडींचा प्रादुर्भाव वाढला होता. यवतमाळ जिल्ह्यातही विजांच्या गडगडाटासह मुसळधार पावसाने हजेरी लावली. जिल्ह्यात जुलैच्या शेवटच्या आठवड्यापासून ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात संततधार पावसाने १५ दिवस हजेरी लावली होती. त्यामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले होते. हा पाऊस लाभदायक ठरत असल्याने शेतकऱ्यात आनंदाचे वातावरण आहे. नांदेड जिल्ह्याच्या किनवट तालुक्यातील अप्पाराव पेठ येथील नाल्याला अचानक पूर आल्याने एक बैल जोडी वाहून गेली.

## » Selected

### वाघाच्या हल्ल्यात गुराखी ठार

**गडचिरोली** : मुल शहराला लागून असलेल्या जंगलात दबा धरुन बसलेल्या वाघाने हल्ला केला असता गुराखी मूनिम गुरलावर (४५) याचा मृत्यू झाला. ही घटना सोमवारी सकाळी उघडकीस आली. वाघाचे हल्ले वाढले असल्याने बंदोबस्त करावा अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. चिचाळा येथील रहिवाशी असलेला गुरलावार रविवार, १८ ऑगस्ट रोजी सकाळी २५ शेळ्या घेऊन जंगलात गेला होता. सायंकाळी २४ शेळ्या घरी परतल्या. मात्र मुनिम व एक शेळी घरी परत आली नाही. त्यामुळे काही अनुचित घटना घडली असावी असा संशय ग्रामस्थांना आला. संध्याकाळी ३० - ४० ग्रामस्थ जंगलात मुनिम याचा शोध घेण्यासाठी गेले. तिथे ग्रामस्थांना रक्त सांडलेले दिसले. सोमवारी सकाळी वन विभागाच्या अधिकारी, पथकाने व ग्रामस्थांनी जंगलात जाऊन बघितले असता मुनिम याचा मृतदेह आढळला.

### कांदा घोटाळ्याची यादी व्हायरल

**नाशिक** : जिल्ह्यातील कांदा घोटाळ्याची यादी सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे. जूनमध्ये नाफेडचे अध्यक्ष जेठाभाई अहीर यांनी केलेल्या पाहणीत देखील नाफेडच्या कांदा खरेदीत घोटाळा होत असल्याचे उघड झाले होते. घोटाळा समोर आल्यानंतर काही दिवसांपूर्वीच नाफेडच्या दोन अधिकाऱ्यांची तडकाफडकी बदली करण्यात आली होती. कांद्याने लोकसभा निवडणुकीत भाजपला झटका दिला. कांदा निर्यातीसंदर्भात घेतलेल्या धोरणामुळे फटका बसल्याचे मानले जात होते. आता नाशिकमधील कांद्याचा घोटाळा समोर आला आहे. तब्बल सहा हजार शेतकऱ्यांच्या कांदा खरेदीची यादी सोशल मीडियावर समोर आली आहे. व्हायरल यादीमध्ये यावर्षीच्या १८ मे ते २० जुलै पर्यंतच्या कांदा खरेदीची माहिती दिली आहे. कांदा खरेदी केलेल्या शेतकऱ्यांच्या सातबारा नोंदीपुढे शून्य आणि केवळ ७/१२ अशी नोंद असे दाखवले आहे.

# लाडकी बहीणशिवाय बोलण्यासारखे काही नाही : सुळे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नाशिक :** महाराष्ट्र सरकारकडे लाडकी बहीण योजनेशिवाय बोलण्यासारखे काहीही उरलेले नाही, अशी टीका सुप्रिया सुळे यांनी केली आहे.

निवडणूक पुढे ढकलली तरीही तुम्ही निकाल कसा बदलणार? लाडकी बहीण योजनेशिवाय हे पास होत नसतील तर यातच अपयश दिसतं. पैसे वाटून निवडणूक जिंकता आले असते तर लोकसभेत जिंकले असते. महाराष्ट्रातली मायबाप जनता स्वाभिमानी आहे आणि इमानदार आहे, असे त्या म्हणाल्या.

लाडकी बहीण योजनेसाठी २०० कोटी रुपये देऊन जाहिरात करत असाल तर त्याचे स्पष्टीकरण सरकारने दिले पाहिजे. तेच पैसे आशा वर्कर्स आणि अंगणवाडी महिला कर्मचाऱ्यांना दिले असते तर त्यांची दिवाळी गोड झाली असती. जो उठतो आहे तो धमकी देतोय. एक तर त्यांचे सरकार येणार नाही आणि ही योजना बंद होणार नाही. आमचे सरकार आल्यानंतर या योजनेत आम्ही आणखी सुधारणा करणार आहोत. लोकसभेच्या आधी बहीण लाडकी नव्हती.” असा टोला सुळेंनी लगावला.

देवेंद्र फडणवीस यांच्याशी मी कुठेही संवाद साधायला तयार आहे. त्यांनी वेळ द्यावी. त्यांनी चुकीचे आरोप केले आहेत. चुकीच्या घटना कुठे होत आहेत त्यांना माहीत नाही. नागपूरमध्ये पोलीस स्टेशनवर जुगार खेळला जात असल्याच्या घटना घडत आहेत. त्याकडे फडणवीसांनी पाहिलं पाहिजे, मग दुसऱ्यांना नावं ठेवावीत, असेही सुळे म्हणाल्या. अजित पवारांना काळे झेंडे दाखवले तो त्यांच्या महायुतीतला अंतर्गत प्रश्न आहे. पण, प्रत्येकाचा मान सन्मान केला पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

## भिडेंच्या प्रतिक्रियेस पवारांचा नकार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी मराठा आरक्षणाबाबत केलेल्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देण्यास नकार दिला.

भिडे यांनी मराठा समाजाला आरक्षणाची गरज नाही, अशी अप्रत्यक्षपणे भूमिका मांडली आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे नाराजी व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे भिडे यांनी काही महिन्यांपूर्वी मनोज जरांगे यांची भेट घेतली होती. भिडे यांनी मराठा आरक्षणाबाबत केलेल्या वक्तव्याबाबत पवारांनी खोचक टीका करत फार बोलणं टाळलं. संभाजी भिडे हे काय कमेंट करण्याच्या लायकीचे आहेत का? काहीही प्रश्न विचारता. आपल्या लोकांचा दर्जा फार उतरलेला आहे. संभाजी भिडे आणि अमुक-तमुक...”, असं म्हणत पवार यांनी त्यावर फार प्रतिक्रिया देणं टाळलं.

# ... तर शिंदे खोटेच बोलणार : राऊत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** एकनाथ शिंदे ज्यांच्या नादाला लागले आहेत ते सगळे



खोटारडे, ढोंगी लोक आहेत. लांडग्यांच्या कळपात शिरल्यावर शिंदे खोटेच बोलणार आहेत, अशी टीका शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केली आहे. उद्धव ठाकरे यांच्यामुळेच राज ठाकरे यांना शिवसेनेतून बाहेर पडावे लागले. त्यांनी शिवसेना सोडावी ही बाळासाहेबांची इच्छा नव्हती, असे वक्तव्य शिंदे यांनी केले होते.

राऊत म्हणाले की, राज ठाकरेंनी पक्ष सोडला तेव्हा एकनाथ शिंदे आमच्या सोबतच होते. तेव्हा ठाण्याच्या पुढे त्यांची काही मजल नव्हती. २५ वर्षाआधीच्या राजकरण्यात त्यांचा काही सहभाग नव्हता. शिंदे हल्ली चित्रपट निर्माते जास्त झालेत. त्यांच्यासाठी त्या काळात मातोश्रीचे दरवाजेच उघडे नव्हते. त्यांना काय घडले आहे याबाबत माहिती नाही. आम्ही त्या गोष्टीचे साक्षीदार आहोत. त्यांना जर एखादा सिनेमा त्या विषयावर काढायचा असेल, एक नंबर, दोन नंबर तर त्यांना मी प्रत्यक्ष कथानक काय घडले आहे हे द्यायला तयार आहे. मी मागे म्हणालो होतो की, नमक हराम २ सिनेमा काढणार आहे. पडद्यामागच्या सगळ्या पटकथा नमक हराम २ मध्ये दाखवू, असा पलटवार त्यांनी शिंदे यांच्यावर केला.

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुका लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. डिसेंबर महिन्यात निवडणुका होऊ शकतात, असे बोलले जात आहे. याबाबत राऊत म्हणाले की, निवडणूक आयोग ही संविधानिक संस्था आहे. पण ती राजकारण्यांच्या हातचं हत्यार आणि बाहुलं बनणार असेल तर देशातील संविधान धोक्यात आहे. निवडणुका डिसेंबर महिन्यात होणार असतील तर ही सत्ताधाऱ्यांची सोय आहे. ज्यांना महाराष्ट्रात पराभवाची भीती वाटते त्यांनी हा डाव टाकला आहे.

## ७१ उमेदवारांनी शहर काँग्रेसकडे केले अर्ज

# उपराजधानीत काँग्रेसची जय्यत तयारी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नागपूर :** शहरातील सहा विधानसभा मतदारसंघावर काँग्रेसने (Congress) दावा केला होता. आता या सर्व मतदारसंघात निवडणूक पूर्वतयारीला सुरवात झाल्याचे काँग्रेसचे शहर अध्यक्ष व आमदार विकास ठाकरे यांनी सांगितले.

काँग्रेसने आपल्या विद्यमान आमदारांना विधानसभा निवडणुकीच्या तयारीला लागण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार मतदारसंघात ब्लॉक अध्यक्ष आणि बूथ प्रमुखांच्या बैठका, कार्यकर्त्यांचे मेळावे सुरु झाले आहेत. काँग्रेसच्या दोन आमदारांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे, तर चार आमदार लोकसभेचे खासदार झाले आहेत. एका आमदाराचे निधन झाले. त्यामुळे सध्या काँग्रेसच्या ३८ आमदारांनी तयारी सुरु केली. उत्तर नागपूरमतदार संघात नितीन राऊत आमदार आहेत. त्यांनी जोरदार निवडणूकपूर्व कॅम्पेन सुरू केले आहे. त्यामुळे राज्याची उपराजधानी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शहरात काँग्रेसने जोरदार मोर्चे बांधणी केल्याचे चित्र आहे.

शहरातील सहा मतदारसंघात आतापर्यंत ७१ इच्छुक उमेदवारांनी शहर काँग्रेसकडे उमेदवारी मिळावी, यासाठी अर्ज केले आहेत. सर्वाधिक ३० अर्ज मध्य नागपूर विधानसभेसाठी आले असल्याचे ठाकरे यांनी सांगितले. देवेंद्र फडणवीस यांच्या विरोधात लढण्यासाठीदेखील काँग्रेसमध्ये इच्छुकांची मोठी यादी असल्याचे ठाकरे म्हणाले.

## संजय पांडे वर्सोवातून लढणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** माजी पोलीस आयुक्त संजय पांडे यांनी विधानसभेच्या रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतला आहे. पांडे यांनी प्रचाराला सुरुवात केली असून त्यांनी वर्सोवा मतदारसंघातून निवडणूक लढवणार याबद्दलही घोषणा केली आहे.

बेकायदेशीर फोन टॅपिंग प्रकरणामुळे चर्चेत असलेले पांडे यांनी फेसबुकवर एक पोस्ट शेअर केली. या पोस्टमध्ये त्यांनी प्रचाराला सुरुवात केल्याचे सांगितले. आज वर्सोवा येथे झुलेलाल मंदिरातून वर्सोवा विधानसभा मतदारसंघासाठी प्रचार सुरुवात केली आहे. कुठलाही पक्ष नाही, पण आम्ही प्रयत्न करू...”, अशी पोस्ट पांडे यांनी केली होती. पांडे यांच्या पोस्टनंतर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली होती. यानंतर अनेक जण पांडे कोणत्या पक्षातून आणि कोणत्या मतदारसंघातून निवडणूक लढवणार याबद्दल तर्क-वितर्क लढवत होते.

## भारत- पाक (LOC) सीमेवर जवानांसोबत रक्षाबंधन

# आम्ही पुणेकर आणि श्री पांडुरंग आदर्श सेवा ट्रस्टचा पुढाकार



**काश्मीर/ कुपवारा** -: आम्ही पुणेकर संस्था आणि श्री पांडुरंग आदर्श सेवा ट्रस्ट यांच्या वतीने "राष्ट्रवीर सैनिक बंधुता रक्षाबंधन यात्रा"-२०२४ पुणे ते भारत-पाक सीमेवरील कुपवाडा जिल्ह्यातील केरन सेक्टर येथे सीमेवरील जवानांना राखी बांधून रक्षाबंधन साजरी करण्यात आली.

तसेच जवांनाना शुभेच्छा पत्र आणि रक्षा बंधन पेंटिंग देण्यात आले. यावेळी आम्ही पुणेकर संस्थेचे हेमंत जाधव, संतोष फुटक, श्री पांडुरंग आदर्श सेवा ट्रस्ट चे सुरज परदेशी, सागर बोदगिरे,लष्करी अधिकारी आणि सैन्यातील जवान उपस्थित होते. ह्या रक्षाबंधन यात्रे ची सुरुवात पुण्यापासून बाय रोड मुंबई - अहमदाबाद - उदयपूर - जयपूर - दिल्ली - पठाणकोट - उधमपूर -जम्मू - श्रीनगर - कुपवाडा - केरन बॉर्डर (LOC J & K) पर्यंत करण्यात आली.

यावेळी लष्करी अधिकाऱ्यांनी पुण्यातील शाळांमधील मुलांनी तयार केलेल्या राख्या आणि शुभेच्छा पत्रे पाहून समाधान व्यक्त केले.आम्ही घरापासून दूर आहोत असे आम्हाला वाटत नाही आलेल्या राख्या पाहून आपलेपणाची भावना निर्माण झाली. आलेल्या दोन्ही संस्थेचे त्यांनी आभार व्यक्त केले. हेमंत जाधव म्हणाले, तुम्ही देशांचे खरे हिरो आहात.तुमच्या मुळे आम्ही भारतात सुरक्षित आहोत. अशा रक्षाबंधन उत्सवासारखे अनेक उत्सव आनंदाने आम्ही तुमच्यामुळे साजरे करू शकतो. सुरज परदेशी म्हणाले, महाराष्ट्रतील सर्व बहिणींचे प्रेम आपल्यापर्यंत पोहचविण्याचे भाग्य लाभले.

सीमेवरील जवान दिवसरात्र आपले घर परिवार सोडून देशाची सीमेवर रक्षा करत असतात. देशातील सर्व बहिणी आपल्यासोबत आहेत. जवांनासोबत रक्षा बंधन करणे हेच खरे रक्षबंधन आहे असे आम्हा दोन्ही संस्थेला वाटते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सागर बोदगिरे यांनी केले आणि संतोष फुटक यांनी आभार मानले.

# म्हाडाच्या बोगस वेबसाईटवरून फसवणूक; दोघे अटकेत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**मुंबई :** म्हाडाच्या घराच्या शोधात असणाऱ्या लोकांची फसवणूक करण्याच्या नवीन धंद्याचा मुंबई पोलिसांनी भांडाफोड केला असून या प्रकरणी दोघांना अटक केली आहे. महानगरात आपले हक्काचे घर असावे, असे स्वप्न अनेक मध्यमवर्गीय पाहत असतात. त्या लोकांसाठी सरकारकडून म्हाडामार्फत (महाराष्ट्र आवास आणि क्षेत्र विकास प्राधिकरण) घरांची विक्री होत असते.


दोघांनी त्यासाठी म्हाडासारखीच वेबसाईट बनवली. घर घेणाऱ्या व्यक्तींना शोधून त्यांना त्या वेबसाईटमार्फत पेमेंट करण्याचे सांगितले जात होते. दोघांपैकी एक जण म्हाडाचा अधिकारी बनला. अखेर मुंबई पोलिसांच्या सायबर क्राईम युनिटने म्हाडाच्या या बनावट वेबसाईटचा भांडाफोड केला आहे. कल्पेश सेवक नावाच्या व्यक्तीने ओरिजनल वेबसाईटची कॉपी करुन दुसरी वेबसाईट बनवत त्या माध्यमातून लोकांची फसवणूक सुरु केली. कल्पेशने त्यासाठी अमोल पटेल याला सोबत घेतले. अमोल पटेल स्वत:ला म्हाडाचा अधिकारी म्हणवत होता. तो मुंबईतील गोरेगावमध्ये एका फ्लॅटसाठी ३० लाख रुपये देण्याचे सांगत होता. कल्पेश सेवक याला माहीममधून तर पटेल याला नालासोपारा येथून अटक करण्यात आली.

बनावट वेबसाईट mhada.org पटेल आणि सेवक यांनी केली. त्यानंतर ग्राहक शोधून त्यांना ऑनलाइन लिंक पाठवू लागले. त्या माध्यमातून पेमेंट करण्यास ते सांगत होते. ही वेबसाईट म्हाडाची ऑफिशियल वेबसाइट http://mhada.gov.in सारखीच दिसत होती. त्यामुळे युजरचा विश्वास बसत होता.

## महिला पोलिसपद भारी देवा!

# ३९२४ पदांसाठी पावणेतीन लाख अर्ज

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** सध्या राज्यात पोलिस भरती सुरू असून महिला उमेदवारांचा त्याला मोठा प्रतिसाद मिळत आहे. ३९२४ पदांसाठी सध्या भरती सुरू असून त्यासाठी तब्बल पावणेतीन लाखांहून अधिक महिलांनी अर्ज केले आहेत. विशेष म्हणजे, अर्ज करणाऱ्या महिलांपैकी एक लाखाहून अधिक महिला उमेदवार उच्चशिक्षित आहेत. मुंबईला सर्वाधिक पसंती असून एक लाखाहून अधिक महिलांनी मुंबई पोलीस दलातील भरतीसाठी अर्ज केले आहेत.

पोलीस दलातील एकूण १७ हजार ४७१ पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू आहे. त्यासाठी तब्बल १६ लाख ८८ हजार ७८५ अर्ज प्राप्त झाले आहेत. राज्यातील पोलीस शिपाई व चालकांच्या एकूण पदांपैकी ३० टक्के पदे महिलांसाठी आरक्षित आहेत. त्यामुळे राज्यभरात एकूण ३९२४ पदे महिला उमेदवारांसाठी उपलब्ध आहेत. या पदांसाठी अर्जांचा महापूर आला आहे. एकूण २ लाख ७८ हजार ८२९ महिला उमेदवारांनी या पदांसाठी अर्ज केले आहेत. म्हणजेच प्रत्येक पदासाठी किमान ७१ महिला उमेदवारांमध्ये स्पर्धा आहे. राज्यातील अनेक विभागात मुंबई विभागाला सर्वाधिक पसंती आहे. मुंबईत १२५७ पदांसाठी मैदानी परीक्षा सुरू आहे. त्यासाठी सुमारे १ लाख १० हजार महिला उमेदवारांनी अर्ज केले आहेत. दोन-तीन ठिकाणी अर्ज करणाऱ्या उमेदवारांची संख्या अधिक आहे. त्यात अनेकांनी मुंबईला पहिली पसंती दिल्यामुळे तुलनेने येथे अधिक अर्ज आले आहेत, असे एका अधिकाऱ्याने सांगितले.

### २२ केंद्रांमध्ये लेखी परीक्षा

- पोलीस भरती प्रक्रियेसाठी राज्यातील ६६ केंद्रांपैकी २२ केंद्रांमध्ये लेखी परीक्षा घेण्यात आली. त्यामध्ये मुंबई लोहमार्ग, मीरा- भाईंदर, नवी मुंबई, नाशिक शहर, छत्रपती संभाजीनगर शहर, सोलापूर शहर, अमरावती शहर, पालघर, सांगली, नाशिक ग्रामीण, अहमदनगर, धुळे, जळगाव, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण, बीड, जालना, यवतमाळ, लातूर, वाशीम, भंडारा, वर्धा व पुणे लोहमार्ग या २२ पोलीस आयुक्तालय आणि पोलीस अधीक्षक कार्यालयांचा समावेश आहे.

#रा



“ २०१८ पासून हार्दिक पांड्या कसोटी क्रिकेट खेळलेला नाही. दुलीप ट्रॉफीनंतर भारतीय खेळाडू बांगलादेश, न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्याविरुद्ध कसोटी मालिकेत खेळताना दिसतील. पण रोहित व विराट यांची दुलीप ट्रॉफी स्पर्धेच्या संघातील अनुपस्थिती लिटल मास्टर गावस्कर यांना खटकली आहे. या अनुभवी खेळाडूंना बांगलादेशविरुद्धच्या मालिकेपूर्वी सराव करण्याची ही संधी होती, असे गावस्कर यांचे मत आहे. "निवड समितीने रोहित शर्मा व विराट कोहली यांची दुलीप ट्रॉफीसाठी निवड केलेली नाही. या दोघांनाही बांगलादेश कसोटी मालिकेत सरावाशिवाय खेळावे लागणार आहे,"

— सुनील गावस्कर

## नेत्रदीपक प्रो गोविंदा लीग, सिझन २ जल्लोषात संपन्न

# सातारा सिंघम्सला विजेतेपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** गतविजेत्या सातारा सिंघम्स (जय जवान गोविंदा) संघाने प्रो गोविंदा लीग सीझन 2 च्या अंतिम फेरीत कोल्हापूर किंग्स (बालवीर गोविंदा) संघाला पराभूत करीत विजेतेपदासह २५ लाख रुपयांचे पारितोषिक जिंकले.

मुंबईतील डोम, एसव्हीपी स्टेडियमवर बहुप्रतीक्षित प्रो गोविंदा लीग सीझन 2 च्या सातारा सिंघम्स (जय जवान गोविंदा) आणि कोल्हापूर किंग्स (बालवीर गोविंदा) यांच्यामधील अंतिम फेरी विलक्षण रंगतदार झाली. वेळेच्या विरुद्धच्या शर्यतीत दोन्ही संघांचा एकामागून एक सामना झाला, केवळ त्यांच्या प्रभावी ॲथलेटिक क्षमतेचेच नव्हे तर उत्कृष्ट मानवी पिरॅमिड तयार करणारे त्यांचे अतूट सांघिक कार्य देखील प्रदर्शित केले गेले. अखेर गतविजेत्या सातारा सिंघम्स (जय जवान गोविंदा) संघाने विजय मिळविला.कोल्हापूर किंग्स (बालवीर गोविंदा) संघाला उपविजेते म्हणून १५ लाख रुपयांचे बक्षीस मिळाले.

या अंतिम फेरीने सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध क्रीडा इव्हेंटसाठी एक नवीन व्यासपीठ उपलब्ध झाले. आमदार प्रताप सरनाईक, प्रो गोविंदा लीगचे संस्थापक व अध्यक्ष, प्रो गोविंदा लीगचे अध्यक्ष पूर्वेश सरनाईक, प्रो गोविंदा लीगचे संचालक मजहर नाडियादवाला, प्रो गोविंदा लीगचे संचालक मोहम्मद मोरानी आणि विहंग सरनाईक यांच्यासह मान्यवर नेते यावेळी उपस्थित होते. स्टार स्पोर्ट्सने अधिकृत ब्रॉडकास्टर म्हणून काम केले, लीगचे प्रोफाइल उंचावले आणि टेलिव्हिजन स्क्रीनवर देशभरातील लाखो चाहत्यांचे लक्ष केंद्रित केले. या कार्यक्रमाने गोविंदांच्या अतुलनीय कौशल्यांचे प्रदर्शन केले आणि सांस्कृतिक अभिमानाची भावना वाढवली.

या कार्यक्रमात चार गटांमध्ये सोळा मातब्बर संघ सहभागी झाले होते. प्रत्येक गट टप्प्यातील सामना हा सहभागी संघांच्या कौशल्याचा आणि रणनीतीचा पुरावा होता आणि प्रेक्षकांसाठी रंजक ठरला. उपांत्यपूर्व फेरीत उच्च कौशल्यासह प्रतिभा आणि दृढनिश्चय यांचे रोमांचकारी प्रदर्शन होते. पहिल्या उपांत्यपूर्व फेरीत, ठाणे टायगर्स (आर्यन्स गोविंदा) यांचा सामना कोल्हापूर किंग्ज (बालवीर गोविंदा) यांच्याशी अत्यंत चुरशीच्या लढतीत खेळला गेला. कोल्हापूर किंग्जने अपवादात्मक कौशल्य आणि रणनीतीचा प्रत्यय घडविला आणि विजय मिळवला.

दुसऱ्या सामन्यात लातूर लिजेंड्स (यश गोविंदा) यांचा कोकण जायंट्स (कोकण नगर गोविंदा) विरुद्ध सामना होता, दोन्ही बाजूंनी सामना जिंकण्यासाठी त्यांच्या वचनबद्धतेचे प्रदर्शन केले. अखेर लातूर संघाने विजयश्री संपादन केली. सातारा सिंघम (जय जवान गोविंदा) मध्य मुंबई (ओम ब्रह्मांड साई गोविंदा) यांच्याशी भिडल्याने उत्साह कायम राहिला, तर पश्चिम मुंबई (हिंदमाता गोविंदा) अलिबाग नाइट्स (श्री अग्रेश्वर गोविंदा) विरुद्ध स्पर्धा करत, प्रत्येक सामना संघांच्या समर्पण आणि वचनबद्धतेवर प्रकाश टाकत होता. खेळासाठी.

## मोहम्मद शमीच्या पुनरागमनाची तारीख ठरली! खेळणार पहिला सामना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** भारतीय संघाचा स्टार गोलंदाज मोहम्मद शमी बऱ्याच काळापासून टीम इंडियाच्या बाहेर आहे. घोट्याच्या शस्त्रक्रियेनंतर शमी पुनर्वसन प्रक्रियेतून जात आहे. शमीने शेवटचा सामना २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकादरम्यान ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या अंतिम सामन्यात खेळला होता. तेव्हापासून तो विश्रांतीवर आहे. दरम्यान, मोहम्मद शमी आणि टीम इंडियाच्या चाहत्यांसाठी एक मोठी बातमी समोर आली आहे. मोहम्मद शमी भारतीय संघात कधी पुनरागमन करणार याची माहिती मिळाली आहे.

मोहम्मद शमी रणजी ट्रॉफीमध्ये बंगालसाठी देशांतर्गत क्रिकेटमध्ये पुनरागमन करण्याची शक्यता आहे. यानंतर तो न्यूझीलंडविरुद्ध कसोटी सामना खेळू शकतो. जे त्याचे आंतरराष्ट्रीय स्तरावर पुनरागमन असेल. फिटनेस तपासण्यासाठी शमी आधी देशांतर्गत क्रिकेटमध्ये खेळताना दिसेल. यानंतर भारत येत्या काळात बऱ्याच कसोटी मालिका खेळणार आहे. ज्यासाठी शमी संघात असल्यास संघाला अधिक मदत मिळेल.

पीटीआयच्या अहवालानुसार, मोहम्मद शमी बंगालच्या सलामीच्या रणजी सामन्यात ११ ऑक्टोबर रोजी यूपी विरुद्ध आणि पुढचा सामना १८ ऑक्टोबर रोजी कोलकाता येथे बिहार विरुद्ध खेळताना दिसू शकतो. या दोन्ही सामन्यांमध्ये तो दिसणार असल्याचे मानले जात आहे. मात्र, दोन्ही सामन्यांमध्ये केवळ दोन दिवसांचे अंतर असल्याने तो दोन्ही सामने खेळण्याची शक्यता नाही. भारताची न्यूझीलंड कसोटी मालिका १९ ऑक्टोबरपासून बेंगळुरूमध्ये सुरू होईल, त्यानंतर पुणे (२४ ऑक्टोबर) आणि मुंबईत (१ नोव्हेंबर) कसोटी सामने होतील.

## 'स्पोर्टसफिल्ड मान्सून लीग' अजिंक्यपद १४ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धा

# स्पार्क क्रिकेट ॲकॅडमी संघाचा सलग तिसरा विजय !!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** स्पोर्टसफिल्ड मॅनेजमेंट तर्फे आयोजित तिसऱ्या 'स्पोर्टसफिल्ड मान्सुन लीग' अजिंक्यपद १४ वर्षाखालील ३०-३० षटकांच्या क्रिकेट स्पर्धेत अर्थव बोडखे याने फटकावलेल्या धावांच्या जोरावर स्पार्क क्रिकेट ॲकॅडमीने सनराईझ क्रिकेट ॲकॅडमीचा पराभव करून सलग तिसरा विजय मिळवला.

सातारा रोड येथील टेंभेकर फार्मस् क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत पहिल्यांदा फलंदाजी करताना सनराईझ क्रिकेट ॲकॅडमीने ३० षटकामध्ये १२२ धावांचे आव्हान उभे केले. यामध्ये यशराज सोळंके (३० धावा) आणि प्रतिक शिंदे (२९ धावा) यांनी धावांचे योगदान दिले. गोलंदाजीमध्ये अर्थव बोडखे याने ९ धावात २ गडी बाद केले. हे लक्ष्य स्पार्क क्रिकेट ॲकॅडमीने २४.१ षटकात व ४ गडी गमावून पूर्ण केले. या विजयामध्ये अर्थव बोडखे याने ६३ चेंडूत ९ चौकारांसह ६० धावांची खेळी केली. विहान चोरेरा (नाबाद २४ धावा) आणि दिविज वैष्णव (२१ धावा) यांनीही धावांची जबाबदारी घेत संघाचा विजय साकार केला.

स्पार्क स्पोर्टीव्ह क्रिकेट ॲकॅडमी आणि विराग क्रिकेट ॲकॅडमी यांच्यामधील सामना पावसामुळे सामना रद्द करण्यात आला आणि दोन्ही संघांचा प्रत्येकी एकेक गुण देण्यात आला.


## केकआर सोबत नेमकं असं काय घडलं?

# रिंकु सिंगला रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुकडून खेळायचेय!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** इंडियन प्रीमिअर लीगच्या पुढील पर्वासाठी लिलाव प्रक्रिया पार पाडली जाणार आहे. BCCI लिलावापूर्वी प्रत्येक फ्रँचायझीला ६ खेळाडूंना कायम राखण्याची मुभा देण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आता या सहा जणांमध्ये आपला नंबर लागतो की नाही याची धाकधुक खेळाडूंना लागली आहे. संघातील स्टार खेळाडूंना कायम राखले जाईल, परंतु इतरांचे काय? अशात कोलकाता नाइट रायडर्सचा मॅच फिनिशर रिंकू सिंग याने गुगली टाकली आहे.

आयपीएलच्या २०२३च्या पर्वानंतर रिंकू सिंग हे नाव गाजतेय.. डावखुरा फलंदाज फिनिशर म्हणून प्रसिद्धीस आला आहे आणि KKR चा तो स्टार बनला आहे. गुजरात टायटन्सविरुद्ध अहमदाबाद येथील थरारक लढतीत त्याने शेवटच्या षटकात मारलेले पाच सिक्स अजूनही चाहत्यांना चांगलेच आठवत आहेत. त्यानंतर त्याला भारताच्या आयर्लंडविरुद्धच्या मालिकेत संधी मिळाली आणि आतापर्यंत त्याने



राष्ट्रीय संघाकडून २ वन डे व २३ ट्वेंटी-२० सामने खेळले आहेत. २६ वर्षीय खेळाडू KKR चा महत्त्वाचा खेळाडू आहे आणि आयपीएल २०२५ साठी त्याला रिटेन केले जाण्याची दाट शक्यता आहे. पण, जर कोलकाता फ्रँचायझीने रिलिज केल्यास रिंकूला विराट कोहलीच्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाकडून खेळायचे आहे.

रिंकून स्पोर्ट्स टूडेला दिलेल्या मुलाखतीत याबाबत मोठा खुलासा केला. कोलकाता नाइट रायडर्सने रिलिज केल्यास कोणत्या संघाकडून खेळायला आवडेल, या प्रश्नावर रिंकू म्हणाला,"RCB, कारण तिथे विराट कोहली आहे." नुकत्याच पार पडलेल्या ट्वेंटी-२० वर्ल्ड कप स्पर्धेसाठी निवडलेल्या चार राखीव खेळाडूंपैकी एक रिंकू होता. बीसीसीआयने ५ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या दुलीप ट्रॉफी २०२४ स्पर्धेसाठी रिंकूची निवड केलेली नाही. देशांतर्गत क्रिकेटमधील कामगिरी समाधानकारक नसल्याने दुलीप ट्रॉफीसाठी निवड झाली नसल्याचे प्रामाणिक उत्तर रिंकूने दिले. "मी चांगली कामगिरी केलेली नाही. रणजी ट्रॉफीत २-३ सामनेच खेळलो आहे आणि त्यातही अपयश आले. यामुळेच दुलीप ट्रॉफीसाठी माझी निवड झाली नाही. पुढच्यावेळेस नक्की माझी निवड होईल,"असे रिंकू म्हणाला.

## बदामीकर स्टार्स व सुप्रीम एसेस यांच्यात अंतिम लढत





**पुणे :** पीवायसी हिंदू जिमखाना आयोजित पहिल्या पीवायसी स्नुकर अँड बिलियर्डस लीग स्पर्धेत क्वालिफायर लढतीत बदामीकर स्टार्स संघाने जोग स्पेक्ट्रम कॉमेट्स संघाचा ४-३ असा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. तर, सुप्रीम एसेस संघाने गुणतालिकेत सलग पाच विजयासह अव्वल स्थान ठेवत याआधीच अंतिम फेरीत प्रवेश केला. पीवायसी जिमखाना येथील स्नुकर अँड बिलियर्डसमध्ये हॉलमध्ये सुरु असलेल्या या स्पर्धेत अतीतटीच्या क्वालिफायर लढतीत बदामीकर स्टार्स संघाने जोग स्पेक्ट्रम कॉमेट्स ४-३ असा संघर्षपूर्ण पराभव केला. सामन्यात १५ रेड स्नूकर एकेरीत बदामीकर स्टार्सच्या सिद्धार्थ बदामीकरने जोग स्पेक्ट्रम कॉमेट्सच्या सचिन संचेतीचा ८६-४५ असा पराभव करून संघाचे खाते उघडले. ६ रेड स्नूकर दुहेरीत बदामीकर स्टार्सच्या रणजित पांडे व शक्ती चितळे यांना कॉमेट्सच्या सचिन संचेती व संजीव आगाशे यांनी ३७-४७ असे पराभूत करून बरोबरी साधली. बिलियर्ड्स रेस टू १५०मध्ये राजवर्धन जोशीने कॉमेट्सच्या आदित्य अभ्यंकरचा ३७-०१ असा तर, ६ रेड स्नूकर एकेरीत बदामीकर स्टार्सच्या ईशान भालेला जोग स्पेक्ट्रम कॉमेट्सच्या आनंद आपटेने ४५-५७ असे पराभूत केले. ६ रेड स्नूकर दुहेरीत जोग स्पेक्ट्रम कॉमेट्सच्या सलील देशपांडे व रोहित सुगंधी यांनी बदामीकर स्टार्सच्या सौमित्र रानडे व श्री शिरोडकर यांचा ५७-३६ असा पराभव करून आघाडी घेतली. ६ रेड स्नुकर एकेरीत बदामीकर स्टार्सच्या राजवर्धन जोशीने विष्णू पुंडेचा ६१-४२ असा पराभव करून सामन्यात बरोबरी साधली. ब्लु बॉल शूट आउटमध्ये बदामीकर स्टार्सच्या दिव्यांश गोरे, राजवर्धन जोशी, इशान भाले यांनी सुरेख कामगिरी करत संघाचा विजय सुकर केला. अखेरच्या साखळी फेरीच्या लढतीत निमिश कुलकर्णी, स्वरूप कुलकर्णी, गिरीश दामले, यश शहा यांच्या विजयी कामगिरीच्या जोरावर सुप्रीम एसेस संघाने सेनुमेरो रॉकेट्सचा ४-३ असा पराभव करून आपली विजयी मालिका कायम राखली. क्यु मास्टर्स संघाने स्कायलाइन स्ट्रायकर्स संघाचा ६-१ असा सहज पराभव केला. क्यु मास्टर्सकडून अनिकेत शिंदे, राजवीर राजाध्यक्ष/सुचरित राजाध्यक्ष, निशाद चौघुले , जयदीप गोडबोले/यश काळे, आमीर आजगावकर यांनी सुरेख कामगिरी बजावली.

## विनेश फोगटला १६ कोटींहून अधिक बक्षीस?

**नवी दिल्ली :** भारतीय कुस्तीपटू विनेश फोगटने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये महिलांच्या ५० किलो फ्रीस्टाइल कुस्तीच्या अंतिम फेरीत पोहोचून इतिहास रचला. पहिल्यांदाच भारतीय कुस्तीपटू अंतिम फेरीत पोहोचला होता. फायनलमध्ये विनेशकडून



सुवर्ण जिंकण्याची अपेक्षा होती, पण त्याआधीच काही अनपेक्षित घडले. अंतिम सामन्याच्या दिवशी १०० ग्रॅम जास्त वजनामुळे विनेशला अपात्र घोषित करण्यात आले. विनेश फोगटने या निर्णयाविरुद्ध कोर्ट ऑफ आर्बिट्रेशन फॉर स्पोर्ट (CAS) मध्ये अपील केले आणि तिला एकत्रित रौप्य पदक देण्याची मागणी केली. मात्र, सीएएसने स्टार कुस्तीपटू विनेश फोगटचे अपील फेटाळून लावले होते. विनेश पदक जिंकू शकली नाही, पण मायदेशी परतल्यावर चॅम्पियनप्रमाणे तिचे स्वागत करण्यात आले. विनेश १७ ऑगस्ट रोजी पॅरिसहून घरी परतली. विनेश दिल्लीहून तिच्या मूळ गावी बलालीला गेली आहे. बलालीला जाताना त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. पॅरिस ऑलिम्पिकमधील चमकदार कामगिरीमुळे विनेश फोगट सोशल मीडियावर लोकप्रिय आहे. विनेशबाबत एक पोस्ट व्हायरल झाली आहे, ज्यामध्ये असा दावा करण्यात आला आहे की या भारतीय कुस्तीपटूला विविध संस्थांकडून बक्षीस म्हणून सुमारे १६.३५ कोटी रुपये मिळाले आहेत. ही पोस्ट सुभाष फौजी नावाच्या युजरने शेअर केली आहे. आता विनेश फोगटचे पती सोमवीर राठी यांनी हा दावा फेटाळून लावला आहे. सोमवीरने X वर लिहिले, 'विनेश फोगटला खालील संस्था, व्यापारी, कंपन्या आणि पक्षांकडून एकही पैसा मिळालेला नाही. तुम्ही सर्व आमचे हितचिंतक आहात, कृपया खोट्या बातम्या पसरवू नका. यामुळे आपले नक्कीच नुकसान होणार आहे. सामाजिक मूल्यांचीही हानी होईल. स्वस्त लोकप्रियता मिळविण्याचे हे एक साधन आहे.

## राशिदने क्रिकेट ऑस्ट्रेलियाला दिले चोख प्रत्युत्तर!

**नवी दिल्ली :** अफगाणिस्तान टी-२० संघाचा कर्णधार राशिद खानने बिग बॅश लीगच्या आगामी हंगामातून माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे. रशीद या स्पर्धेत सहभागी होणार नसल्याचे हे सलग दुसरे वर्ष आहे. या स्पर्धेच्या प्लेअर ड्राफ्टमध्ये



राशिदचे नाव नाही. बिग बॅशच्या नवीन हंगामाचा मसुदा १ सप्टेंबर रोजी होणार आहे. आयसीसीच्या फ्युचर टूर प्रोग्राम अंतर्गत या महिन्यात ऑस्ट्रेलिया आणि अफगाणिस्तान यांच्यात तीन सामन्यांची टी-२० मालिका प्रस्तावित करण्यात आली होती. अफगाणिस्तान या मालिकेचे यजमानपद भूषवणार होता, मात्र ऑस्ट्रेलियाने माघार घेतली होती. अफगाणिस्तानातील तालिबान राजवटीत महिला आणि मुलींच्या मानवी हक्कांचे उल्लंघन होत असल्याचे क्रिकेट ऑस्ट्रेलियाने म्हटले होते. यामुळे त्यांचा संघ अफगाणिस्तानविरुद्ध द्विपक्षीय मालिका खेळणार नाही. सीएचे मुख्य कार्यकारी निक हॉकले यांनी सांगितले की, अफगाणिस्तान क्रिकेट बोर्ड (एसीबी) सोबत या विषयावर नियमित चर्चा झाली आहे आणि आशा आहे की भविष्यात दोन्ही संघ एकमेकांशी खेळण्यास सुरुवात करतील.

## पीएमडीटीए मानांकन एसकेटी डेक्कन जिमखाना ब्रॉन्झ सिरिज २०२४ स्पर्धेत

# रेयांश जगताप, पलाश रुचंदानी, विवान यांचा उपांत्य फेरीत प्रवेश



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे मेट्रोपॉलिटन जिल्हा टेनिस संघटना(पीएमडीटीए) यांच्या तर्फे पीएमडीटीए-मानांकन एसकेटी डेक्कन जिमखाना ८,१०, १२ व १४ वर्षाखालील ब्रॉन्झ सिरिज टेनिस २०२४ स्पर्धेत १० वर्षांखालील मुलांच्या गटात रेयांश जगताप, पलाश रुचंदानी, विवान डिक्कर यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला.

डेक्कन जिमखाना येथील टेनिस कोर्टवर सुरु असलेल्या या स्पर्धेत १० वर्षांखालील मुलांच्या गटात उपांत्यपूर्व फेरीत दहाव्या मानांकित रेयांश जगतापने सहाव्या मानांकित राजस आंबेकरचा ५-३ असा पराभव करून अनपेक्षित निकाल नोंदवला. चौदाव्या मानांकित पलाश रुचंदानी याने ओम भांडेवर ५-३ असा विजय मिळवला. दुसऱ्या मानांकित विवान डिक्कर व सायन कुवाड यांनी अनुक्रमे क्रिशांग शर्मा व आदित्य डामरे यांचा ५-२ अशा सारख्याच फरकाने पराभव करून उपांत्य फेरी गाठली. याच मुलींच्या गटात आठव्या मानांकित झेन गुप्ता हिने चौथ्या मानांकित म्रिगाक्षी रॉयचा ५-२ असा पराभव करून सनसनाटी निकाल नोंदवला.

१२ वर्षांखालील मुलींच्या गटात उपांत्यपूर्व फेरीत अव्वल मानांकित स्वरा पवारने आठव्या मानांकित भाव्या सोनकरला ६-२ असे सहज पराभूत केले. चुरशीच्या लढतीत आराध्या मेंडकेपाटीलने झेन गुप्ताचा टायब्रेकमध्ये ६-५(३) असा पराभव केला. दुसऱ्या मानांकित शरण्या सावंतने अकराव्या मानांकित समायरा चौधरीचे आव्हान ६-३ असे संपुष्टात आणले.



#रा




# पुण्याला लाभलेला परिसस्पर्श पुनीत बालन



**गेल्या दशकभरापासून पुण्याच्या सामाजिक आणि सांस्कृतिक परिघावर पुनीत बालन नावाचे वादळ घोंघावत आहे .** महाराष्ट्राला वैभवसंपन्न करणाऱ्या पुण्याच्या सांस्कृतिक, सामाजिक घडामोडींचा संवर्धक म्हणून पुनीत बालन यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांच्या **वाढदिवसानिमित्त त्यांच्या विविध पैलूंचा घेतलेला आढावा... !**

संस्कृती
परंपरा
आदर्श
संस्कारांची
जपणूक...



व्यक्ती एक
पैलू अनेक

२० ऑगस्ट

# अभिष्टचिंतन

## भारतीय लष्कर



पुनीत बालन यांनी शोफियान येथे चिनार कॉर्पस भारतीय लष्कराच्या साहाय्याने जम्मू काश्मीरमधील सर्वात उंच १५० फूट उंच तिरंगा उभारला. तसेच काश्मिरी विद्यार्थ्यांना ज्ञानदान करण्यासाठी त्यांनी भारतीय लष्कराकडून चालविण्यात येत असलेल्या दहा शाळा भारतीय लष्कराच्या मदतीने चालविण्यास घेतल्या असून या सर्व शाळा बारामुल्ला, कुपवाडा, अनंतनाग, पेहलगाम, पुलवामा, शोपियान, उरी, त्रेगम, व्हेन, घुरेस या भागातील आहेत. बारामुल्ला येथील विशेष मुलांसाठी असलेल्या डगर स्कुलला देखील भारतीय लष्करासोबत ते चालवत आहेत. काश्मीरमध्ये केलेल्या समाजकार्याबद्दल पुनीत बालन यांना भारतीय लष्कराकडून गौरवण्यातही आले आहे.



महाराष्ट्राचे समाजकारण अनेक सव्यसाची साहित्यिक , उद्योजक आणि समाज सुधारकांनी उन्नत केलं. सत्तेच्या सारीपाटावरून दूर राहून सुद्धा महाराष्ट्राचे सांस्कृतिक परीघ वैभव संपन्न करण्यामध्ये अशाच सामाजिक सुधारकांचा , उद्योजकांचा सिंहाचा वाटा आहे. आणि या राज्याच्या वैभवसंपन्न मध्ये पुण्याचे एक अनन्य साधारण महत्त्व आहे. पुण्याची मूळ ओळख ही गणेशोत्सवामुळे आहे आणि गणेशोत्सवाला खऱ्या अर्थाने अर्थसंपन्न करण्यामध्ये गेल्या काही वर्षात पुनीत बालन ग्रुपने मोठे योगदान दिले आहे. या ग्रुपचे सर्वेसर्वा आणि सहृदयी व्यक्तिमत्व असलेले पुनीतजी बालन यांनी केवळ हा गणेशोत्सव श्रीमंत केला नाही तर पुण्याची संस्कृती देखील वैभवसंपन्न करण्याची एक सोनेरी पायवाट स्थापित केली. ज्या पद्धतीने महात्मा फुले , लोकमान्य टिळक यांची छाप या पुणे शहरावरती होती, ती सामाजिक वीण पुढे मोहन धारिया, अनु आगा, थोर गणपत्य श्री. गोडसे या लोकांनी कायम ठेवली. दुर्दैवाने गेल्या काही वर्षांमध्ये समाजवादी नेतृत्वाची ही वीण कुठेतरी उसवली होती . ती पुनीत बालन यांच्या माध्यमातून पुन्हा एकदा घट्ट होत असल्याचे दिसते. भारतीय लष्करापासून ते साताऱ्याच्या डोंगरदऱ्यातील मुलींमध्ये सायकल वाटप करण्यापर्यंत आणि कोरोना काळातील मानवतेला जगवणारा सहकार्याचा यज्ञकुंड उभा करण्यापासून ते होतकरू खेळाडूंना प्रोत्साहन देण्यापर्यंत आर्थिक सहकार्याचा आणि सामाजिक जाणीव यांचा एक सेतू श्री बालन यांनी उभारला आहे.

पंजाबी घराण्यातील एक युवक अत्यंत हलाखीची आणि कष्टाची संघर्षमय वाटचालीची शिदोरी घेऊन या पुणे शहरांमध्ये आपल्या पायावर उभे राहण्याचा प्रयत्न करत होता. घरातील श्रीमंती नांदू लागल्यानंतर देखील वडिलांच्या आग्रहामुळे चाकरमानी म्हणून काही काळ काम करत होता . त्याच काळात त्यांना प्रत्येक पैशाची किंमत आणि जगातील कष्टाची जाणीव झाली. त्यामुळे नंतर तोंडात सोन्याचा चमचा आला तरीसुद्धा गरीबांबद्दलची ती कणव आणि प्रत्येक पैसा मोजून - मापून खर्च करण्याची आर्थिक शिस्त त्यांच्या अंगी बांणली गेली.

यातूनच पुनीत बालन यांच्या साम्राज्याचा उदय झाला. प्रखर स्वाभिमानी , अत्यंत शिस्तप्रिय आणि बोलेल ते करणारा सत्यवचनी - राम वचनी बाणा हेच पुनीत बालन यांचे सामर्थ्य आहे. त्या सामर्थ्यावर या पुण्याचे सामाजिक पटल आज त्यांनी भारावून टाकले आहे. राजकीय पटलावर त्यांचा प्रवेश व्हावा आणि राज्याच्या किंवा देशाच्या लोकशाहीच्या मंदिरात या सकारात्मक नेतृत्वाचे तेजोमय वलय पसरावे, त्यातून एका चारित्र्यसंपन्न राजकारणाची सुरुवात व्हावी अशी त्यांच्या अनेक चाहत्यांची आणि त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या कार्यकर्त्यांची इच्छा आहे. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्र संचारच्या वतीने त्यांना शुभेच्छा देत असताना , त्यांची ही जन श्रीमंती दिवसेंदिवस वाढत जावो , त्यांची दानशूरता , त्यांचे शुभ्रधवल चारित्र्य याचा ध्वज सदा उंचावत राहो आणि त्यांच्या आश्रयाला येणाऱ्या हजारो हजारो पांथस्थाना त्यांच्या शीतल मायेचा , जिव्हाळ्याचा आश्रय लाभो ही शुभेच्छा.

— **अनिरुद्ध बडवे, संपादक दै. राष्ट्र संचार**

## इंद्राणी बालन फाऊंडेशन

पुनीत बालन इंद्राणी बालन फाउंडेशनचे अध्यक्ष आहेत. शहीद जवानांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत, ग्रामीण भागातील निराधार, गरीब विद्यार्थ्यांना दत्तक घेऊन त्यांना सायकल, संगणक, दप्तर पुरवून भावी पिढीला ताकद देण्याचे काम इंद्राणी बालन फाउंडेशन तर्फे केले जाते. इंद्राणी बालन फाउंडेशन तर्फे श्रीमंत भाऊसाहेब रंगारी भवन या क्रांतिकारी इतिहास असलेल्या ऐतिहासिक वास्तूचे नूतनीकरण करण्यात आले आहे.

Balan
INDRANI BALAN
FOUNDATION, PUNE

## चित्रपट निर्मिति

पुनीत बालन यांनी उद्योग, क्रिडा क्षेत्राबरोबर मनोरंजन क्षेत्रातही मोलाची कामगिरी केली आहे. पुनित बालन स्टुडिओ लि. नावाने त्यांची कंपनी मनोरंजन क्षेत्रात कार्यरत आहे. आत्तापर्यंत त्यांनी अनेक चित्रपटांची निर्मिती केली आहे. 'मुळशी पॅटर्न' या मराठीतील गाजलेल्या चित्रपटाची निर्मिती पुनीत बालन यांनी केली आहे. तसेच पुनीत बालन स्टुडिओजच्या माध्यमातून 'गुड शॉट', 'द हिंदू बॉय' ह्या प्रामुख्याने काश्मीरमधील वास्तव्यावर बोट ठेवणाऱ्या शॉर्ट फिल्मचीही निर्मिती करण्यात आली आहे.

## स्पोर्ट्स्



पुनीत बालन हे भारतीय उद्योजकाबरोबरच एक खेळाडूही आहेत. पुणे जगवर्स (टेनिस), मुंबई खिलाडीज (खो खो), महाराष्ट्र आयर्न मॅन (हॅन्डबॉल), प्रीमिअर बॅडमिंटन, टेबल टेनिस असे विविध क्रीडा प्रकारातील संघाचे ते मालक आहेत. एवढंच नाही तर महाराष्ट्र हॉकी असोसिएशनबरोबर पुनीत बालन ग्रुपने पाच वर्षांचा सामंजस्य करार केला आहे. या कराराअंतर्गत प्रतिभावान हॉकी खेळाडूंना घडवण्यासाठी ५० लाख रुपयांचे प्रायोजकत्व बालन ग्रुपकडून देण्यात आले आहे. तसेच काश्मिर खोऱ्यातील खेळाडूंना घडण्यासाठी पुनीत बालन ग्रुपकडून मदत केली जाते. यामध्ये आफरीन हैदर (तायक्वांदो), मुहम्मद सलीम (सायकल), उमर शाह (क्रिकेट) आणि उमीर सय्यद (खो खो) या खेळाडूंचा समावेश आहे.




# नवसंकल्पनांचा दाता



## गणेशोत्सव

पुण्यातील गणेशोत्सवाचा पुनीत बालन यांच्याशी जवळचा संबंध आहे. हिंदूस्थानातील पहिला गणेशोत्सव अशी ओळख असलेल्या श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपतीचे पुनीत बालन विश्वस्त आणि उत्सवप्रमुख आहेत. २०२३ मध्ये त्यांनी कश्मीरमध्ये गणेशोत्सवाची सुरूवात केली आहे. अनेक वर्षांपासून पुनित बालन पुण्यातील विविध गणेशोत्सव मंडळांना आर्थिक मदत करतात.



Manikchand Oxyrich